# महाराष्ट्राचीं धारातीर्थें

१-५-१९८

लेखक

पं. महादेवशास्त्री जोशी

८८९

सन १९५२

REFBK-0007881

REFBK-0007881

मूल्य अडीच रुपये

ज्ञा न रा ज. प्र का श न, पु णें २

प्रकाशक
सौ. सुधा महादेव जोशी,
ज्ञानराज प्रकाशन,
४२१ शनवार, पुणें २.

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण, पुणें २

# भाव 'धारा'

'धारातीर्थ' हा शब्द रणांगणाला उद्देशून वापरतात. धारा म्हणजे तरवारीची धार. असिलता परजीत शूर-वीर जेव्हां प्रतिस्पर्ध्याला भिडतात आणि एकमेकांवर वार करीत रक्तधारा वाहतात तेव्हां तें रणांगण धारातीर्थ बनतें. या धारातीर्थांत जो पडेल तो स्वर्गाचा अधिकारी होतो असें आपलीं शास्त्र-पुराणें सांगतात. मरण सगळया विश्वाच्या मार्गे लागलें आहे. अनेक प्राणी अनेक प्रकारें मरत असले तरी त्यांतलीं दोनच मरणें दुर्लभ आणि प्रशंसनीय असतात. एक ब्रह्मधारणेनें प्राणजय करून देहविसर्जन करणें हें आणि दुसरें 'उसिण्या घाई' झुंजतां झुंजतां उरीं घाव लागून धारातीर्थी पडणें हें.

या पुस्तकांतलीं आठहि स्थळें अशा प्रकारचीं धारातीर्थेंच आहेत. कुठे समरधुरंधर तानाजी पडला आहे, कुठे मुरारबाजी पहुडला आहे, तर कुठे बाजीप्रभु गतप्राण झाला आहे. शिवाय अनेक अज्ञात, अपरिचित वीरांची गणना कोण करणार! गडावर आणि गडांच्या परिसरांत जे 'वीर' नांवानें संबोधले जाणारे उभे दगड दिसतात ते ते सगळे स्वराज्यासाठीं धारातर्थांत उडी घेऊन मरणानें पार झालेल्या नरपुंगवांचीं स्मारकेंच होत!

महाराष्ट्रांत अशीं धारातीर्थें अगणित आहेत. जळात तशीं स्थळांत. डोंगरांत तशीं मैदानांत. घाटांत तशीं खिंडींत. शहरांत तशीं जंगलांत. किंबहुना शिवछत्रपतींच्या काळीं उभा महाराष्ट्रच एक अफाट, विराट असें धारातीर्थ बनला होता. त्या काळांत इथें सर्वत्र असिधारा, रक्तधारा, काव्यधारा, दानधारा, उपदेशधारा अशा अनेक धारा खळाळत वाहिल्या आहेत. या सगळया धारातीर्थांची वाखाणणी करूं म्हणेल तर सहस्रमुखांचा शेषही शिणेल!

शिवकालांत आणि त्यांच्या पश्चातहि महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं लढाया झाल्या; पण त्या गडांवर, गडांखालीं आणि गडांच्यासंबंधानेंच

विशेषतः झाल्या. म्हणून क्षेत्रांत काशी, तीर्थांत प्रयाग, तसे गडकोट हे मीं अग्रगण्य धारातीर्थं समजतों. महाराष्ट्रात जलदुर्ग आणि गिरिदुर्ग मिळून सुमारें पावणेदोनशें किल्ले आहेत. या सर्व किल्ल्यांशीं शिवरायाचा साक्षात् किंवा सत्तामात्रें संबंध आलेला आहे. परकी सत्तेचा मूलोच्छेद करून शिवरायानें हे सर्व किल्लेकोट स्वराज्यांत आणले किंबहुना यांच्या आश्रयानेंच स्वराज्य संपादिलें आणि म्हणूनच इतिहासज्ञ त्याला दुर्गाधिपति म्हणून गौरवतात !

गेल्या दोन हजार वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासावर ओझरती नजर टाकली तर कल्चुरी, आंध्रभृत्य, चालुक्य, शिलाहार, यादव, यवन, मराठे, इंग्रज अशा अनेक राजवटींचा इथें उदो असा झालेला दिसून येईल. यांपैकीं ज्या ज्या राजांना जिथें जिथें अधिक बंदोबस्ताची गरज वाटली, तिथें तिथें हे किल्ले-कोट उभवून ठेवले. या वेगवेगळ्या राजवटींच्या खुणा मूर्ति, कमानी, टाकीं, मंदिरें, मशिदी इत्यादि रूपांनीं या गडांवर अजूनही दिसतात. स्वराज्याची यज्ञदीक्षा घेतल्यावर शिवरायानें आज एक उद्यां एक असें करून ते आपल्या सत्तेखालीं आणले. त्यांतल्या कांहींची डागडुजी केली आणि जरूर तिथें नवेही बांधले. गडांच्या कामीं त्यानें पाण्यासारखा पैसा ओतला आहे. 'राज्यास बळकटी किल्ल्यांची' हें तत्त्व त्याला पूर्ण पटलें होतें.

आज आपल्याला ते ओसाड, विषण्ण असे दिसतात. कांहींचा कणा मोडला आहे, कांहींचे अवयव तुटले आहेत, कांहीं ढांसळले आहेत, कांहीं मृत्युपंथाला लागले आहेत ! यापुढें त्यांचा पुनरपि ऊर्जित काळ येईल, अशी आशाही करायला नको ! हें आतां असेंच होणार, काळ त्यांना आपलें भक्ष्य बनवणार ! धामधुमीच्या काळांत संरक्षण आणि शांततेच्या काळांत समोंवतीच्या मुलखाचा बंदोबस्त अशा दुहेरी हेतूंनीं हे किल्ले बांधले गेले. त्यांनीं आपली कामगिरीही पार पाडली. आजच्या आमूलाग्र बदललेल्या युद्धतंत्रांत किल्ल्यांची मातब्बरी उरली नाहीं. ज्या दिवशीं पोटांत बॉंबगोळे भरून घेऊन विमान शत्रूच्या प्रदेशांवर उडालें त्याच दिवशीं जगांतल्या गडाकोटांचें महत्त्व संपुष्टांत आलें. आतां केवळ इतिहासाचे साक्षीदार म्हणूनच जग त्यांना ओळखील !

प्र. पृ. १५

पण ज्या वेळीं महाराष्ट्राच्या स्वराज्याचा इतिहास घडत होता तेव्हां ? तेव्हां हे गड-कोट म्हणजे एक महान् शक्ति होती. गनिमाच्या उरांत चळकंप उत्पन्न करणारी रणचंडी भवानी या गडांवर संचरत होती. जरीपटक्यासह भगवे झेंडे उंच फडकत होते. रणतुरें झडत होतीं. सभोंवतींच्या गिरिकंदरांतून त्यांच्या पडसादाचीं उत्तरें उठत होतीं. तिथल्या तटा-बुरुजांतून एकच 'अनुहत नाद' निघत होता, तो म्हणजे हिंदवी स्वराज्य ! तिथें एकच रस उफाळत होता आणि तो म्हणजे वीररस ! तिथल्या मर्द मावळ्यांना एकच ताल माहीत होता आणि तो म्हणजे धुमाळी ! तिथले जंग्या, मारगिऱ्या इत्यादि किल्ल्यांचे शतनेत्र जागरूकपणें शत्रूंची टेहेळणी करीत होते. तिथले झरे स्वातंत्र्याचे प्रवाह खालच्या परिसरांत वाहवीत होते. तिथलीं टांकीं स्वामिभक्तीच्या निर्मळ भावजलानें तुडुंबत होतीं. इथला वारा एका गडाचा संदेश दुसऱ्या गडावर, दुसऱ्याचा तिसऱ्यावर वाहून नेण्याचें कार्य अविरतपणें करीत होता. सगळे गड एका सूत्रांत गोवलेले, एका ध्येयाला वाहिलेले आणि एकाच कर्तव्याला बांधलेले असे होते.

पण पुढें चक्रनेमिक्रम बदलला. यवनीसत्तेंत गुदमरलेला जीव मोकळा करून स्वातंत्र्याची शुद्ध, पथ्यकर, हवा कांहीं काल सेवन करतात न करतात तोंच पुन्हा त्यांना पारतंत्र्यांत रखडण्याची वेळ आली. थोडाथोडका अवधि नव्हे; तर पक्कें सव्वा शतक ! या कालखंडांत ते अगदींच मरगळून पडले. कित्येक ठिकाणीं नव्या राजकर्त्यांनींच त्यांच्या अंगांवर घाव घातले. कांहींना नाखुशीनें गोरीं बाळें आपल्या अंगाखांद्यांवर खेळवावीं लागलीं आणि कांहींना तर इंग्रजांचे युद्धकैदीही संभाळावे लागले. उरलेले उपेक्षेनें पडले, झडले. आज आपण पुनश्च सार्वभौम स्वातंत्र्य मिळविलें असलें तरी त्याची दुर्दशा संपलेली नाहीं. ती वाढतीच आहे आणि वाढतीच राहील; पण आज त्यांच्या हृदयवीणेवरचें शोकगीत थांबलें आहे. ते जणूं भेटीला आलेल्या यात्रिकाला सांगतात :

'आमच्याबद्दल आतां हळहळूं नका. आतां दस गेले, पांच उरले ! 'Those who will longest will see most !' आम्हीही

खूप पाहिलें, खूप सोसलें; पण शेवट गोड झाला. आमच्या शतनेत्रांना भारताचा स्वातंत्र्यमहोत्सव पहायला मिळाला. भारताचा नवा राष्ट्रध्वज आम्हीं आमच्या पडत्या हृदयावर उंच उभारून दाखविला! आतां आम्ही सुखासमाधानानें देह धरणिवर टाकूं!!'

सह्याद्रीचे फांटे, घाट आणि कोंकण या भागांत ठायीं ठायीं उभे असलेल्या या सुमारें पावणेदोनशें गडांची एकदां धूळभेट घेऊन यायची म्हटलें तरी त्या कामीं तीन-चार वर्षें सहज लागतील. चारी धामांच्या यात्रेपेक्षांहि ही यात्रा खडतर होईल. मीं एवढ्या विशाल यात्रेचें प्रस्थान ठेवलेलें नाहीं. मीं कांहीं विशिष्ट किल्लेच मनाशीं निश्चित केले आहेत. त्यांत कांहीं गिरिदुर्ग आहेत आणि कांहीं जलदुर्ग आहेत. जे सर्व-परिचित आहेत तेवढ्यांचाच माझा संकल्प आहे! माझ्या अल्पमतीला झालें तसें त्यांचें 'दर्शन' मी महाराष्ट्राच्या नव्या पिढीला घडवणार आहे.

गडयात्रा ही तीर्थयात्रेइतकी सुगम नाहीं. गिरिदुर्ग हे बहुधा आडवाटेलाच आहेत. त्यांची हजारों फुटांची कडेकपारींतून जाणारी चढण पादाक्रांत करायची तर तिथें द्रव्यबळ चालत नाहीं, तर शरीरबळ आणि मनोबळ हवें असतें. चढतांना धाप लागली तरी चढून गेल्यावर फार वेळ बसून राहतां येत नाहीं. वरचीं सर्व स्थळें पहाण्यासाठीं आणखी कित्येक मैल पायपीट करावी लागते. शिवाय बालेकिल्ल्याची दुसरी चढण असते ती वेगळीच. ऊन, थंडी, वारा हीं तीव्रस्वरूपांत सोसावीं लागतात. पुष्कळशा गैरसोयींकडेही दुर्लक्ष करावें लागतें. यात्रिकाच्या मनाची एवढी तयारी असेल तर त्याला या प्रवासापासून लाभहि तेवढाच मोठा होईल.

तुम्ही असे दहावीस गड चढलांत तर तुम्हांला तुमच्या विशाल महाराष्ट्राचें वेगवेगळ्या भागांतून विहंगमदर्शन होईल. महाराष्ट्राला सस्यशामल करणाऱ्या अनेक लहान-मोठ्या पुण्यसरिता तुमच्या दृष्टीला पुनीत करतील. गगनचुंबी अनेक सह्यशिखरें तुमच्या विचारांची उंची वाढवतील. क्वचित् रौद्र, क्वचित् भयासुर, क्वचित् विकराल, क्वचित् मनोहर अशीं एकाच सह्याद्रीचीं विविध रूपें तुमच्या दृष्टिपथांत येतील.

नाना जातींच्या शेंकडों वनस्पती तुमची जिज्ञासा वाढवतील. देश आणि कोंकण यांना जोडणारे वेगवेगळे घाट तुमची प्रवासरुचि वाढवतील. वेगवेगळ्या ऋतूंत विविध प्रकारें नटलेला निसर्ग तुम्हांला सर्व बाजूंनीं वेढील. तुमच्या अंतरांत सहानुभावाची शक्ति असेल तर सह्याद्रीच्या अनुषंगानें राहणाऱ्या जानपदांचीं सुखदुःखें तुम्हांला कळतील. महाराष्ट्राचें मराठेपण कशांत आहे तेंहि कळेल. 'माझा महाराष्ट्र मीं पाहिला.' हा आनंद लहानसहान नाहीं ! ही अनुभूतीही सामान्य नाहीं !

गडांच्या यात्रेला सहसा कोणी एकटा जात नाहीं आणि जाऊंही नये. मर्यादित मित्रमंडळ बरोबर असावें. सगळे उत्साही असले तर एक निराळीच गंमत येते. एकच वस्तु अनेक डोळ्यांनीं पहातां येते. अडचणींनाही सुखाची प्रचीति येते. हास्य-विनोदाचे तुषार पडले कीं कसलीही गैरसोयसुद्धां गोड होते. शक्य तर गडावर एखादी वस्ती करावी. जातांना प्रत्येक गडाचा भूगोल आणि इतिहास शक्य तेवढा वाचलेला असावा. म्हणजे त्या त्या स्थळाचें खरें दर्शन घेतां येतें. गडावर मार्गदर्शक मिळण्यासारखा असल्यास त्याची मदत अवश्य घ्यावी. अन्यथा कित्येक जागा पाहून न पाहिल्यासारख्या ठरतात. पाणी सगळ्या गडांवर असतेंच. छायाही असते. शिदोरी मात्र आपल्या बरोबर असावी. सकाळीं जाऊन दुपारीं परत खालीं येऊं असा बेत असला तरी रिक्त हस्तानें जाऊं नये. वर चढल्यावर श्रम आणि मोकळी हवा यांमुळें हटकून भूक लागते आणि तिला अवदान मिळालें नाहीं तर वरच्या भ्रमंतीला हवा तेवढा उत्साह रहात नाहीं. चढतांना पाणी पिऊं नये. वर चढतांना आणि विशेषतः खालीं उतरतांना खंबीर असा 'तिसरा पाय' हातीं असणें चांगलें. एकाच मध्यम लयींत चढावें नि उतरावें. धांवाधांव शेवटीं गळ्याशीं येते. सुपारी, आलें, लिंबू या वस्तु अवश्य पिशवींत असाव्या. कित्येक ठिकाणीं गडावर जातांना पायथ्यापर्यंत वाहनें मिळतात; पण येतांना त्यांची शाश्वती नसते. अशा वेळीं सात-आठ मैल पायीं जाण्याचा प्रसंग आला तरी धैर्य गळता कामा नये. आधींपासून तशी मनाची तयारी ठेवावी.

माझ्यां संकल्पित यात्रेचा हा अर्धविराम आहे. या लेखमालेला ‘ प्रसाद ’मध्यें प्रेमानें स्थान दिल्याबद्दल माझे मित्र श्री. य. गो. जोशी यांचे, सुबक छपाईबद्दल राजगुरुप्रेसचे, आंतलीं रेषाचित्रें काढून दिल्याबद्दल श्री. गंगाधर ताटके यांचे आणि मुखपृष्ठ सजविल्याबद्दल श्री. दलाल यांचे मनःपूर्वक आभर मानून मी पुढील भागाचें प्रस्थान ठेवतों.

पुणें,
नारळीपौर्णिमा
शके १८७४

महादेवशास्त्री जोशी

‘ज्ञाने मौनं क्षमा शक्तौ त्यागे श्लाघाविपर्ययः
गुणा गुणानुबन्धित्वात्तस्य सप्रसवा इव’

— कालिदास



श्रीमान् वामनराव कुंडईकर [ गोवा ]

यांचे सेवेसीं —

आपली अभिजात रसिकता, मनोज्ञ संस्कारिता, सत्पात्रीं दानशूरता आणि सर्वोपरि स्नेहाळ अंतःकरण या गुणविशेषांवर लुब्ध होऊन मी ही माझी वाङ्मयकृति आपणांस अर्पण करीत आहें. माझें मागणें अवढेंच कीं —

**‘यावज्जीव असावी त्वन्मैत्री स्थिति धरूनि शैलाची !’**

— लेखक

# दिग्दर्शन

या पुस्तकात आठ गडांचें वर्णन आलेलें आहे. पुणें हें मध्यकेंद्र करून प्रस्तुत गडांचा मार्ग कसा, त्यांचें अंतर किती, उंची किती आणि प्रत्येक गडावरचीं प्रेक्षणीय आणि वैशिष्ट्यसंपूर्ण स्थळें कोणतीं हें या परिशिष्टांत संक्षेपानें दिलें आहे—

१. **शिवरायाची जन्मभूमि**— म्हणजेच शिवनेरी किल्ला; जुन्नर तालुका. पुण्यापासून अंतर ५८ मैल. जुन्नरपासून पश्चिमेस दीड मैल. १००० फूट उंच. एस्. टी.च्या बसेस पुण्यांतील नव्या पुलाच्या स्टँडवरून निघतात आणि चाकणमार्गें जुन्नरला जातात. बौद्धांच्या गुहा, शिवाबाईचें देऊळ, गंगा-जमना टाकीं, कमानटाकें, शिवाजीचें जन्मस्थान, इदगा हीं इथलीं प्रेक्षणीय स्थळें. वऱ्हाडी डोंगर, महोर टेकड्या, लेण्याद्रि, तुळजाडोंगर हीं गडाच्या परिसरांतील दर्शनीय स्थळें.

२. **तानाजीची वीरशय्या**—सिंहगड. पुण्यापासून १६ मैलांवर. जाण्याचे मार्ग दोन. पहिला डोणज्यावरून आणि दुसरा कल्याण-दरवाज्याच्या बाजूनें. पहिला कठीण. तीन मैलांची चढण. दुसरा सोपा. दोन्ही मार्गांनीं जाण्यासाठीं एस्. टी. च्या गाड्या आहेत. कल्याण-दरवाज्यानें जायचें तर कोंडणपूरची गाडी. डोणज्याची गाडी खडकवासल्यावरून जाते. गडाची उंची समुद्रसपाटीपासून ४५०० फूट व पायथ्यापासून २३०० फूट. वाटेंत आणि वर दूधदुभतें मिळतें. चहा-फराळाचीहि सोय आहे. कल्याणदरवाजा, सुरुंगाचें देवटाकें, अमृतेश्वर, तानाजीची समाधि, कोंडणेश्वर, टेहळणीचा बुरूज, तानाजीचा कडा, झुंजारबुरूज, राजारामाची समाधि, लो. टिळक यांचा बंगला हीं इथलीं प्रेक्षणीय स्थळें. सगळा गड फिरून पहायला दोन तास पुरतात.

३. **पुरंदर-रुद्रमाळ**—पुरंदर किल्ला. पुण्यापासून २५ मैल आणि सासवडपासून सहा मैल. स्वारगेटावरून एस्. टी. च्या गाड्या सुटतात. सकाळची टपालगाडी फक्त पुरंदरच्या पायथ्याशीं जाते. बाकीच्या

सासवडपर्यंतच जातात. पुढें चालावें लागतें. रस्ता चांगला आहे. पुरंदरेश्वर, पद्मावतींतळें राजाळतळें हीं माचींतलीं प्रेक्षणीय स्थळें. हत्तीबुरूज, कोंकण्याबुरूज, फत्तेबुरूज, शेंदऱ्याबुरूज, चोरटांकें, केदारेश्वर, राजगादी, दारूगोळ्याची कोठी हीं बालेकिल्ल्यांतलीं प्रेक्षणीय स्थळें. पायथ्याचा ' बनांतला नारायण 'ही अवश्य पहावा. माचींत वस्ती आहे. चहा फराळ मिळण्याची सोय आहे. चढण विशेषशी कठीण नाहीं. गडाची उंची पायथ्यापासून २५०० फूट.

४. **शिवरायाचा प्रताप**—प्रतापगड. उ. साताऱ्याच्या जावळी तालुक्यांत. पुणें, वाई, महाबळेश्वर आणि आंबेनळी घाट उतरून महाडच्या रस्त्यावर. एस् टी. च्या गाड्या मिळतात. खालच्या कुंभरोशी गांवांत सहाण्याची सोय होऊं शकते. कुंभरोशीपासून अर्ध्या मैलावर चढाव सुरू होतो. दीड मैल सामान्य चढण आहे. गडाची उंची ३५०० फूट. वर वस्ती आहे. भवानीचें देऊळ, अबदुल्लाबुरूज, तळें, रेडकाबुरूज आणि अफजुलखानाची कबर हीं प्रेक्षणीय स्थळें.

५. **प्रचंड तोरणा**—तोरणा किल्ला. पूर्वीच्या भोर संस्थानांत. पुणें–सातारा रस्त्यावर कात्रज घाटाच्या पुढें उजवा रस्ता फुटतो तो नसरापूरहून वेल्हें या गांवीं जातो. वेल्हें हा तोरण्याचा पायथा. एस्. टी. च्या गाड्या जातात. पुण्यापासून अंतर ४० मैल. गडाची उंची ४६०६ फूट. विस्तार मोठा. चढण कठीण. हनुमान बुरूज, मेंगाई, झुंजारमाची, तोरणजाई, बुधला हीं पाहण्याचीं स्थळें. हवालदार आणि गुरव वर रहातात.

६. **राजगड**– तोरण्याला जवळ. मार्गासनी या गांवीं उतरून खरीव खिंडींतून हवालदाराच्या पालीवरून मुख्य रस्त्यानें चढायचें. तोरण्याच्या दक्षिण अंगानें खालीं उतरून गुंजवणी नदीच्या कांठाकांठानें जायचें हा दुसरा मार्ग ; पण या रस्त्यानें प्रथम तोरणा उतरणेंच महाकठीण आहे. बालेकिल्ल्याची उंची ४५७४ फूट. बालेकिल्ला चढायला त्रासदायक. तलाव, शिवमंदिर, सदर, राजवाड्याचे अवशेष हीं बालेकिल्ल्यांतलीं पहाण्याचीं स्थळें. पद्मावती, सुवेळा, संजीवनी या तीन माच्या, डुबा, तानाजी, येसाजी, यांचीं घरठाणीं भिंतींतलें छिद्र,

९३८८० / ७८।८८

चिलखती बुरूज, सदर, पद्मावतीचें मंदिर, हीं माचींतलीं प्रेक्षणीय स्थळें. वर हवालदार व गुरव रहातो. दूध—दहीं मिळूं शकतें.

७. **लोहगड - विसापूर**—पुणें—लोणावळें या रस्त्याला मळवली स्टेशनवर लोकलगाडीनें उतरणें. तिथून दीड मैलावर भाजें गांव. तिथलीं लेणीं प्रेक्षणीय. भाज्यापासून लोहगडाचा चढाव सुरू. सुमारें तीन मैल वाट. पश्चिम डोंगरावर लोहगड व पूर्व डोंगरावर विसापूर. लोहगडाच्या पायथ्याला गांव. चढण फारशी कठीण नाहीं. तीन दरवाजे, विंचूकांटा, भुयारें, शेखउमरचा दर्गा, थडगें, तळें, लोमशऋषीची गुन्हा हीं ठिकाणें पाहण्याजोगीं.

८. **पर्णाल पर्वत**—पन्हाळगड कोल्हापूरच्या वायव्येस ११ मैलांवर. एस्. टी. च्या गाड्या सुटतात. वरपर्यंत मोटार जाते. वर वस्ती आहे. गडाची उंची २०४७ फूट. घेर साडेचार मैल. राजवाडा, सज्जेकोठी, तीन-दरवाजा, वाघदरवाजा, अंधारबाव, अंबरखाना, पराशरगुहा, नागझरी, सोमाळें, साधोबाचें तळें हीं प्रेक्षणीय स्थळें. मुक्काम करायचा असला तर गडावर सोय होऊं शकते.

# अनुक्रमणिका


भाव'धारा'

दिग्दर्शन

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शिवरायाची जन्मभूमि | ... | १ |
| २. | तानाजीची वीरशय्या | ... | १९ |
| ३. | पुरंदर-रुद्रमाळ | ... | ३८ |
| ४. | शिवरायाचा 'प्रताप' | ... | ५९ |
| ५. | 'प्रचंड' तोरणा | ... | ८० |
| ६. | राजगड | ... | ९८ |
| ७. | लोहगड-विसापूर | ... | ११७ |
| ८. | पर्णाल पर्वत | ... | १३६ |

ग्रं. क्र. ५८८
१०१३६

# १. शिवरायाची जन्मभूमि

' दिवाळी झाली, आकाश निवळलें, उत्साही वारे वाहूं लागले, सूर्याचे सौम्य कर विशद झालेल्या दशदिशांना गोंजारूं लागले आणि सुखावह अशी पहिली थंडी पडूं लागली कीं माणसांना बहुधा कुठें तरी सहल करण्याची सुरसुरी येतेच. बहुतेकांची ती कल्पनेच्या पलीकडे जात नसली तरी कांहीं कृतिशूर ती अमलांतही आणतात.

पूर्वकाळीं याच ऋतूंत महत्त्वाकांक्षी राजे-महाराजे स्वारीवर जात. पाऊसकाळ संपून नदी-नाल्यांना उतार झाला कीं कित्येक व्यापारी आणि भिक्षुकही पांथस्थ होत. इतिहासकाळांतही दसऱ्याच्या सीमोल्लंघनानें कुठल्या तरी मोहिमेचें पुण्याहवाचन होई. कुठले गड, कुठले जलदुर्ग आक्रमावे याचे मनसुबे सुरू होत. आतां तुम्हांआम्हांला कोणताही गड जिंकायचा उरला नाहीं. जें काय जिंकायचें तें जिंकून झालें आहे. आतां फक्त एकच गोष्ट आपल्या वांट्याला उरते ती म्हणजे पूर्वजांनीं बांधलेले, मिळवलेले, घालवलेले, परत मिळवलेले गड–दुर्ग एकवार डोळ्यांखालून घालणें. ते बांधायला किती माणसांचा घाम गळला असेल, ते लढवायला किती लोकांना छातीचा कोट करावा लागला असेल आणि ते जिंकायला किती धारकऱ्यांना आपले पंचप्राण धारातीर्थीं न्हाणावे लागले असतील यांबद्दल समक्ष तिथें जाऊन, पाहून विवेचना करणें.

' इतिहासाचें अध्ययन म्हणजे आपल्या पूर्वजन्मांची पहाणी ' असें ऋषि विनोबा सांगतात. तसें असेल तर त्या स्थळीं पाय ठेवतांच आपल्या अंतरात्म्याला त्या तटांची, बुरुजांची ओळख पटायला वेळ लागायचा नाहीं. राष्ट्र सर्वांगीं सबळ व्हायला कोणत्या सद्गुणांची आवश्यकता असते तें तिथला प्रत्येक दगड आपल्याला सांगूं शकेल

आणि कोणते दुर्गुण राष्ट्रघाताला कारणीभूत होतात तेंही त्यालाच विचारलें तर समजून येईल. इतिहासाची पहाणी करायची असते ती मागच्या चुका पुन्हां होऊं नयेत म्हणून; किंबहुना इतिहासाची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून.

आणि म्हणूनच 'तीर्थरूप महाराष्ट्र' धांडोळून झाल्यावर मीं 'महाराष्ट्राचीं धारातीर्थें' हिंडायचीं या संकल्पाचें उदक सोडलें. महाराष्ट्राच्या इतिहासाचें उज्ज्वल महोदयपर्व शिवरायाच्या जन्मापासून सुरू होतें. तेव्हां या यात्रेचा प्रारंभ शिवनेरीपासूनच करावा हें ओघानेंच आलें. शिवाय 'अल्पारंभः क्षेमकरः' या न्यायानें ही यात्रा मला अल्प कालांत आणि अल्प श्रमांत साधण्याजोगी होती. पुण्यापासून अवघे अठ्ठावन्न मैल आक्रमिले कीं मी शिवनेरीच्या पायथ्याशीं पोंचत होतों. अवघें एका वस्तीचें काम. तेव्हां कार्तिक पौर्णिमा झाल्यावर मीं एक दिवस तांतडीचा मुहूर्त ठरवला आणि दुपारीं नव्या पुलावर जुन्नरच्या मोटारींत चढलों.

पण मी शिवनेरीच्या यात्रेला निघालों होतों, कीं दुसऱ्याच एका महायात्रेचें तिकिट काढलें होतें तें या वेळीं मला कळणें शक्य नव्हतें. आमची गाडी खडकीच्या भागांतून जात असतां पुढें पळणाऱ्या एका लष्करी ट्रकवाल्यानें हात न दाखवतां आपला ट्रक उजवीकडच्या फाटकाकडे वळवला. आमची गाडी सरळ जाऊन त्याच्यावर आदळायची आणि मग—पण आमच्या चक्रधराचें प्रसंगावधान शाबूत होतें आणि त्यालाही तसेंच उजवीकडे वळायला रस्त्याबाहेर थोडीशी मोकळी जागा होती, म्हणून आंतले चाळीस उतारू सहीसलामत राहिले. सर्वांचीं तोंडें त्या वेळीं खरोखरच पाहण्याजोगीं झालीं होतीं. मीं मनांत म्हटलें, 'अरिष्ट यायचें तें येऊन टळलें. आतां पुढचा प्रवास निर्विघ्न होईल!'

तिथून पुढें अठरा मैलांवर चाकण लागलें. गाडी थोडा वेळ थांबली. तिथून जवळच चाकणचा भुईकोट दिसत होता. त्याच्या भोंवतींचा झाडीनें आच्छादिलेला खंदकही दिसत होता. या चौकोनी भुईकोटाचा


तट तेवढा आजमितीस उभा आहे. बुरूजही अद्याप बळकट आहेत. पण आंत सगळें उजाड आणि उद्ध्वस्त. पुण्यांतल्या शनिवारवाड्याची जी गत तीच याची झाली आहे.

जुन्नरला पोंचल्यावर डॉ. व्ही. बी. गोखले यांनीं आम्हांला आपल्या घरीं निवारा दिला, आतिथ्य दिलें आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं गडावर जाण्यासाठीं मार्गदर्शकही पुढें आणून उभा केला. जुन्नरच्या पश्चिमेला अवघ्या दीड मैलावर गड होता आणि घरांतून पाय बाहेर काढल्यापासून आम्हांला तो दिसत होता. थोड्याच वेळांत शेतांतल्या एका आडवाटेनें आम्ही त्याच्या पायथ्याशीं आलों. आमच्यासमोर एखाद्या अजस्र बोटीसारखा तो किल्ला पूर्व–पश्चिम मांडला होता. आम्ही चालत होतों तें त्याचें दक्षिणांग होतें; पण आम्हांला तिथूनच वर चढूं देण्याइतकें 'दाक्षिण्य' त्याच्यापाशीं नव्हतें. त्या बाजूला नव्हता तट, नव्हता बुरूज. सगळा तुरळक झाडीचा काळा उभा कडा. वरच्या बाजूनें पुढें झुकलेला आणि त्यामुळेंच मध्यें थोडासा आंत गेलेला. ती सगळी बाजू पांखरांशिवाय कोणालाही असाध्य होती. त्याच्या चढणीची वाट गांठायची तर ती सगळी दक्षिण बाजू ओलांडून नैर्ऋत्येला जाणें भाग होतें.

शेतांतून आम्ही मोठ्या रस्त्यावर उमटलों. त्या दिवशीं जुन्नरचा बाजार होता. पुढच्या खिंडींतून पुढें सरलेल्या बैलगाड्या उतारावरून घडघडत येत होत्या. आकाश निरभ्र होतें त्यामुळें दंव अधिक पडलें होतें. वद्य पंचमीचा चंद्र गडाच्या माथ्यावरून नुकताच खालीं ढळत होता. आम्ही एकेका पावलानें वर चढत होतों तसा पाठीमागून सूर्यही चढत होता. त्याचे धांवते किरण गडाच्या तटावर उडत होते आणि काळ्या कातळांत हारीनें खोदलेल्या गुहांतून घुसत होते. जणुं शतमुख रावणाच्या मुखांत घुसणारे रामप्रभूचे अमोघ बाणच!

शिवनेरीचीं हीं शतच्छिद्रें म्हणजे बौद्ध भिख्खूंच्या निवासासाठीं आणि ध्यानधारणेसाठीं खोदलेलीं गिरिगव्हरें. यांनाच 'लेणीं' असें नांव आहे. या भागांतले बरेच डोंगर असे लेण्यांनीं पोखरलेले आहेत.

या लहानमोठ्या लेण्यांची संख्या एकशें-पस्तीस भरते आणि त्यांतलीं निम्मीं एकट्या शिवनेरीच्या अंगावर आहेत. शिविराजाच्या सत्त्वधैर्यानें यानें हे छन्नीचे घाव सोसले आहेत. ध्यानासाठीं चौकोनी कट्टा, रहाण्यासाठीं औट हात खोल्या आणि उपासनेसाठीं स्तूप किंवा 'दागोबा' असें या लेण्यांचें स्वरूप आहे.



शिवनेरीचें दूरदर्शन

मानमोडा डोंगराची ओळ शिवनेरीच्या पश्चिम भागाला येऊन चिकटते आणि त्यामुळें तिथें जी एक खिड बनते तिच्यातून पुढें गेल्यावर आम्हांला गडाची पायवाट मिळाली. हा 'मानमोडा'ही लेण्यांचाच डोंगर आहे. जुन्नरच्या पश्चिमेला 'तुळजा' टेकड्यांतही बरींच लेणीं आहेत आणि लेण्यांचा चौथा गट लेण्याद्रीच्या डोंगरांत आहे. अष्ट-विनायकांपैकीं 'लेण्याद्रि' तो हाच. या लेण्याद्रीच्या उदरांत एका काळीं बौद्ध भिक्खूंचा फार मोठा संघ रहात असे. या भागावर त्यांचेंच

धर्मशासन चालत होतें. इ. स. पूर्वी कमीत कमी शंभर वर्षांची ही खोदाई असली पाहिजे हें अंतर्गत रचनेवरून कळून येतें. अर्थात् शिवनेरी किल्लाही तितका तरी प्राचीन असलाच पाहिजे. बौद्धांचे पंथ दोन. हीनयान आणि महायान. महायान पंथाच्या उत्पत्तीच्या वेळीं बुद्ध हा देवत्व पावला होता आणि म्हणून त्यांनीं आपल्या लेण्यांतून त्याच्या चंड-प्रचंड मूर्ति खोदल्या. हीनयान पंथाचे लोक मात्र बुद्धाच्या रक्षावशेषांवर ढोलावर नगारा पालथा ठेवावा तशा आकाराचे स्तूप उभारीत आणि त्यांचीच उपासना करीत. जुन्नर भागांतलीं लेणीं हीनयान पंथाचीं आहेत.

पीरवाडी खिंडींतून तोंडावरच्या ठेंगण्याठुसक्या वडाखालून आम्ही एक टप्पा वर चढलों. ज्यावरून या भागाला पीरवाडी असें नांव पडलें आहे तें पिराचें कबरस्तान डाव्या हाताला दिसलें. तिथेंच जवळ जें एक आवार आहे तें पूर्वीचें भातखळें गांव. जेव्हां किल्ल्यावर वस्ती होती तेव्हां किल्ल्याचा बाजार या खेड्यांत भरत असे. गडाच्या या नैर्ऋत्य बाजूकडून 'सूतोवाच' करून आम्ही चढत चढत पश्चिम अंगाला जाऊं लागलों. अर्धा डोंगर आक्रमल्यावर गडाचा पहिला दरवाजा भेटला. या द्वाराला महाद्वार असें कांहीं म्हणतां आलें नसतें. तिथून सुमारें शंभर कदमांवर दुसरा दरवाजा लागला. त्याचें नांव 'परवानगीचा दरवाजा.'

पण त्या निर्मक्षिक जागीं आम्हीं परवानगी कोणाकडे मागायची? खालच्या उतारावर वाढलेल्या सागवानाकडे, वरून ढासळून एक-मेकांचे काळ झालेल्या दगडांकडे, का इतस्ततः वाढलेल्या त्रिधारी निवडुंगांकडे? आम्ही निश्शंकपणें आंत घुसलों. दाराच्या कमानीवर जबडे उघडलेल्या वाघ-सिंहांचीं चित्रें होतीं; पण मोरोपंतांनीं आम्हांला सांगून ठेवलें होतें,

**"न बुडविति न वा तारिति चित्रें बरवींहि आडनांवांचीं"**

दरवाजाच्या आंत गेल्यावर सहजपणें नजर वर गेली. तिथें एकावर एक दोन-तीन मजबूत बांधणीचे आणि भव्य बुरूज दिसले. सबंध गड


पायांखालीं घातल्यावर मग आम्हांला कळून आलें कीं, गडाच्या तिन्ही बाजू कडा तुटलेल्या अतएव दुर्गम आहेत. पश्चिम बाजू हीच काय ती सुलभ, सोपारी असल्यामुळें इकडेच तेवढी तटबंदीची गरज आहे.

तिथून चिंचोळ्या रस्त्यानें आणखी थोडें पुढें गेल्यावर हत्तीदरवाजा आणि पीरदरवाजा असे आणखी दोन दरवाजे लागले. पीरदरवाजा सुश्लिष्ट बांधणीचा आहे. हे चारी दरवाजे ओलांडीपर्यंत रस्ता सामान्यतः सपाटीचा आहे. त्यामुळें आपण सहजपणें श्वास न लागतां, घाम न गळतां गड सर करूं असें वाटतें; पण पीरदरवज्यांतून आंत जातांच समोर ठाकलेली ती खडी चढण पाहिली कीं तत्काळ त्या भ्रमाचा निरास होतो. एका बाजूला तट आणि दुसऱ्या बाजूला डोंगर यांच्या-मधून अरुंद वाटेनें एकेक पाऊल टाकीत आपल्याला शिवाबाईच्या महाद्वारांत यावें लागतें.

चढतांना सिंहावलोकन करायला गेलों तर मागच्या अंगाला जुन्नर खोरें, एक मोठेंथोरलें वळण घेऊन पसरलेलें दिसलें. हें खोरें सुपीक असलें पाहिजे हें सहज कळून येतें. दोन्ही बाजूंच्या डोंगरांतला गाळ येऊन त्यांत सांठतो, पसरतो. तिथली जमीन सस्यशालिनी अतएव हरित-वर्णी होती. झाडें हिरवीं होतीं अन् पलीकडच्या टेंकड्यांचा बांधही हिरवाच होता. कुसूर, कालें, तांबें हे ग्रामवस्तीचे पुंज एकापुढें एक असे वृक्षराजींतून डोकावत होते. त्यांमधून उठणाऱ्या धूमशिखा इकडे वळूं का तिकडे वळूं या संभ्रमांत घोटाळत होत्या. पलीकडचें तें जुन्नरला जलप्रदान करणारें बदामतळें आपल्या निळ्या जळांत वरचें निळें आकाश जेवढें मावेल तेवढें सांठवून निःस्तब्ध बसलें होतें. त्या खोऱ्याचाच मोठा थोरला पाट करून प्रकाशाचा लोंढा त्यांतून वहात होता. आणि या रम्य दर्शनानें माझ्या हृदयांतही आनंदकल्लोळ उठत होते.

मला वाटलें, किती सुखी, किती तृप्त, किती प्रसन्न असतील या खोऱ्यांतलीं माणसें! यांना तळीं–वरी सगळीकडे सुखच सुख! 'हाऊ ग्रीन वॉज माय व्हॅली' नांवाचा एक चित्रपट मीं कधीं तरी पाहिला

होता त्यांतले देखावे कल्पनाचक्षूंपुढें सजीव झाले. माणसें खेडीं सोडून शहराच्या गजबजाटांत येऊन राहिलीं आणि त्यांनीं आपल्या जीवनाची स्वहस्तें खिचडी केली. नगरवासी जन केवढ्या आनंदाला आणि संस्कारांनाही मुकतात त्याबद्दल मीं माझ्यासकट सगळ्यांची कींव केली.



शिवाईचें मंदिर

पांचवा शिवाबाईचा सागवानी दरवाजा ओलांडतांच आम्ही पुन्हां थोडे मोकळ्यावर आलों. तिथून खोदलेल्या पायऱ्यांचा एक रस्ता उंच जातो आणि उजव्या हाताला शिवाबाईच्या देवळाकडे जाणारी वाट फुटते. तिच्या मंदिराचें दगडी महाद्वार ठेंगणें आणि अरुंदच आहे. पांढऱ्या चाफ्याच्या झाडांनीं त्यावर आपल्या दाट पानांची सावली केली


आहे. हें मंदिर उभ्या कड्यावर डोंगराच्या पोटांत आहे. पूर्वीच्या एका लेण्याच्या गुहेंतच पुढें या देवीची स्थापना झाली आणि नंतर समोर सभामंडप उभारला गेला. शिवाभवानीचा पुत्र विनायकही लेण्याद्रीच्या डोंगरांत असाच 'आयत्या बिळांत गणोबा' झाला आहे. देवी आणि विनायक हे या जुन्नरखोऱ्याचे कुलदेव असें म्हणायला हरकत नाहीं. देवीकडे पाठ करून देवळापुढच्या त्या प्रादेशमात्र जागेंत उभें राहिलें कीं डाव्या हाताचा तो कडा राक्षसासारखा 'खाईन' म्हणून येतो आणि खालीं पाहतांना भोंवळ आल्यावांचून राहत नाहीं.

या शिवाईच्या कृपेनेंच आपल्याला पुत्ररत्न लाभलें म्हणून जिजाबाईनें त्याचें नांव शिवाजी ठेवलें असें सांगतात. तिथें शुक्र आड-नांवाचे दोघे बंधु थोडें गोधन संभाळून अन् देवीची पूजा करून राहिलेले आहेत. देवीला वर्षासन नाहीं; पण गडाच्या परिसरांतले शेतकरी त्यांना पसापायली धान्य देतात आणि प्रवासी लोकांच्या खिशांतून देवीच्या ताटांत जें पडेल तें त्याचा वरखर्च भागवतें. देवीच्या-पुढें उंच धारदार नाकाचा आणि उठावदार डोळयांचा, कुंकू फासलेला पुतळा दिसला. भटजी म्हणाले, 'हा देवीचा मूळचा 'तांदळा.' चतुर्भुज मूर्ति यानंतरची.' तिथेंच एक उघडें टाकें आहे. पुजाऱ्यानें जर त्याच्या-वरून रोज हात फिरवला असता तर त्यावर आजची हिरवी जाड साय मांडली नसती. पण पुजारी तरी कुठें पुरा पडेल! गडावर अशीं एकूण चावन्न टाकीं आहेत.

पुढच्या चढावावरचे फाटक आणि कुलापकर हे आणखी दोन दरवाजे ओलांडून आम्हीं सातांचा आंकडा मोजला. तिथेंच अंबर-खान्याची पडकी इमारत लागली. आम्हीं तळघरांत धान्य सांठवण्याच्या खोल्या पाहिल्या. वरच्या गच्चीवरही चढलों. तिथून आम्हांला कळलें कीं, आम्ही गडाच्या माथ्यावर पोंचलों आहों. आतां डाव्या पालथणानें रानजाईचीं फुलें तोडीत, फुललेल्या गवताचा वास घेत आम्ही थोड्याच वेळांत शिवछत्रपतींच्या जन्मभूमीवर पोंचणार होतों.

पण त्या गंगा-जमना टाक्यांनीं मध्यें आमची वाट अडवली. जवळ

जाईपर्यंत इथें दोन जलाशय आहेत याची कल्पनाही आली नाहीं. येईल कशी ? तीं तर भूगर्भांत खोदलेलीं आहेत. दोन्ही आवळयाजावळया बहिणींसारखींच एकमेकांना चिकटून आहेत. दोहोंचीही लांबीरुंदी सारखीच ! दोहोंच्याही पुढें उघड्या दीर्घ चौकोन पुष्करिणी. पलीकडे दगडी बांध, त्यांवर बसतां येईल एवढीच पडवी आणि आंत दूरवर थंड, स्वच्छ, स्तब्ध जलाचा सांठा. मावळतीच्या सूर्यानें चारदोन किरण आंत पोंचवले तरच त्यांना उजळा मिळायचा. वरची जमीन खालीं खचूं नये म्हणून खोदतांना त्यांना आंत चार चौकोनी आधारस्तंभ ठेवलेले आहेत.



कमानटाकें

हिंवाळ्यामुळें आतां त्यांचें पाणी आंगूळभर ओसरलें होतें आणि कडेच्या ओलसर भागावर शेवळ्याची हिरव्या-पिवळ्या छटेची नाजूक सुंदर रेषा विराजत होती. मला कळेना कीं, हिला आपोदेवीचें कटिसूत्र म्हणावें का पाचूची चौकट म्हणावी ? किंवा ज्ञानेश्वर ' साहित्य आणि शांति । ' रेखा ' दिसे बोलती ' म्हणतात ती रेखा हीच ?

माझ्या शेजारीं ओणवून पहाणारा मुलगा मला म्हणाला, ' पाणी फार खोल नाहीं; हा पहा तळ दिसतोय.' मीं म्हटलें, ' वेड्या ! तो तळ नव्हे. वरच्या दगडी पटईचं प्रतिबिंब आहे तें. ' मला त्या वेळीं देवगिरीवरच्या कवडीटाक्याची आठवण झाली. तेंही हुबेहूब असेंच आहे. जणुं तें उपमेय आणि हीं दोन उपमानें. या दोन टाक्यांपेक्षांही आणखी एक मोठें टाकें किल्ल्याच्या दक्षिण अंगाला आहे; त्याला कमानटाकें म्हणतात. एका उंच पथ्थरांत खोलवर तें खोदलेलें आहे. हेंही काम देवगिरीच्याच पद्धतीचें. यावरून या गडावर कांहीं शतकें (इ. स. ११७० ते १३१८) देवगिरीच्या यादवांची सत्ता चालत होती हें अजूनही समजतें. यादव आले आणि त्यांनीं टाकें खोदलें. त्यांना घालवून मुसलमान आले आणि त्यांनीं त्याच्या डोक्यावर मशीद उभारली. ते खालीं गेले; हे वर चढले !

**" अधः कूपस्य खनक ऊर्ध्वं प्रासाद्कारकः "**


आणि कमानटाक्याजवळचेंच शिवाजीचें जन्मस्थान म्हणजे गडावरच्या मराठी अमलाची साक्ष ! सुमारें दहा वर्षांपूर्वीं मी जेव्हां शिवनेरीवर आलों होतों तेव्हां हें जन्मगृह अर्धवट पडून नशिबाला निखंदीत कसेंबसें उभें राहिलें होतें.

**" काशी की कला जाती, मथुरा मशीद होती**
**ना होता शिवाजी तो सुनत होत सबकी "**

या शब्दांत भूषणकवीनें ज्या महाराष्ट्राच्या हिंदवी स्वराज्यस्थापकाला गौरवलें, त्या महापुरुषाचें हें जन्मस्थान म्हणून एखाद्या परकी प्रवाश्याला सांगतांना शरमेनें मान खालीं व्हावी अशी त्याची उपेक्षित

अवमानित दशा होती ! पण आज मी तिथें निराळेंच दृश्य पहात होतों. हें कसें झालें, कोणीं केलें, म्हणून आश्चर्य करीत होतों.

आजमितीस ती खोली सुंदर दुमजली बांधलेली आहे. वरच्या मजल्यावर विश्रांतीसाठीं सुरेख सोपे केलेले आहेत. आसमंत पहायला छानदार गवाक्षें ठेवलेलीं आहेत आणि प्रवाश्यांना न्याहारी करून तिथेंच उष्ट्याखरकट्याची घाण टाकायला परवानगीही ठेवलेली आहे. त्याच्या आजूबाजूला आशेनें पाहून मीं म्हटलें,' या स्थानाचा जीर्णोद्धार



शिवरायाचें जन्मस्थान

कधीं झाला याविषयीं इथें एखादा फलक लावून ठेवला असता तर ‘ कोणाचें काय वा गेलें ’ असतें ?

त्या जागीं पूर्वकाळीं मोठा वाडा असल्याच्या पडक्या खुणा आजही दिसतात. या वाड्यांतलेंच हें एका बाजूचें दालन. याच प्रसूतिगृहांत शके १५५२ च्या फाल्गुन वद्य तृतीयेच्या दिवशीं जिजाई जाऊन बसली. त्या प्रसंगीं तिथें कोणता सरंजाम होता त्याचें परमानंद कवीनें तपशीलवार वर्णन केलें आहे—

“......वृद्ध आणि कुशल सुइणी जागरूकपणें उभ्या होत्या. जिजाईची मर्जी राखून वागणाऱ्या जीवींच्या सख्या-सांगातिणी तिला धीर देत होत्या. विश्वासू, उपचारकुशल आणि हातगुणाचे धन्वंतरी उंबऱ्यांत बसून राहिले होते. चुन्यानें सारवलेल्या भिंतींवर स्वस्तिकें रेखलेलीं होतीं. छताच्या कडेला मोत्यांच्या झालरी लावलेल्या होत्या. ताजे पंचपल्लव आणून ठायीं ठायीं खोचलेले होते. सुवर्णकलश अग्रोदकानें भरून मांडलेले होते. द्वाराच्या उभय बाजूंस विघ्नहर्त्यां देवता चितारलेल्या होत्या.

“ अपक्रामन्तु भूतानि पिशाचाः सर्वतोदिशम् ”

म्हणून सर्वत्र मोहऱ्या विखरून टाकलेल्या होत्या आणि सगळीकडे मंगलदीप पाजळले होते.”

आणि त्याच दिवशीं सायंकाळीं भास्वान् सूर्य पश्चिमेच्या ‘ काळा थाचा ’ टेकड्यांवरून खालीं उतरल्यावर महाराष्ट्राचा हा ‘ प्रतापभानु ’ इथें उगवला. इंद्र जन्माला येतांच जशीं असुरसाम्राज्यें हादरलीं तसेंच कांहीं तरी या वेळीं यवनी सत्तेला झालें असेल ! या जन्मघराजवळच एक पडकी खोली अजून दिसते ती शिवाजीची न्हाणी असें सांगतात. तिथें जमिनींत खोदलेला एक रांजण दिसतो त्यावरून तें खरेंही वाटतें. परमानंद सांगतो कीं, ‘ त्या वेळीं देवसेना, शची, स्वाहा, अदिति, अरुंधती या जगन्माता स्वर्गांतून ‘ अचलाई ’ त्या गिरिशिखरावर उतरल्या आणि त्यांनीं या अलौकिक बाळाला उष्णोदकाचें

सुवर्णकलश भरभरून न्हाऊं घातलें.' मी तर त्याच्यापुढें जाऊन असेंही म्हणतों कीं, त्यांनीं न्हाऊं-माखूं तर घातलेंच असेल ; शिवाय अंगाई-गीतेंही म्हटलीं असतील. एखाद्या पुरुषाचें अवतारीपण सिद्ध झालें कीं त्याच्या जन्माभोंवतीं कवि-महाकवि असेंच दिव्य तोजोवलय निर्माण करीत असतात. विभूतिपूजकांना तें हवेंच असतें.

एवढें सगळें कोडकौतुक झालें खरें ; पण या सुलक्षणी मुलाचें 'पुत्रावण' करून मुख पहाण्याचें सुख मात्र शहाजीच्या दैवांत नव्हतें. शिवजन्मापूर्वीं मोंगलांच्या स्वारीवर गेलेला शहाजी, शिवाजी वर्षाचा झाल्यानंतर परत आला. लटपटतीं पावलें टाकीत जवळ येणाऱ्या या शिशूला पाहून शिवबाच्या भावी पराक्रमाची झलक त्याला त्याच्या डोळ्यांत दिसली असेल काय ?

निजामशाहीच्या त्या शेवटच्या धामधुमीच्या काळांत शिवनेरी किल्ल्यावर सरकारी किल्लेदार असे. या ठिकाणीं शिवजन्म कसा झाला याविषयीं बखरकारांना नीट उलगडा झालेला नाहीं. त्यामुळें वस्तु-स्थितीचा मेळ घालण्यासाठीं त्यांना एका दंतकथेचा आश्रय घ्यावा लागला आहे—

मोंगल आणि शहाजीचा खुद्द सासरा जाधवराव असे दोघे शहाजीच्या मागें लागले. शहाजी त्यांच्या रेट्यांमुळें पळत सुटला. त्या पळापळींत भरल्या दिवसाची जिजाबाई त्याच्याबरोबर होती. तिचा प्रसवकाळ नजीक येऊन ठेपला असें पाहून शहाजीनें तिला वाटेंतच सोडली. कदाचित् तिच्यावरील रागानेंही असेल. मग ती जाधवरावाला दिसली. त्यानें तिला गडावर नेऊन पोंचवलें आणि मग ती तिथेंच बाळंतीण झाली.

पण ही किंवदंती आतां त्याज्य ठरली असून शिवभारतकार परमानंदाचें मतच ग्राह्य ठरलें आहे. शहाजीचा वडील मुलगा संभाजी याच्याशीं शिवनेरीचा किल्लेदार विश्वासराव यानें आपल्या मुलीची सोयरीक ठरवली. त्या लग्नासाठीं जें वऱ्हाड गडावर आलें त्यांत

जिजाबाईही आली. घरचें कार्य असल्यामुळें जिजाबाईला रहावलें नाहीं. लग्नसोहळा उरकून शहाजी स्वारीवर गेला आणि ती प्रसूतीसाठीं त्याह्यांकडेच राहिली.

आणि ही गोष्ट किती चांगली झाली! शिवाजीसारख्या 'धर्म-स्थापनेच्या नरानें' अशा उंच, मोकळ्या जागीं, निळ्या नभाखालींच जन्मायला हवें होतें. 'मोतीजडित सोन्याची कुंची, माथ्यावर सुवर्णाचें पिंपळपान, पाचेनें जडवलेलें वाघनख, हृदयावर रुळणारी शिवतीची प्रतिमा, पायांत चाळ-वाळे, कपाळीं तीट अशीं बाळलेणीं लेवून गडावर खेळणाऱ्या बालशिवाजीला अनंताच्या गोल घुमटांत वाऱ्याशीं एकरूप होऊन फिरणारे स्वातंत्र्याचे विचार सहजपणें येऊन कानांशीं लागले असतील. त्याची दृष्टि सहजच विशाल झाली असेल.

"I hear the echoes through the mountains throng"

असें वर्डस्वर्थ म्हणतो त्याप्रमाणें किती तरी ध्वनि सभोंवतींच्या पर्वतराजीवर आदळून प्रतिध्वनीच्या रूपानें दुमदुमत त्याच्या कानीं आदळले असतील. 'भ्रष्टविल्या गुजरिणी-ब्राह्मणीं'चे चीत्कारनाद, धडाधड कोसळणाऱ्या मंदिरांचे भयनाद, घणाघातानें चूर्ण होणाऱ्या देवमूर्तींचे करुणनाद, चिरल्या जाणाऱ्या गायींचे आर्तनाद आणि असेच किती तरी ......

इ. स. १४४३ मध्यें हा किल्ला यादवांच्या हातून निखळला आणि मलिक उल्तुजार या बहामनी सरदारानें त्याचा कबजा केला. त्या-नंतर अवघ्या बेचाळीस वर्षांनीं मलिक अहमद हा तुजारचा प्रतिनिधि म्हणून इथें आला; पण इथला किल्लेदार किल्ला त्याच्या स्वाधीन करीना. मलिक अहमदाला मग किल्ला वेढावा लागला, आंतल्या माणसांची रसद तोडावी लागली आणि अशा रीतीनें किल्लेदाराला पायाशीं आणावें लागलें. मलिक अहमद चांगल्या मुहूर्तावर निघाला होता असें म्हटलें पाहिजे. कारण त्याला किल्ल्याबरोबरच घबाडही मिळालें. महाराष्ट्राचा

पांच वर्षांचा वसूल त्या किल्ल्यात आयदान होता तो सगळा त्याच्या हस्तगत झाला. एकदम उखळ पांढरें झालें. त्या आयत्या द्रव्याच्या बळा-वर त्यानें महत्त्वाकांक्षा वाढवली आणि फौजही वाढवली. इकडचा सर्व मुलूख काबीज केला. पुढें एकाच वर्षानें तुजारचा खून झाला आणि आतां आपल्याला अडपता-दडपता कोणी उरला नाहीं याची खात्री होऊन त्यानें आपलें स्वतंत्र राज्य स्थापलें. निजामउल्मुक्र भैरी अशी किताबतही धारण केली.

दुसरा महमदशहा बहामनी याला त्या गोष्टीची तिडीक उठली. या नव्या राजाचें पारिपत्य करण्यासाठीं त्यानें चाकणच्या सुभेदाराला निकडीचा खलिता पाठवला. सुभेदार त्या मोहिमेवर दौडला खरा; पण हात दाखवून अवलक्षण केल्यासारखें झालें. मलिक अहमदनें त्याचें तर कंबरडें मोडलेंच आणि वर चाकणचा किल्लाही बळकावला. याच अहमदानें पुढें १४९४ त एक नवें शहर वसवून आपली गादी तिथें नेली आणि त्याला अहमदनगर असें नांव ठेवलें. १५६५ त अहमद-नगरचा चौथा राजा मूर्तिजा निजामशहा यानें आपला भाऊ शहा कासीम याला शिवनेरीवरच बंदिवास भोगवला होता.

१६५७ त शिवाजीनें याच जुन्नरावर स्वारी करून अकरा लाखांची लूट नेली. पुढच्या दोन शतकांत याच्यावरच्या राजवटी सारख्या बदलत राहिल्या.मराठ्यांकडून मोंगलांकडे, मोंगलांकडून पेशव्याकडे अन् पेशव्यां-कडून इंग्रजांकडे असें स्थूलमानानें सांगतां येईल. १८१८ त मेजर एल्ड्रिज् यानें इथें इंग्रजांचें निशाण उभारलें. १८४८ त इथें कांहीं चिनी कैदी आणून ठेवण्यांत आले होते. इथें जीं सागाचीं झाडें दिसतात तीं त्यांच्याच हातचीं आहेत.

गडावरचें वारें, पाणी पीत मुक्तच्छंदानें हिंडत असतांना माझें मन ऐतिहासिक घडामोडींच्या स्मरणांत गुंतलें होतें; पण डोळे मात्र एक निराळेंच लक्ष्य शोधीत होते. मला पहायचा होता तो 'कोळीचौथरा.' मीं त्याचा इतिहास वाचला होता. १६५० च्या सुमारास पुणें प्रांतांतल्या कोळी जमातीनें मोंगलांविरुद्ध मोठें बंड केलें. मोंगलांना तें

मोडून काढण्यासाठीं कडवें सैन्य पाठवावें लागलें. त्यानें कोळ्याचा चहूंकडून कोंडमारा केला. अनेकांच्या मुसक्या आंवळल्या. अनेकांचीं क्रूरपणें मुंडकीं उडवलीं आणि जिथें हा नरमेध उरकण्यांत आला तिथें एक फरस बांधून ठेवला. कोळीचौथरा तो हाच !

उंटाच्या पाठीवर मदार तसें गडाच्या पाठीवरचें एकच टेकाड आतां आमचें चढायचें उरलें होतें. तें केवळ मातीचें होतें अन् त्यावर गवत बरेंच वाढलें होतें. तिथल्या दोन वस्तु आमचे पाय वर ओढीत होत्या. एक तें चौकोनी जोत्यावर बांधलेलें जुनाट थडगें आणि दुसरा 'इदगा.' इदगा म्हणजे ईदच्या प्रार्थनेसाठीं मुद्दाम उभारलेली दगडी भिंत. या भिंतीला दोन बाजूंस मनोरे आहेत आणि मधें अर्धवर्तुलाकृति पालथे चिरे हारीनें बसवलेले आहेत. भिंतीच्या मध्यावर सात पायऱ्यांचें उच्चासन आहे. त्यांच्या धर्मगुरूला त्यावर पाय सोडून बसतां येतें. ही वास्तु म्हणजे इथल्या यवनी राजवटीचा अवशेष हें न सांगतांच समजण्याजोगें आहे.

या मधल्या टेंबावर चढतांच मला दिसून आलें कीं, हा गड केवळ आडवाच नाहीं, तर उभाही आहे. तो एक सुंदर त्रिकोण आहे. त्याची उत्तरेची बाजू निमुळती आहे. सभोंवार नजर फिरवितांच आठ–दहा कोसांचा परिघ दृष्टिपथांत आला. ईशान्येला कुकडी नदी आणि तिला 'अनुकूल' असें तें जुन्नर! आज हें गांव लघु झालें असलें तरी प्राचीन काळीं हें एक महत्त्वाचें व्यापारी ठाणें आणि राजकीय उलाढालींचें केंद्र होतें. जुन्नर म्हणजे जुण्ण नगर. 'जुण्ण' हें जुनें या शब्दाचें प्राकृत रूप. जुन्नरसारखेंच इथें 'भिन्नर' नांवाचें दुसरें एक खोरें आहे. इथें एका काळीं शक लोक रहात होते. क्षहरात या शकांच्या एका पोटजातींतल्या नहपान या शकराजाची जुन्नर हीच राजधानी होती. खिस्तपूर्व पहिल्या शतकांत शक उज्जयिनीस स्थायिक झाले होते. सौराष्ट्रांतही त्यांचें वर्चस्व स्थापन झालें होतें. भडोचहून ते निघाले आणि डांग प्रदेशांतून नाशिकला आणि कल्याणवरून काल्यांला आले आणि नंतर चिमटा आवळून त्यांनीं जुन्नर काबीज केलें. महाराष्ट्रांत लोकप्रिय

आणि बद्धमूल होण्यासाठीं त्यांनीं नळराजाप्रमाणें अलोट दानधारा वाहवली. अनेक इष्टापूर्त कर्मे केलीं. धर्मशाळा उभारल्या, घाट बांधले, धरमतरी ठेवल्या आणि सहस्रभोजनेंही घातलीं. महाराष्ट्रीयांनीं त्यांच्या या दानधर्मांतला अंतस्थ कावा ओळखला. थोड्याच काळांत गौतमी-पुत्र सातकर्णी याच्या झेंड्याखालीं संघटित होऊन त्यांनीं क्षत्रपांचे कंद छेदले. जुन्नरला क्षहरातांचा भाग्यरवि चढला आणि नाशिकला पडला असें श्री. स. आ. जोगळेकर सांगतात.

जुन्नरच्या पलीकडे पसरलेल्या विशाल मैदानांत मधेंच कांहीं टेकड्या उठावल्या आहेत. पुढें क्षितिजाजवळ त्या भांबेरीच्या अन् त्यांना लागूनच गवळीटेकड्या दिसतात. उत्तरेला म्हारघाटाच्या बाजूस सपाट टेकड्यांच्या रांगेंत 'हरिश्चंद्र' या सह्याद्रींतल्या गडाचा प्रचंड चौथरा दिसतो. त्याच्या अलीकडच्या टेकडीवर हाटकेश्वरानें वस्ती केली आहे आणि तिच्या आडोशाला त्या लाजाळू 'नवरा-नवरी' टेकड्या. लहानशा जागीं गर्दी करून तीं सात-आठ टोंकदार शिखरें उभीं आहेत. मधलें जरा अंगापिंडानें भरदार तो 'नवरा' आणि त्याच्याच शेजारीं कृशतनु ती 'नवरी' अशी मीं उचित कल्पना केली. कोणाचें तरी वऱ्हाड हाटकेश्वराच्या प्रकोपानें इथें 'अचल' पर्वत होऊन पडलें अशा दंतकथेला अनुसरून यांना 'वऱ्हाडी डोंगर' अशीही दुसरी संज्ञा आहे. वऱ्हाडच नव्हे; तर दूर अंतरा-वरून वाजंत्रीं वाजवीत जाणारे महारसुद्धां डोंगर झाले. 'महारटेकड्या' या देवळाच्या कातीव कळसासारख्या प्रेक्षणीय दिसतात.

जुन्नरखोरें नाणेघाटाच्या मुखाशीं येऊन संपतें. तिथेंच 'जीवधन' हा किल्ला आहे. हा शिवनेरीचा भाऊच म्हटला पाहिजे. 'नानाचा आंगठा' हा महापाषाण जर आड आला नसता तर मी नाणेघाट पाहूं शकलों असतों. पूर्वकाळीं हाच घाट मुख्यत्वेंकरून देश आणि कोंकण यांना जोडणारा दुवा होता. चौल, कल्याण, सोपारा या बंदरांत चढणाऱ्या–उतरणाऱ्या मालाची वाहतूक याच उंच, नागमोडी घाटांतून होत असे. या घाटाच्या मस्तकावर खडकांत खोदलेला एक

रांजण आहे आणि त्याच्या वजनदार झांकणाला मधें छिद्र आहे. व्यापारी आपल्या मालाच्या जकातीचें द्रव्य त्या छिद्रावाटे रांजणांत टाकीत अशी आख्यायिका आहे.

नाणेघाटाच्या दक्षिणेस 'काळा थांबा' टेकड्यांमधून भीमाशंकराचा रस्ता जातो. मांगणी टेकड्यांच्या अलीकडे लेण्यांनीं पोखरलेला तुळजाडोंगर आहे. आम्हीं पाहिलें तेव्हां तो सगळा उन्हांत न्हात होता; पण मधेंच एका जागीं काळसर, चौकोनी असें एक गुहामुख दिसत होतें तेंच तुळजादेवीचें मंदिर. हा सगळा आसमंत मीं दोनतीन ठिकाणांवरून वेगवेगळ्या कोनांनीं पाहिला. शिवनेरीचा हा विस्तीर्ण परिवेष विशेषसा सुंदर नाहीं. जवळचे डोंगर तर केव्हांच दिवाळखोर झाले आहेत. त्यांच्या धुपलेल्या अंगावर आतां कोणतेंही बीज रुजणार नाहीं. गाईवांसरें नवतृणाच्या आशेनें त्याच्यावर कधींही पाऊल ठेवणार नाहींत. गुराख्यांचा पांवा त्यांच्यावर कधींही वाजणार नाहीं. द्विजगणांचें प्रभात-संगीत त्यांना कधींही ऐकायला मिळणार नाहीं. त्यांनीं आपल्या पाठी दिवसभर उन्हांत तापवून घ्यायच्या आणि रात्रीं आकाश आपल्यासाठीं चार करुणेचे अश्रु ढाळील का म्हणून आस्तावून रहायचें.

---


# २. तानाजीची वीरशय्या

'जीं शिखरें आपण एकदां गांठलीं होतीं, ज्यांच्यावर आपण एकदां उभे ठाकलों होतों, त्याच शिखरांवर पुन्हां पुन्हां चढावें लागणें हें किती वाईट!' म्हणून अॅमिल या एका पाश्चात्य तत्त्ववेत्त्यानें 'अरेरे!' असे उद्गार काढले आहेत. पण सिंहगड दुसऱ्यांदां चढतांना असल्या कष्टी, खिन्न विचारांना माझ्या मनांत थारा नव्हता. उत्साहाचें चिलखत आणि आनंदाचा जिरेटोप चढवूनच मी त्या कामगिरीवर निघालों होतों.

पुण्याच्या स्वारगेटावरून सिंहगडाला जाणाऱ्या मोटारी नेहमीच सुटतात. आम्हीं पहिली गाडी पकडली. ती सरत्या मार्गशीर्षाची सकाळ होती. उदयाचलाच्या मागच्या अंगानें धूसर प्रकाशाचे लोंढेच्या लोंढे वर उठावत होते. खालची शुक्राची चांदणी केव्हांच त्या महापुरांत बुडली होती. वरची कृशांगी चंद्रकोर त्याच धास्तीनें निस्तेज पडली होती. आमच्या गाडीनें नगरसीमा ओलांडून पर्वतीला वळसा घातला. विठ्ठलवाडीला भेटलेली मुठा नदी थंडीमुळें तोंडांतून वाफा सोडतांना दिसली. पात्रांतल्या दगडधोंड्यांवर बाष्पाची मऊ मऊ दुलई पसरली होती. बागांतल्या केळी आपल्या अंगावरचें दंव .झाडून .टाकण्याच्या उद्योगाला लागल्या होत्या. उंसाच्या मंळ्यांनीं तुषारवृष्टीपासून संरक्षण मिळावें म्हणून लांब दांड्यांचे धुरकट जांभळे तुरे डोक्यावर धारण केले होते. हरभरा मात्र खुषींत होता. दंवबिंदूंतल्या जीवनावरच त्याच्या घाट्यांतले दाणे पोसणार होते.

खडकवासल्याचें धरण मागें टाकून गाडी जेव्हां नदीकांठानें उगमाकडे जाऊं लागली तेव्हां त्या सांचलेल्या जलराशीचें गांभीर्य आजूबाजूच्या वातावरणावर उमटलेलें दिसलें. नदीनें फुगून पसरून

पलीकडच्या डोंगरांना कंबरभर पाण्यांत उभें केलें होतें. थोड्याच वेळांत डोणजें आलें. गडाच्या पायथ्याच्या आतकरवाडींत येऊन गाडीनें सुस्कारा सोडला. दुसऱ्याच क्षणाला तिचा भार उतरला. वाडींतल्या बाया गोकुळच्या गौळणींसारख्या गोरसाचीं मडकीं डोक्यावर घेऊन पुढें आल्या. पुरुषमंडळी हमाली मिळते का, पाहूं लागली.



सिंहगड—पायथ्याजवळून

त्याच वेळीं गडाची उत्तर बाजू प्रकाशानें झळाळली. हिरव्या रंगावर सुवर्णकांति चढली. तो दुर्गराज आरोहणाचा मार्ग उजळून प्रवाश्यांना स्पष्ट जाणीव देऊं लागला. 'नीट लक्ष देऊन एकदा समोर पहा. माझ्या पूर्व-वायव्य लांबीवर मधोमध असलेल्या या एकाच कणीवरून तुम्हाला उभ्या उभं तीन मैल वर चढलं पाहिजे. आजूबाजूला सरकलांत तर दोन्ही बाजूंना घळींचीं तोंडं उघडलेलीं आहेत. ही मोक्ष-पटांतली सर्वांत उंच शिडी समजा. एका गतीनें संथपणें पावलं टाकीत चालाल तर विशेषशी दमणूक न होतां माथा गांठाल. हांवरेपणा कराल तर उगाच रक्ताचं पाणी करून घ्याल ......'

पण माझे दोघे सोबती नवतरुण होते. त्यांना हा सावधानतेचा

इषारा कुठला मानवायला! चढायला प्रारंभ करण्यापूर्वी पायथ्याशी आम्ही थोडे रेंगाळलों होतों. आमच्या गार्डीतली इतर मंडळी एक टप्पा चढून वर गेलेली दिसत होती. माझ्या मित्रांना त्यांना मागें टाकण्याची सुरसुरी आली. ते मुख्य रस्ता सोडून कारवीच्या जंगलांतून लपत-छपत जाणाऱ्या मधल्या वाटा (Short-Cut) शोधूं लागले. मला त्यांचा मागोवा घेणें भाग पडलें. एक-दोनदां आमचें साधलें; पण त्यानंतर तशाच एका प्रयत्नांत आम्ही भलतीचकडे झुकलों. वाट वर जाण्याऐवजीं आडवी जाऊं लागली आणि थोड्याच वेळांत पूर्णपणें बुजली. जिथें चूक उमगली तिथूनच आम्हांला आता वर चढणें भाग होतें.

मात्र ती गोष्ट सोपी नव्हती. वाळला पाचोळा आमचा पाय टिकूं देईना. धरावें तें झुडूप कांटेरी. पकडावी ती वेल सर्वदिशीं अंगावर यायची. 'आम्हीच दुसऱ्याच्या आश्रयानें जगतों, तिथें तुम्ही आमचा आधार कशाला मागतां?' असें त्यांचें मत दिसलें. तिथूनच आम्ही कसेबसे रस्त्यावर उमटलों म्हणून ठीक. नाहीं तर चौऱ्यायशींचा फेरा होता! कारण त्याच ठिकाणीं रस्त्यानें आपलें तोंड विरुद्ध दिशेला वळविलें होतें.

अर्ध्या रस्त्यांत आम्हांला गडाचें मेट लागलें. तिथें कोळी लोकांचीं तीन-चार खोपटें आहेत. ते गुरेंढोरें बाळगतात, जवळपास डोंगरी शेती करतात अन् थकल्या-भागल्या प्रवाश्यांना खुर्चींत बसवून गडावर चढवण्याचें कामही करतात. गडाच्या कटिबंधावर चारी बाजूंनीं अशीं मेटें आहेत. आम्ही पहात होतों तिथले मेटकरी गायकवाड कोळी आहेत. दक्षिणचें मेट उठलेलें आहे. नैर्ऋत्येचें मेट लांघे कोळी संभाळतात. पश्चिमेचें अमरी मेट जोरकर कोळ्यांचें आहे. इतिहास-कालांत हे गडाचे नित्यजागृत पहारे होते. खालच्या गडबडीची पहिली चाहूल त्यांना लागायची आणि दग्याफटक्याची वर्दी लगेच त्यांच्या-कडून वर जायची.

आम्ही जसजसे वर जाऊं लागलों तसतसा वारा मोकळा झाला.

झाडें ठेंगणीं झालीं. झुडपांचें रान दाट झालें. दोन्ही बाजूंना डोंगरी शेतांचे कुणगे दिसूं लागले. शेजारच्या डोंगरांनीं आपलें स्वरूप अधिक स्पष्ट केलें. जिच्या तीरातीरानें आम्ही आलों होतों, त्या मुठेनें दोन टेकड्यांच्या मधल्या अवकाशांतून पुनश्च दर्शन दिलें. पुढें पाषाणरूपी खळ-दैत्य आडवे आले आणि त्यांनीं धरण घालून आपली सासरची वाट अडवली ही तक्रार सांगण्यासाठीं ती जणुं मागें मुरडून 'माहेरा'कडे चालली होती.

सव्वा तासाच्या चालीनंतर आम्ही शंकूच्या आकृतीचें एक दीर्घ वळण घेऊन गडाच्या ईशान्य टोंकाला दाखल झालों. आतां आमच्या-पुढें पुणें-डोणजें दरवाजा उभा होता आणि मागच्या बाजूला खांद-कड्याचा उभा तट दिसत होता. या बाजूला एकापुढें एक असे तीन दरवाजे आहेत. तिसऱ्या दरवाजाच्या गणेशपट्टीच्या बांधणींत कमळें कोरलेलीं आहेत. यादवांच्या शिल्पांत कमळांचें विशेष कौतुक आहे. उभय बाजूंचे खांबही त्यांच्याच घडणीचे दिसतात. किल्ला जरी यादवांनीं बांधला नसला तरी तेराव्या शतकांत कधीं तरी हा दरवाजा मात्र त्यांनीं उभा केला असला पाहिजे असें अनुमान निघतें.

आम्ही आतां समुद्रसपाटीपासून साडेचार हजार आणि पायथ्या-पासून तेवीसशें फूट उंच होतों. आता आमचा हात समोरच्या गिरि-शिखरांच्या वर पोंचत होता. चढणें संपलें होतें ; पण चालणें बाकी होतें. पूर्व-पश्चिम एक हजार फूट आणि दक्षिणोत्तर अडीच हजार फूट.

**'तीन कोसांचा आहे बा घेरा**
**दीड कोसाची आहे बा रुंदी'**

म्हणून तुळशीदास शाहिरानें त्याचें क्षेत्रफळ फुगवलें असलें तरी वास्तवांत तें दोन मैल आहे.

तिसऱ्या दरवाजांतून आंत शिरतांच डाव्या हाताला 'घोड्यांची पागा' दिसली. खडकाला पाडलेल्या एका खिंडारांतून आंत गेल्यावर पुढें मोकळें आंगण अन् त्यामागें खडक खोदून निर्माण केलेली ती जागा पहायला मिळाली. आंत पाणी आहे अन् मधें एक चौकोनी कुंड आहे,

त्यामुळें तें टांकें आहे हें उघड दिसतें. त्याची खोदाई शिवनेरीच्या टांक्यासारखीच आहे. त्यामुळें तें मुसलमानी अमलापूर्वीचें आहे यांत शंका नाहीं. त्याच्या द्वाराची उंची पाहतां ताठ मानेचा अबलख वारू आंत शिरायला मुळींच राजी होणार नाहीं. कदाचित् उन्हाळयांत आंतलें पाणी सुकलें कीं तिथें भीमथडी तट्टें बांधीत असावेत.

इथें आणखी एक पहाण्याजोगें पाणी आहे. त्याला 'सुरुंगाचें पाणी' म्हणतात. मात्र तें गडावर नसून खांदकड्याजवळ तटाच्या खालच्या बाजूला आहे. लहानशी पायवाट त्या बाजूला मळते. तिनें पुढें जावें आणि अरुंद तोंडाच्या भुयारांत वांकून पहावें म्हणजे तें खोलवर दिसतें. एकट्या-दुकट्या अल्पधीरी माणसाला भय वाटेल अशीच ती जागा आहे.

सिंहगडावर लहानमोठीं अठ्ठेचाळीस टांकीं असलीं तरी देवटांकें हें एकच नांव सर्वतोमुखीं आहे. गड चढून आल्यावर प्रवासी आपली तहान आणि थकवा घालवतो तो याच्याच गोड गारीगार जलानें. गडाच्या आग्नेय कोपऱ्यांत हें टांकें आपली पाणपोई उघडून बसलें आहे. त्याच्या चौकोनी आकारावर झांकण म्हणून पत्र्याचें छप्पर उभारलेलें आहे. लोकांनीं आंत उतरून पाणी गढूळ करूं नये म्हणून भोंवतीं कठड्यावर जाळी लावलेली आहे. ज्याला तहान लागली असेल त्यानें बादलीला दोर लावून ती आंत सोडावी. या टांक्याच्या पाण्याचा दुधासारखा रतीब लावून तें नित्य पिणारे कांहीं रसिक श्रीमंत निदान गेल्या पिढीला तरी पुण्यांत होते. महात्माजींनीं पुण्यांत प्रायोपवेशन केलें त्या काळांत ते या देवटांक्याचेंच पाणी पीत असत.

आम्ही तिथें 'हस्तौ पादौ प्रक्षाल्य' करून कलश भरून घेतला आणि मागच्या बाजूला तळ्याकांठीं असलेल्या अमृतेश्वरभैरवापाशीं आलों. बालेकिल्ल्याच्या दक्षिण अंगाला हें दक्षिणाभिमुख मंदिर आहे. आंत भैरव-भैरवीच्या पाषाण प्रतिमा प्रभावळींत उभ्या आहेत. भैरवी डाव्या हाताला शेजारींच असल्यामुळें हा भैरव दोन्ही अर्थांनीं 'चतुर्भुज' आहे. त्याच्या किरीटावर अन् बाहूंवर सुंदर नागबंध शोभतात. वरच्या

हातांत त्रिशूल, डमरु अशीं आयुधें असून डाव्या हातीं नरमुंड आहे आणि त्यांतून ठिबकणारें 'अशुद्ध' चाटण्यासाठीं एक श्वान 'आ' पसरून जवळच उभें आहे.

आजमितीस हें भैरव-जोडपें एका जीर्ण खोपटांत वास्तव्य करीत असलें तरी एका काळीं तिथें टुमदार मंदिर होतें हें पुढच्या भग्न महाद्वारावरून कळून येतें. माणसानें निर्मिलेले देव ; त्यांना तरी चक्रनेमिक्रम कसा चुकावा ! माणसें प्रसंगोपात्त स्थलांतर करतात ; परंतु त्यांचे पाय असूनही चालूं न शकणारे स्थावर देव, दुरवस्था भोगीत तिथेंच राहतात !

जी दशा या भैरवाची तीच बालेकिल्ल्यांतल्या कोंडाणेश्वराची. त्याच्या घुमटीचा आजमितीस जीर्णोद्धार झालेला असला तरी पूजोपचार 'तूष्णीम्' च. सिंहगडावरचें हें देवस्थान बरेंच पुरातन आहे. त्याचा द्वारमंडप क्षणभर आपली दृष्टि वेधून घेतो.

देवदर्शन करून तळ्याच्या कांठीं औदुंबरतळवटीं आम्हीं आमच्या शिदोऱ्या सोडल्या. त्या मोकळ्या वातावरणांत केवढा उल्हास होता त्या अन्नब्रह्माचा ! पण पहिला घांस घांटीखालीं लोटून मीं दुसरा उचलला मात्र ; घारीनें तो केव्हां झडपला त्याचा पत्ता लागला नाहीं. ती तुकडा घेऊन गेली त्याला माझी हरकत नव्हती ; पण तिनें माझ्या आंगठ्यांतून रक्त कां काढावें ? आधीं लूट अन् वर हिंसा असें दुहेरी पाप कां आचरावें ? पण तिला हें कसें अन् कोणत्या भाषेंत विचारायचें ? त्यानंतर मीं उपहार संपवला ; पण तो चवीकडे लक्ष देऊन नव्हे, तर त्या सोकावलेल्या घारीच्या घिरट्यांवर नजर ठेवून. माझें लक्ष आहे हें तिलाही समजलें आणि ती पुन्हां माझ्या वाटेला गेली नाहीं. खरोखर हिंस्र पशु-पक्षी स्वभावतःच माणसाला भितात म्हणून ठीक. जर एखादे दिवशीं हें भय त्यांनीं झुगारून द्यायचें ठरवलें तर—

त्या दिवशीं सिंहगडावर माणसांची मूस फुटली होती. त्यांत कल्याणदरवाजांतून येणाऱ्यांची संख्या विशेष होती. पुण्याहून साताऱ्याच्या रस्त्यानें निघालें कीं चौदा मैलांवर एक रस्ता फुटतो आणि

तो शिवापूर-कोंडणपूरवरून सिंहगडाच्या पायथ्याशीं येतो. या बाजूची चढण आम्ही आलों त्या रस्त्यापेक्षां कमी आहे अन् सोपीही आहे.



कल्याण दरवाजा

तिंकडून वर चढल्यावर कल्याण-दरवाजा प्रथम लागतो. हे एकापुढें एक दोन दरवाजे आहेत. दुसऱ्याच्या आंतल्या भागाला देवड्या आहेत. चौकटीच्या वर गंडभेरुंड कोरलेला आहे. माथ्यावर दोन ओळींचा शिलालेख आहे. तो संशोधक नसलेल्या माणसालाही समजण्याजोगा आहे.

**'श्री शालिवाहन शके १६७२ कारकी**
**र्दं श्रीमंत बाळाजी बाजीराव पंडीत प्रधान'**

याचे दोन अर्थ संभवतात. एक बाळाजी बाजीरावानें हा दरवाजा बांधला असेल अथवा दुरुस्त केला असेल. 'टेहेळणीचा बुरूज' म्हणतात तो याच्याजवळच आहे.

त्याच दिवशीं एका शाळेची सहलही गडावर आली होती. मुलें

गटागटांनीं फिरत होतीं. त्यांतलाच कोणी तरी एकजण बाकीच्यांना माहिती देत होता.

" ... या गडाचं मूळचं नांव कोंडाणा. तानाजी इथें लढून पडला त्या वेळीं शिवाजीनं उद्गार काढले, ' गड आला पण सिंह गेला ! ' अन् तेव्हांपासून हा सिंहगड झाला. "

कित्येक लोकसमजुती आपण ऐतिहासिक सत्यें म्हणून कवटाळून बसतों. मनु नांवाच्या कोण्या व्यक्तीनें मनुस्मृति लिहिलेली नाहीं, तरी ' मनु या आद्य राजानें रचलेली स्मृति ' असें आपल्या मनांत बिंबून गेलेलें आहे. कोलंबसानें अमेरिका प्रथम शोधलेली नाहीं. तिचा आद्य द्रष्टा वेगळाच आहे; पण आपण मात्र कोलंबसाचें नांव घोकून पाठ केलें आहे. सिंहगड या नांवाच्या बाबतींतही तसेंच.

तानाजी मालुसरे हा पुरुष ' सिंह ' होता याबद्दल वाद नाहीं; पण त्यानें गडावर रण माजवण्यापूर्वीच याचें सिंहगड हें नामाभिधान रूढ होतें. खुद्द शिवाजीमहाराजांनीं तानाजीच्या मृत्यूपूर्वीं सात वर्षें एक आज्ञापत्र काढलें आहे. त्यांत याचा ' सिंहगड ' असा स्पष्ट उल्लेख आहे.

सिंहगड कोणीं बांधला कोण जाणे ! त्याच्या उभारणीचा नव्हे; तर नांवाचा सर्वांत जुना उल्लेख मिळतो तो इसामी नांवाच्या एका मुसलमान कवीच्या ऐतिहासिक काव्यांत. हें काव्य १३५० तलें आहे. त्याच्या आधीं सुमारें पंचवीस वर्षें दिल्लीचा सुलतान महंमद तुघलख यानें कोंडाण्यावर स्वारी केली आणि नागनायक नांवाच्या कोळी किल्लेदाराचा पराभव करून तो ताब्यांत घेतला असा एक सर्ग त्या काव्यांत आहे. पुढें १४८२ त निजामशाहीचा संस्थापक मलिक अहमद याच्या हातीं मावळांतले बरेच किल्ले गेले त्यांत हाही होता.

शिवाजीमहाराजांनीं सिंहगड तीनदां सर केला आणि दोनदां त्यांना तो सोडावा लागला. दादाजी कोंडदेव हा महाराजांचा गुरु आणि हितचिंतक. तो शहाजीच्या नोकरींत असला तरी त्याचा हुद्दा ' सुभेदार नामजाद किल्ले कोंढाणा ' असा होता. विजापूरच्या आदिल-शाहीकडून त्याला ही सुभेदारी मिळाली होती; पण कागदोपत्रीं सिंह-

गडाचा तो सुभेदार असला तरी गडावर हुकमत चाले ती एका अदिलशाही हवालदाराची. महाराजांनीं इतर अनेक किल्ले हस्तगत केले असले तरी दादाजी हयात असेतों याच्याकडे कृपादृष्टि वळवली नाहीं. नंतर मात्र बापूजी मुद्गलाला पुढें घालून त्यांनीं किल्लेदाराला वळविलें आणि स्वारी न करतां कळाशीनें किल्ला हस्तगत केला.

पण पुढें दोनच वर्षांनीं राजकारणाचीं चक्रें फिरलीं. अदिलशहाची शहाजीवर इतराजी झाली. त्यानें शहाजीला कैद केलें आणि इकडे पुरंदर-सिंहगड यांच्यावर स्वाऱ्या सुरू केल्या. अदिलशाही फौजेला शिवाजीराजे खडे चारूं शकले असते; पण तसें करूनही त्यांच्या वडिलांची मुक्तता होण्यासारखी नव्हती. हे दोन्ही गड परत मिळाले तर अदिलशहा शहाजीला सोडायला तयार होता. महाराजांनीं विचार केला कीं, तीर्थरूप वडिलांच्यापेक्षां गड अधिक नव्हेत आणि त्यानीं हे दोन्ही किल्ले स्वहस्तें सोडून दिले.

कोंडाणा विजापूरकरांच्या हातीं आला खरा; पण तो त्यांना पचला मात्र नाहीं. शहाजी सुटून येतांच बंगलूरच्या जहागिरीची व्यवस्था पहाण्यासाठीं गेला आणि तिकडेच वास्तव्य करून राहिला. पिता-पुत्रांचे संबंध दुरावले. महंमद अदिलशहा अर्धांगाच्या विकारानें अंथरुणाला खिळला. दरबारांत दोन तट पडले. राज्ययंत्र चिखलांत रुतल्यासारखें झालें. 'सर्वविषयीं सावध' असणाऱ्या शिवाजी-महाराजांनीं नेमका या संधीचा फायदा घेतला आणि हातून गेलेले किल्ले शक्ति-युक्तींच्या बळावर पुनश्च आपल्या ताब्यांत आणले.

पुढें मोंगलांच्या मोहिमा सुरू झाल्या. औरंगजेबाकडून शिवाजीला नेस्तनाबूद करण्याचा हुकूम घेऊन जयसिंह मोठ्या दळभारासह दक्षिणेंत उतरला. त्याच्या हाताखालच्या दाऊदखानानें मावळांत सैन्य लोटलें आणि तो भाग उजाड, उद्ध्वस्त केला. त्यानें सिंहगडालाही वेढलें. शत्रु बळिया होता. सैन्य अफाट होतें. महाराजांनीं ताडलें कीं, या वेळीं सामन्याला दंड थोपटल्यास सर्वनाश ओढवेल. 'अर्धं त्यजति पंडितः'

हेंच या वेळचें शहाणपण. त्यांनीं मग जयसिंहाशीं तहाचें बोलणें लावलें आणि त्याला गड खालीं करून दिला.

पुढें महाराजांचें आग्र्यास जाणें, तिथें नजरकैद, तिथून पुढें अज्ञातवासाचें विराटपर्व अशा घालमेलींत पांच वर्षें सिंहगड मोंगलांच्या पायांतळीं उरला. महाराष्ट्रांत परत आल्यावर महाराजांनीं गेलेले किल्ले एकामागून एक घेण्याचा धडाका लावला. १६७० साल होतें तें. त्यांतच एक दिवस सिंहगडाची पाळी आली. तानाजीचें युद्धकांड प्रवर्तलें तें याच प्रसंगानें.

ती माघ वद्य नवमी होती. गडाखालच्या गर्द झाडींत रात्रीचा अंधकार घनदाट झाला होता. सगळा घेरा शांत, चिडीचिप होता. रातकिड्यांची किरकिरही थांबली होती. खुद्द रात्रीलाच निघोर निद्रा लागली होती. अशा वेळीं पायथ्याच्या करवंदीच्या जाळींतून एक खणखणीत शब्द उमटला—

**“ अस्सल जो जो बीज मराठा तो तो मज व्हावा**
**त्यानें येउनि देउनि प्राणा मजसह गड घ्यावा ! ”**

तानाजीचा–एका स्वामिभक्त समरधुरंधराचा–आपल्या अनुयायांना उद्देशून खडा सवाल होता तो ! त्याला योग्य तें उत्तर मिळालें. निवडक वीरांचें पथक त्याच्या मागून गडाच्या नैर्ऋत्येकडची दुर्लंघ्य चढण आक्रमूं लागलें.

आम्हीं ती बाजू जाऊन पाहिली. गडाच्या त्रिकोणाला जिथें चिमटा आला आहे त्या जागीं तो तानाजीचा कडा आहे. त्या बाजूची चढण लांबलचक चर अन् घळी यांनीं दुर्गम केलेली आहे. तटाखालचा तो उभा कडा तर जीवघेणाच म्हटला पाहिजे. पश्चिमेच्या बाजूला जवळच एक बदामाच्या आकाराची प्रचंड शिळा डोंगराच्या पाठीला चिकटून बसली आहे अन् ती केव्हां ‘ हरहर महादेव ’ म्हणेल त्याचा नेम नाहीं. तानाजी आणि त्याचे शिलेदार हा स्वर्गाचा पावंडा कसे चढले असतील तें एका कोंडाणेश्वरालाच ठाऊक ! सभासद आपल्या बखरींत लिहितो कीं, ‘ जैसे वानर चालून जातात त्याच-

प्रमाणें कड्यावर चालून गेले.' प्रथम दोघे 'मर्दाने' वर जाऊन त्यानीं माळ लावली आणि मग तिला धरून वरकड तीनशें मावळे गडावर पोंचले.



तानाजीचा कडा

तानाजी घोरपडीच्या साह्यानें कडा चढला या समजुतीला इतिहास पाठिंबा देत नाहीं. घोरपड ही कवींच्या, शाहिरांच्या कल्पनेंतून आली

आहे. इतिहासाच्या जित्या खुंटावर कविकल्पनेनें बांधलेलें तें कलम आहे. पण घोरपड काल्पनिक ठरली तरी तानाजीच्या भीमपराक्रमाला तिळभरही उणेपणा येत नाहीं. शत्रूच्या बंदोबस्तांत फट कुठें असेल तें हेरण्याची बुद्धि, असाध्य तेंही साध्य करण्याची महत्त्वाकांक्षा आणि तिला लागणारें अचाट साहस हे सेनापतीचे गुणविशेष तानाजीनें खण् खण् वाजवून दिले आहेत. नेपोलियननें एका भयाण रात्रीच्या तिसऱ्या प्रहरीं, समुद्र तुफान वादळानें गर्जत असतां आपलीं जहाजें त्यांत लोटलीं आणि अलेक्झाड्रियांत सैन्य उतरवलें, या अद्भुत, अनाकलनीय साहसाशींच तानाजीच्या या साहसाची तुलना करावी लागेल.

गडावर उदेभान रजपूत हा मोंगलांचा किल्लेदार होता. त्याला वर्दी मिळाली कीं, गनिमाची धाड आली. उदेमानाला हें अद्भुत वाटलें तरी तें सत्य होतें. त्यानें आपल्या सैन्याला चढाईचा हुकूम दिला. कुल रजपूत कंबरबस्ता झाले. हिलाल–चंद्रज्योति पेटल्या. गडावर लकलकाट झाला. तिरंदाज, बरचीवाले, पटाईत, आडहत्यारी असे बाराशें सैनिक मावळ्या वीरांवर लोटले. तानाजी 'हर हर' गर्जून त्या सैन्याला भिडला. सभासद पुढची हकीकत सांगतो—

'मोठें युद्ध एक प्रहर झालें. पांचशें रजपूत ठार झाले. चाळीसपन्नास मावळे ठार झाले. उदेभान किल्लेदार खासा त्यास व तानाजी मालुसरा सुभेदार यासी गाठ पडली. दोघे मोठे योद्धे, महाशूर, एक एकावर पडले. वार करीत चालले. तानाजीचे डावे हातची ढाल तुटली. दुसरी ढाल समयास आली नाहीं. मग तानाजीनें आपले डावे हाताची ढाल करून त्याजवरी वोढ घेऊन दोघे महारागास पेटले. मोठें युद्ध केलें. एकाचे हातें एक तुकडे होऊन फिरंगीच्या वारें पडले. दोघे ठार झाले. मग सूर्याजी मालुसरा, तानाजीचा भाऊ, यानें हिंमत धरून कुल लोक सांवरून उरले रजपूत मारिले. कित्येक रजपूत कडे उडोन पळोन मेले. असें बाराशें माणूस मारिलें. किल्ला काबीज केला आणि गडावर पागेंचे खण होते त्यांस आग लाविली. त्याचा उजेड राजियांनीं राजगडाहून

पाहिला आणि बोलले कीं, ‘गड घेतला. फत्ते झाली!’ दुसऱ्या दिवशीं तानाजी पडल्याचें वर्तमान जासुदानें आणलें. तें ऐकून राजे शोकानें उद्गारले, ‘एक गड घेतला, परंतु एक गड गेला!’

शिकंदराच्या दिग्विजयांत असाच एक प्रसंग आहे. बाबिलोनचा सम्राट् दारियस याच्याशीं त्यानें आपली गांठ घातली होती. दारियसाचा सेनासागर पांच लाखांचा होता. शिकंदराचें सैन्य त्याच्या दाढेलाही पुरण्यासारखें नव्हतें. पण तरीही हिंमत बांधून शिकंदरानें इस्सस गांवीं दारियसावर झेंप घातली. एक पथक पुढें घेऊन तो खुद्द दारियसालाच भिडला. मोठी खणाखणी झाली. त्यांत शिकंदराला वार लागला. रक्ताच्या धारांखालीं तो उभाच्या उभा न्हाऊन निघाला; पण तरीही त्यानें तलवार टाकली नाहीं. त्याच्या चौफेर कापाकापीपुढें दारियस थंडा पडला. त्यानें शिकंदराला पाठ दाखवली. सम्राट् पळतो हें पाहून सैनिकांच्या तोंडचें पाणीही पळालें! तेही सैरावैरा धांवूं लागले. अवघ्या चाळीस हजारांच्या सैन्यबळावर शिकंदरानें पांच लाखांची दाणादाण उडवली. एक लाख तर सरळ कापूनच काढले.

तानाजी पडला; पण अजून गड पडला नव्हता. त्यासाठीं तो पुन्हां सूर्याजीच्या हृदयांत जिवंत झाला. कच खाऊन जीव बचावण्यासाठीं कल्याण दरवाजाकडे धूम ठोकणाऱ्या मावळ्या वीरांना त्यानें सूर्याजीच्या मुखानें खणखणीत बजावलें, ‘मीं दोर कापून टाकले आहेत. आतां एक लढा तरी, न पेक्षां उड्या टाकून मरा तरी!’ ऋषि विनोबा म्हणतात, ‘समर्थांनीं आधीं केलें मग सांगितलें. तानाजीनें आधीं केलें आणि मगही ‘केलेंच!’ तानाजीची स्वामिनिष्ठा आणि कार्यनिष्ठा जबर होती. महाराजांना हनुमंतासारखी त्यानें साथ दिली. तानाजीचें चरित्र हें शिवाजीमहाराजांच्या हिंदवी स्वराज्यस्थापनेच्या रामायणांतलें ‘सुंदरकांड’ आहे. पण त्याच वेळीं हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, निष्ठावंत देशभक्त असे आयत्या वेळीं तयार मिळत नसतात. ते बनवून घ्यावे लागतात. त्यासाठीं नेत्याला आपला जीव आटवावा लागतो. विहिरींत

अमाप असेल तेव्हांच पोहरे कांठोकांठ भरतात. महाराज तसे होते म्हणून त्यांना अनुयायी असे भेटले!



तानाजीचा पुतळा

अमृतेश्वरभैरवाच्या मागच्या टेंकडीच्या उतारावर तानाजीची समाधि आहे. मेघडंबरीच्या खालीं कंगणीदार मंदिलाचा तो तानाजीचा

अर्धपुतळा डोळ्यांत भक्तिभावाचें पाणी जमवून पहात रहावासा वाटतो. ती मराठी वीरमुद्रा प्रेक्षकांची मान नकळत झुकवते. त्याच्या समाधि-मंदिराभोंवतीं लोखंडी पट्ट्यांचें चौकोनी कुंपण आहे. समाधीचें हें कार्य सिंहगड-स्मारकमंडळानें केलें आहे. त्याच्या द्वारा दरवर्षी माघ वद्य नवमीस इथें तानाजीची पुण्यतिथि होते. इथें सभोंवतीं कांहीं कातीव चिरे आहेत त्यांना 'सतीचे दगड' म्हणतात. तानाजीला अग्निसंस्कार याच ठिकाणीं झाला असावा अशा अनुमानानें या ठिकाणींच त्याचें स्मारक उभें केलें आहे.

तानाजीच्या कड्यावर आम्हीं बराच वेळ घालवला. आमचे चित्रकार श्री. गंगाधर ताटके यांनीं तिथें आसन मांडून कड्याची रूपरेषा कागदावर चितारून घेतली. आज तिथें बांधीव तट आहे. 'पुढच्यास ठेंच मागचा शहाणा' म्हणतात तसें महाराजांनीं त्या प्रसंगानंतर ती असुरक्षित बाजू पक्की करून टाकली असें सांगतात. त्यांना इतिहासाची पुनरावृत्ति व्हायला नको होती; पण ती महाराजांच्या मृत्यूनंतर १६९३ त मराठ्यांच्या वतीनेंच झाली.

संभाजीराजांचा अमानुष शेवट करून औरंगजेबानें पुन्हां एकदां महाराष्ट्रांत मुसंडी मारली. इकडचे बहुतेक किल्ले त्यानें संपादले, त्यांत सिंहगडही होता; पण मराठेही कांहीं हात बांधून बसले नव्हते! त्यांचा एक पंचहजारी सरदार नावजी बलकवडे यानें सिंहगड जिंकण्याचा विडा उचलला. तानाजीला जसा सूर्याजी तसा त्याच्या कुमकेला विठोजी कारके आला. तो राजमाचीहून निवडक माणसें घेऊन निघाला. भल्या पहांटे त्यानें कड्यावर माळ लावली आणि उषःकालीं विठोजीनें पहाऱ्यापाशींच शिड्या उभ्या केल्या. हां हां म्हणतां प्रतिकार मारून काढून त्यांनीं 'जैत रे जैत' म्हटलें.

सिंहगडाचा जो भाग कडे तुटून स्वभावतःच दुर्गम बनला आहे तिथें तटबंदीचें कारणच नाहीं. तट अन् बुरूज यांची बांधावळ आहे ती पूर्व, पश्चिम आणि दक्षिण या तीन दिशांना. सगळ्या तटबंदींत बंदुकीच्या माऱ्यासाठीं जंग्या अन् तोफांच्या माऱ्यासाठीं खांचा ठेवलेले

तेहतीस बुरूज आहेत. तटाच्या आंतून गस्त घालण्यासाठीं सर्वत्र फरसबंदी अरुंद रस्ता केलेला आहे, हा या गडाचा उल्लेखनीय विशेष.

सिंहगड हा शिवनेरी किंवा देवगिरी यांच्यासारखा सुटा स्वतंत्र डोंगर नाहीं. तो त्या पर्वतराजीचाच सलग पण उंच असा भाग आहे. पुष्कळ माणसांच्या तोंडून मीं ऐकलें आहे कीं, 'सिंहगडावर बघण्यासारखं कांहीं नाहीं!' खरें आहे तें. बघण्यापेक्षां मनन करण्याजोगें, विचार करण्याजोगेंच तिथें पुष्कळ आहे. पण गडावर नसलें तरी गडावरून पहाण्यासारखें मात्र अफाट आहे. नैर्ऋत्य टोंकाच्या 'झुंजार बुरुजा' वर जाऊन तुम्ही उभे रहा अन् मग मला तुमचा नकार सांगा.

कडयाखालचें रुंद पाठीचें तें टेंकाड. जणुं पिवळा पाणघोडाच. त्याच्या अंगावरचें तें मेट. डाव्या हाताच्या डोंगरावर एकाखालीं एक कुणगे आंखल्यामुळें निर्माण झालेली ती जणुं दिव्य लोकाची सोपान-परंपरा किंवा 'भुवनसुंदरा' ची 'त्रिवलीललित उदरशोभा.' उजव्या हाताला खडेगोटे नसलेल्या आणि सुकल्या गवतामुळें पिवळसर दिसणाऱ्या, एकमेकींत आडव्या-तिडव्या घुसलेल्या त्या टेंकडया. जणुं मातबर जमीनदाराच्या अंगणांत येऊन पडलेल्या भाताच्या राशीच. समोरच्या आडव्या डोंगराला फुटलेल्या उभ्या धारदार कण्या. त्यांवर तांब्याभर पाणी ओतलें तर तें अर्धें पूर्वेला नि अर्धें पश्चिमेला ओघळावें. त्यापुढें क्षितिजाच्या सीमेपर्यंत एकापुढें एक मांडलेल्या त्या चार गिरिमाला. पहिलीवरचीं झाडें-माडें स्पष्ट दिसत असल्यामुळें तिचा वर्ण हिरवा आहे. दुसरी ठेंगणी असून अधूनमधून डोकावते. ती कोणाला एवढी लाजली आहे तें कळत नाहीं. तिसरीच्या श्यामधूसर मस्तकावर मधेंच राजमुकुटासारखा शोभणारा तो राजगड आणि त्याच ओळींतला डाव्या हाताचा तो तोरणा आणि चवथी ओळ तर काय; क्षितिजाच्या स्वप्नरम्य निळ्या वर्णांत मिसळून केवळ रेषामात्र वेगळेपण दाखवणारी निळ्या दरियाची कन्याच!

या मांडलेल्या सुंदरतेच्या थाटावर कसलें तरी एक विरविरीत,

भासतें न भासतें असें मायारूप आवरण होतें. त्या बाजूला कसलीही झालचाल किंवा चाहूल नव्हती. वरूनही चिट्पांखरूं उडत नव्हतें. आकाशमाउलीचा प्रेमपान्हा पितां पितां जणुं त्या पर्वतांची निर्विकल्प समाधि लागली होती अथवा तानाजीचा रणयज्ञ पाहून त्या वेळीं त्यांचें जें भान हरपलें तें जणुं अजून परत आलेंच नव्हतें. त्या दर्शनानें माझी गोस्वामी तुलसीदासांच्यासारखी अवस्था झाली. किती पाहूं अन् कसें वर्णूं ! दृष्टीला तर वाचा नाहीं अन् वाणीला डोळे नाहींत !

त्यानंतर बालेकिल्ल्याला प्रदक्षिणा घालीत गडाची पश्चिम आणि वायव्य पादाक्रांत करीत आम्ही उत्तरेला राजाराममहाराजांच्या समाधीपाशीं उतरलों. इथें बालेकिल्ला म्हणून स्वतंत्र असें कांहीं नाहींच. गडाच्या माथ्यावर मध्यभागीं जो एक फुगवटा आहे त्यालाच बालेकिल्ला म्हणतात. राजारामाची शहाजहानी पद्धतीची घुमटी कड्यापाशींच एका खोबणींत आहे. आंत वृंदावन आहे. भिंतींत एक कोनाडा आहे आणि त्यांत राजारामाच्या पादुका, देवीची मूर्ति आणि एक बाण आहे. शिवाजीराजे ज्या बाणाची पूजा करीत तोच हा आहे आणि तो पाझरतो असें सांगतात.

महाराजांनीं आपल्या वडिलांचें क्रियाकर्मांतर इथेंच केलें आणि त्यांचा पुत्र राजाराम जिंजीहून प्रकृतिस्वास्थ्यासाठीं म्हणून सिंहगडावर आला, त्याचाही मृत्यु १७०० सालीं इथेंच झाला. त्याची पत्नी या समाधीच्या दर्शनासाठीं इथें वारंवार येत होती. पतिप्रेम हें तिचें मिष आणि राजकारण हें उद्दिष्ट होतें. शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर तिला राज्यलोभानें पछाडलें होतें. त्यामुळें त्या वेळचे पेशवे बाळाजी बाजीराव यांच्याशीं तिनें वांकडें धरलें होतें. चिमणाजी नारायण सचिव याच्या ताब्यांत त्या वेळीं सिंहगड होता. त्याला कांहीं तरी मुखलेप करून पेशव्यांच्याविरुद्ध कांहीं तरी बखेडा उत्पन्न करावा असा तिचा पोटांतला हेतु होता; पण चारचक्षु पेशव्यांना ही बातमी वेळींच कळली. त्यांनीं तुंग, तिकोना या किल्ल्यांसह शिरवळ परगणा सचिवाला दिला आणि

त्याच्या मोबदल्यांत सिंहगड स्वतःकडे घेऊन हा विषवृक्ष मूळ धरण्याच्या आंतच उपटून टाकला !

त्यानंतर सिंहगड पेशवाईच्या अखेरीपर्यंत त्यांच्याकडेच राहिला. पुढच्या काळांत पेशवाईवर अनेक वज्राघात आले. अनेक परचक्रें आलीं. सिंहगड पुण्याला जवळ आणि शत्रूला दुःसाध्य असल्यामुळें त्या त्या प्रसंगीं सुरक्षित ठिकाण म्हणून पेशव्यांना याचा उपयोग झाला. पेशवे अशा बांक्या वक्ताला आपलीं मुलेंमाणसें, जडजवाहीर, सोन्यारुप्याच्या मूर्ति आणि कागदपत्रें सिंहगडाच्या स्वाधीन करीत. त्यांच्या बरोबर पुण्यांतले शेटे महाजनही आपलें धनकनक उरापोटाशीं कवटाळून या गडाला 'त्वमेव शरणं मम' म्हणत.

या गडावरच्या लहानमोठ्या लढायांत तानाजी मालुसऱ्याची विक्रांत लढाई ही तर संस्मरणीय खरीच; पण पेशवाई संपुष्टांत येण्याच्या प्रसंगीं मराठ्यांच्या फौजांनीं इंग्रजांच्या सैन्याशीं इथून जो अखेरचा मुकाबला दिला तोही तितकाच रोमहर्षण आहे. स्वामिनिष्ठा आणि स्वदेशभक्ति या सद्गुणांचा तो एक ऊर्जस्वल आविष्कार होता.

सन १८१८ त फेब्रुवारीच्या २० तारखेस इंग्रजांच्या फौजा रणोत्साहानें उफाळत गडाखालीं आल्या. लगेच त्यांनीं गडावर तोफखाना चालू केला. तीन दिवस सतत तो आग ओकीत होता. तोफांचा घनगर्ज दऱ्याखोऱ्यांत दुमदुमत राहिला होता. किल्ल्यांत अवघे बाराशें लोक; पण त्यांनीं त्याला भीक घातली नाहीं. ते दारुगोळा ठासीत राहिले. आघाताला प्रत्याघात उठवीत राहिले.

चवथ्या दिवशीं कॅप्टन डेव्हिस निजामी लष्करांतलें अठराशें घोडदळ घेऊन इंग्रजसैन्याला मिळाला. त्यांची सैन्यसंख्या साडेतीन हजारांवर गेली. किल्ला सामान्य प्रयत्नांनीं हातीं येण्याचा रंग दिसेना, तेव्हां त्यांनी अधिक मोठ्या तोफा आणल्या. नव्या जवळच्या जागीं मोर्चे बांधले. सर्व बाजूंनीं गडावर गोलंदाजी सुरू झाली. थोडाथोडका नव्हे; तर साडेचार हजार गोळा किल्ल्याच्या तटबंदीवर आदळला. आंतले वीर जिवाच्या शर्थीनें गड लढवीत होते. आपल्या मदतीला

बाहेरून कोणी येईल अशी त्यांना आशा नव्हती. आपल्या बहादुरीचा गौरव करणारा, आपली पाठ थोपटणारा आपला धनीही जाग्यावर उरला नाहीं हेंही त्यांना ठाऊक होतें ! पण तरीही ते लढत होते. केवळ अंतरांतल्या स्वातंत्र्यप्रेमासाठीं आणि तानाजी मालुसऱ्याची 'मारितां मारितां मरणारी' तेजोमूर्ति आठवून ! तें लढणें नव्हतें ; तर न फुटणाऱ्या दगडावर डोकें आपटून घेणें होतें. त्याचा परिणाम ठरलेला होता. फक्त तो आठ दिवस पुढें ढकलला गेला इतकेंच. मार्चच्या पहिल्या तारखेस वरचे आवाज थांबले. इंग्रजांच्या फौजा वर चढल्या. किल्ल्यावर इंग्रजांचें निशाण फडफडलें. अरब आणि गोसावी हे पेशव्यांचे झुंजार सैनिक फक्त आपलीं वैयक्तिक हत्यारें घेऊन खालच्या मानेनें गड उतरले.

इंग्रजांना गडच मिळाला असें नव्हे ; तर सगळें गडगंज मिळालें. तोफा, दारुगोळा, दागिने, जडजवाहीर, सुवर्णमूर्ति आणि नगद मिळून त्यांची पन्नास लक्षांची पंढरी पिकली. पुढें कित्येक दिवस गोरे सोजीर हिरेमाणकांनीं आपल्या टोप्या भरून घेऊन पुण्यास येत होते आणि तो लुटीचा माल फुकाच्या मोलानें लोकांना विकीत होते.

आजमितीस गडावर सात–आठ बंगले आहेत. त्यांतच लोकमान्य टिळकांचाही एक आहे. ते उन्हाळ्यांत थंड हवेसाठीं तिथें जाऊन रहात. या गडाचें माहात्म्य वर्णायचें तर इथें शिवरायाचीं पदतलें उमटलीं आहेत. इथें तानाजीचा आत्मयज्ञ धगधगला आहे. इथें लोकमान्यांनीं हिंदभूच्या स्वातंत्र्याचें मनन–चिंतन केलें आहे आणि त्यामुळें या भूमीला त्रिगुण पावित्र्य लाभलें आहे.

# ३. पुरंदर-रुद्रमाळ

सन १६६५ मधील गोष्ट. शिवरायाचें पारिपत्य करण्याच्या कामीं औरंगजेबानें धाडलेला शाहिस्तेखान कुचकामी ठरला होता. जिवावरचें बोटावर निभावलें एवढ्या समाधानावरच त्याला परतावें लागलें होतें. त्याच्या नंतर त्याच मोहिमेवर पिकल्या केसांचा वृद्ध मिर्झाराजा जयसिंग निघाला. स्वतःच्या मर्दुमकीवर फाजील विश्वास ठेवणारा दिलेरखान हा मुसलमान सरदार औरंगजेबानें त्याच्या हाताखालीं दिला. शिवाजीला नामोहरम करून यशाचा तुरा लावूं या महत्त्वाकांक्षेनें ही मोहीम दक्षिणेंत उतरली. जयसिंग सासवडला तळ ठोकून राहिला आणि त्यानें दिलेरखानास पुरंदरच्या स्वारीवर पाठविलें. त्यानें रुद्रमाळ हा पुरंदराचा शेजारी गड प्रथम जेर केला.

पुरंदराची माची तिथून चांगलीच माऱ्यांत सांपडली. दिलेरखानाचें सैन्य एका बुरुजाला खालीं भगदाड पाडून माचींत प्रवेशलें. बालेकिल्ला सर करण्यासाठीं इथून तिथून मोर्चे, धमधमे लावायला सुरुवात झाली. गडकऱ्यापुढें अकस्मात् आणीबाणीचा प्रसंग उभा झाला. बाले-किल्ल्यांत चैतन्य संचरलें. माचींत सुखासुखीं प्रवेश झालेला पाहून दिलेरखान अर्ध्या हळकुंडानें पिवळा झाला; पण त्याला कल्पनाही नसतां गडावरचा नामजाद मुरारबाजी पांचशें हिंमतबाज मावळ्यांसह त्याच्यावर घसरला.

कसा, तर प्राचीन काळीं वामदेवानें प्रशंसिलेला तो दधिक्रा नांवाचा आर्यवीर दस्युसैन्यावर घसरला होता तसा. वेगानें झेप घालणाऱ्या ससाण्यासारखा! उतारावरून धोधावणाऱ्या जलौघासारखा. धूळ उडवीत चौखूर उड्डाण घेणाऱ्या वारूसारखा किंवा टेनिसनच्या शब्दांत सांगावयाचें तर–

"Fell like a cannon-shot
Burst like a thunderbolt"

पांच हजार कत्तलबाज पठाणांशीं त्याला सामना द्यायचा होता. पण जिवावर उदार तो लाखांशीं झुंजार! मुरारबाजी पहिल्याच दणक्याला दिलेरखानाच्या सैन्यव्यूहांत घुसला. मराठ्यांच्या असिलता रक्त चाटूं लागल्या. पठाणांच्या शिरांचे जयद्रथाच्या मस्तकासारखे चेंडू उडूं लागले. दिलेरखानाला देवडींतून माघार घ्यावी लागली. कुठेंच त्याला पाय रोवतां येईना. सगळा सैन्यभार गडगडत गडाखालीं आला; पण तिथेंहि त्याला थारा मिळेना. मर्द मराठे त्यांना रेटीत कापीत चालले. गडाखालच्या तेलणीच्या माळापर्यंत हा रेटा आला. तिथें दिलेरखानानें मुरारबाजीची गांठ घेतली. त्याचा तो उन्मत्त रणावेश पाहून दिलेरखान चकित झाला. त्याला वाटलें, असा धडकबाज वीरपुंगव आपल्या बादशहाच्या गोटांत आला तर किती बहार होईल! त्यानें म्हटलें,

'अरे, तूं कौल (अभय) घे. मोठा मर्दाना शिपाई, तुज नांवाजितों.'

त्यावर मुरारबाजी तिरस्कारानें हंसून म्हणाला, 'मी शिवाजीराजाचा शिपाई. तुझा कौल घेतों कीं काय?' आणि शब्दाच्या पाठोपाठ त्यानें तलवारीचा घाव घातला. खानानें अंग चोरून तो चुकवला. पण दुर्दैव मुरारचें! दुर्भाग्य महाराष्ट्राचें! थोड्याच वेळांत खानाचा वार नेमका आणि जोरकस बसून मुरारबाजीचें शिर धडावेगळें झालें! 'खानानें तोंडांत आंगोळी' घातली! 'असा शिपाई खुदानें पैदा केला!' त्याच्या तोंडून उद्‌गार निघाले.

मुरारबाजीच्या केवळ कबंधानें तीनशें पठाण कापून काढले ही अतिशयोक्तीची झालर त्याच्या पराक्रमाला शोभून दिसते! तो एवढ्या हिरिरीनें लढला तो स्वामिकाजासाठीं आणि त्याहूनही स्वराज्यावरचें संकट बारा वाटा पळवून लावण्यासाठीं! लो. टिळक म्हणाले होते तें उगीच नव्हे. 'रड म्हणून सांगितल्यानें कोणी रडत नाहीं किंवा लढ

म्हणून फुकाचा उपदेश केल्यानें कोणी लढत नाहीं. दोन्ही गोष्टींसाठीं आंतड्याला पीळ पडून जिव्हाळयाचा चिमटा बसावा लागतो!'

याच मुरारबाजीच्या घारातीर्थाकडे आणि शिवरायाची पहिली राजधानी हा बहुमान मिळवणाऱ्या पुरंदरगडाकडे आम्ही आज निघालों होतों. पुणें स्टेशनवरून पुरंदरच्या पायथ्यापर्यंत जाणारी एस्. टी. ची टपालगाडी सकाळच्या पहिल्या प्रहरीं दिवेघाट चढून पुढच्या मार्गाला लागली होती. सिंहगडापासून निघालेल्या या पर्वतश्रेणीवर यासारखेच आणखी दोन–तीन घाट आहेत. ही सह्याद्रीची पोटशाखा भुलेश्वर अर्थात् दौलतमंगळ या किल्ल्याजवळ विराम पावते. सिंहगडरांगेच्या या शेपटाला दक्षिणोत्तर अशी आणखी एक शाखा फुटली आहे आणि त्या शाखेला पंधरा–वीस मैलांची पूर्वपश्चिम आणखी एक पडशाखा उपटली आहे. पुरंदर–रुद्रमाळ–किल्ल्यांची रांग ती हीच!

सिंहगडरांग आणि पुरंदररांग या दोहोंची सांधेजोड मधली बापदेव-घाटाची रांग करते. त्यामुळें सुमारें शंभर मैलांचा विस्तीर्ण पठार तयार झाला आहे. कऱ्हा नदी या पठारावरून वहाते म्हणून याला कऱ्हे-पठार अशी संज्ञा लाभली आहे. हें महाराष्ट्राचें पुण्यपठार आहे. ही 'जवळा आगळ काशी' आहे. ज्ञानेश्वरांचे धाकटे बंधु अन् वारकऱ्यांचे सोपानकाका याच पठारावर सासवड मुक्कामीं कायमचे विसावले आहेत. मोरगांवचा विघ्नविनाशन मंगलमूर्ति, मणि–मल्लांचा निर्दालक जेजुरीचा खंडोबा, पुरंदरेश्वर, केदारेश्वर हीं स्वयंभू-शिवस्थानें यांच्यामुळें या पठाराला तीर्थरूपता आली आहे.

सासवडांतल्या आबा पुरंदऱ्यांच्या चिरेबंदी भव्य गढीवरून पुढें गेल्यावर लगेच कऱ्हेचा पूल ओलांडावा लागला. त्यानंतर उजव्या हाताला संगमेश्वराचें प्रेक्षणीय मंदिर दिसलें. कऱ्हा नदीला जिथें जिथें लहानग्या सरिता आणि वहाळ मिळाले आहेत, तिथें तिथें एकेक संगमेश्वर स्थापला गेला आहे. कऱ्हेचें हें सौभाग्य भारतांतल्या कोणत्याही लोकमातेला या प्रमाणांत लाभलेलें नाहीं. पुढें थोड्या वेळानें एका ठिकाणीं 'भिवडी' अशी पाटी दिसली. एका काळीं इंग्रजांना कर्दनकाळ

झालेल्या शिवभक्त उमाजी नाइकाचा गांव तो हा असें जेव्हां कळलें तेव्हां त्या गांवाबद्दल विशेष कांहीं तरी वाटलें. त्यापुढचा तो तेलिणीचा माळ अन् तो सोजीरखड. पुण्यापासून पंचविसावा मैल आक्रमल्यावर आम्ही पुरंदरचे पाहुणे झालों.



पुरंदराचें समीपदर्शन

पुरंदराचें समीपदर्शन मनोवेधक आहे. चढायच्यां आधीं घटकाभर त्याच्याकडे पहात रहावेंसें वाटतें. त्याच्या शिखरांचा उंचनीचपणा कलापूर्ण आहे. झाडी विरळ खरी ; पण सगळीकडे समप्रमाणांत आहे. आहे तिथें ढीगभर नाहीं तिथें शून्याकार असा करनकरेपणा त्याच्यापाशीं नाहीं. शिवनेरी जरठ आणि संन्यासी वाटतो. सिंहगड जटांचें जंगल वाढवलेल्या तपोधनासारखा अधृष्य आणि अगम्य दिसतो. पुरंदर खरा गृहस्थ आहे. आलेल्या अतिथीला तो 'व्याघ्रमुख' व्हायचा नाहीं. तो चढायला सांगेल ; पण मधें मधें विसाव्याच्या जागा दाखवून उत्साह कायम टिकवील.

पुरंदरावर चढायला दोन रस्ते आहेत. पहिला इंग्रजानीं बनवलेला राजमार्ग आणि दुसरा खालच्या पूर गांवांतून गेलेला वांकडातिकडा

चोरमार्ग. चोरवाट जवळची असली तरी सुखाची नव्हे हें सांगायला नकोच. हिलाच 'बामणवाट' म्हणतात. मुख्य रस्त्यानें धीमी चाल ठेवून अर्ध्या तासांत माचीच्या महाद्वारांत पोंचलों. माची म्हणजे गडाच्या खालच्या अंगाची सपाट भूमि. 'उपत्यका तु माची स्यात्' असें राज्यव्यवहारकोशातल्या दुर्गवर्गात तिचें लक्षण दिलें आहे. हा दरवाजा भव्य, गंभीर असला तरीही तुम्हांला त्याच्या माथ्यावर चढतां येईल. त्याच्याशीं सलगी करतां येईल. वर चढायला अरुंद पायऱ्या आहेत; पण धरायला कठडा नाहीं हें चढणाऱ्यानें लक्षांत ठेवायला हवें. ज्यांना खोलांत पाहून धुंवळतें अशा बायकामुलींनीं त्या फंदांत न पडलेलें बरें! गडाचे राखणदार तिथेंच आपल्याला भेटतात आणि नांव-गांव लिहून घेऊन कांहीं सूचनाही देतात.

माझ्या सोबत्यांना माहिती पुरवण्याच्या कामीं नेमस्त करून मीं समोर टक लावलें. माचींतून जाणाऱ्या त्या अरुंद रस्त्याला मागें पुढें दुतर्फा जास्वंदांचे मधु-माधव बहरले होते. त्या फुलांना गणती नव्हती. सगळीं एकाच जातीचीं आणि रक्तरंगी. त्यांच्या केसरांच्या अधोमुख लांब दांड्यांना वायुलहरी हळूहळू आंदुळीत होत्या. मधें मधें अडुळसे वाढले होते, त्यांनाही बहर लोटलेला होता. हीं तक पांढरीं अन् तीं भडक तांबडीं! जणुं शिवरायाच्या अंतरांतल्या शुद्ध सत्त्वाचीं आणि उसळत्या रजाचीं मागें राहिलेलीं प्रतीकेंच! अथवा 'भरूनि पुष्पांजुळी। अर्घ्य देवों' म्हणून तो पुरंदरच अतिथिसत्काराला उभा राहिला होता म्हटलें तरी चालेल.

'आकाशगंगेच्या पट्टयांत जशा दाटीवाटीनें भरलेल्या तारका, तशीं हीं फुलें किती लांबवर पसरलीं आहेत अन् कशीं वाऱ्यावर डोलताहेत! माझ्यापुढें जणुं कुबेराची संपदाच ओसंडली आहे' हे वर्डस्वर्थचे धालेपणाचे उद्‌गार मला त्या वेळीं आठवणें अपरिहार्य होतें. मी त्या झाडांची जवळीक धरून थोडें अंतर चाललों, पण एकाही फुलाला हात लावला नाहीं. एकालाही खुडलें नाहीं. ऋषि विनोबांचे

ते शब्द आंतून मला जाणीव देत होते, ' फुलें मस्तकावर शोभतात ; पण तीं आपल्या नव्हे, तर झाडांच्या ! '

माचीच्या रस्त्यावरून पश्चिम दिशा धरली कीं थोड्या अंतरावर 'पद्मावती तळें' दिसतें. या तळ्याजवळच शिपायांच्या बराकी आणि रुग्णालय आहे. तळें चारी बाजूंनीं बांधून काढलेलें आहे. पूर्वेलाही असाच एक तलाव आहे. त्याला ' राजाळ तलाव ' म्हणतात. त्याचें लहरतें स्वच्छ पाणी आणि तिथली शीतल छाया पाहून प्रवाश्याला तिथें आपली शिदोरी सोडावीशी वाटणें स्वाभाविक आहे. माणूस म्हणतो कीं, भूक समसमली आहे तेव्हां आधीं अल्पोपहार करून मगच वर चढावें ; पण एकदां हातातोंडाची गांठ पडल्यावर मग अल्पोपहार हा पूर्णोपहार होतो. रिकामी उरलेली जागा तळ्याच्या हिमशीतल जलानें भरून निघते आणि मग भरल्या पोटीं बालेकिल्ला सर करणें कष्टाचें होतें. कित्येक महिला तर ' आतां मी जेवल्यें, हातीं पायीं देवल्यें ' म्हणून मग इथेंच एखाद्या बंगल्याच्या पडवींत धरित्रीला शरण जातात. मीं माझ्या सोबत्यांना निक्षून सांगितलें कीं, ' उपहार केदारेश्वराच्या टेकडीवर ; त्याला नैवेद्य दाखवून ! '

पद्मावती तळ्याजवळ पूर्वीं पद्मावतीचें मंदिर होतें असें सांगतात ; पण आज त्याचा पत्ता नाहीं. हे दोन जलाशय माचीला अखंड पाणी पुरवतात. हे दोन्ही तलाव शिवरायानें बांधले आहेत. किल्ल्याला परचक्राचा वेढा पडून आंतल्या शिबंदीचा जगाशीं संबंध तुटला तर पाण्याविना आंतल्या आंत तडफडून मरायची वेळ येऊं नये म्हणून आधीं पाण्याची सोय पहायची आणि मग गड बांधायचा असें त्या काळचें धोरण असे. पेशवाईंत पुरंदराच्या माचीवर दोन-तीन हजार लोकवस्ती होती. पेशवाईच्या उदयकालीं चार वर्षें पुरंदरालाच राजधानीचा मान मिळाला होता आणि राज्यकारभार याच माचीवरच्या सदरेंतून चालत होता.

एखाद्या घरीं गेल्यावर पहिला नमस्कार गृहपतीला करणें हें उचित नाहीं का ? पुरंदरचा अधिपति म्हणजे पुरंदरेश्वर. याचें स्थान माचींतच आहे. हें शिवलिंग इंद्रानें स्थापल्याचें पद्मपुराणांत नमूद आहे. या


पर्वताला पुरंदर हें नांव मिळालें तें इंद्राच्या इथल्या वास्तव्यामुळेंच. इथेंच तपानें देह कष्टवून त्यानें मोरगांवच्या मोरयाचा वरप्रसाद मिळविला; पण इतिहासाचें निवेदन असें आहे कीं, पुरंदरेश्वर आणि केदारनाथ हे मूळचे पुण्यपत्तनस्थ. दक्षिणेंत मुसलमानांची पहिली धाड आली, तींत कांहीं फकीरही होते. त्यांनीं स्थानभ्रष्ट केलेले हे दोन्ही देव तिथून पुरंदरच्या आश्रयाला आणले गेले.

पुरंदरेश्वराजवळूनच आम्ही बालेकिल्ल्याच्या चढणीला लागलों. एका दुर्लंघ्य, उंच, काळ्या कड्याला चिकटून आमची चिंचोळी पायवाट जात होती. तिथून खालीं पाहतांना माचीवरच्या लांच लांब बराकी झारीनें उभ्या दिसत होत्या. गडाच्या लांबीशीं त्यांची लांबी संवाद करीत होती. लहानपणीं आम्हीं सोललेल्या ओल्या सुपाऱ्यांचीं अशींच लांब घरें उभारीत होतों, त्याची मला आठवण झाली. या बराकींच्या नि बंगल्यांच्या मागेंपुढें सुरूचीं उंच झाडें दाटीनें उभीं आहेत, त्यामुळें त्या सगळ्या देखाव्याला यक्षकिन्नरांच्या सृष्टींतलें गूढरम्य सौंदर्य आलें आहे.

सरदरवाज्यांत प्रवेश द्यायला वाट थोडीशीच वळली आणि तिथेंच परवाऱ्यांच्या लक्ष्मीआईनें आम्हांला दर्शन दिलें. तटाखालीं उजव्या हाताला लहानशा कोनाड्यांत तिचा शेंदुरचर्चित दगड आहे.कोनाड्याच्या छताला बारीकशी घंटा लोंबवलेली आहे. आजूबाजूच्या बऱ्याच दगडांच्या माथ्यांवर शेंदूर लेपलेला पाहून ही महारांची देवी हें न सांगतांच कळतें. हा दरवाजा उत्तराभिमुख असल्यामुळें याला दिल्ली-गेट म्हणायची वहिवाट आहे.

सरदरवाज्यांतून निघून आम्ही जी एक निमुळती टेकडी चढूं लागलों. तिचें नांव कंदकडा. तिच्या टोंकावरचा बुरूज त्याच नांवानें प्रसिद्ध आहे. तिथून ईशान्येला दृष्टि गेली ती एका उंच गिरिशिखरावर अडली. त्या पर्वताचें नांव रुद्रमाळ किंवा वज्रगड. बरोबर आहे. हा जर पुरंदर तर त्याच्या शेजाऱ्याला वज्रगड हेंच नांव रास्त. इंद्र-वज्र यांचा संबंध कांहीं ‘अस्माकं बदरीचक्रं युष्माकं बदरीतरुः’ या जातीचा

नव्हे ! तो तर अंगांगी संबंध आहे. हा गड पायथ्यापासून आमचें मन आकर्षित होता. आतां तो डोळयांत भरेल इतका जवळ आला. दोघांच्या मधें काय ती अवघ्या तीन फर्लांगांची खिंड. त्याचा मधलाच भाग एकदम उंच आणि पाषाणमय आहे. जुन्या काळचें हें रुद्रेश्वराचें स्थान. पण



रुद्रमाळ किंवा वज्रगड

पद्मावतीप्रमाणेंच इथला रुद्रही आजमितीस अदृश्य आहे. हा पुरंदरचा उपपर्वत खरा; पण जेव्हां लढाईत तोफखान्याचें महत्त्व वाढलें तेव्हां हा पुरंदरच्या आहारीं न राहतां त्यालाच वरचढ बनला. शत्रूनें रुद्र-माळावर तोफ चढवून तिला बत्ती द्यावी आणि खुशाल पुरंदराच्या तटाला भगदाड पाडावें अशी परिस्थिति उत्पन्न झाली. दिलेरखानानें प्रथम याचाच कबजा केला आणि पुरंदराच्या माचींत प्रवेश मिळविला. 'दुसरा पर्वत किल्ल्यासमुदार्यी असूं नये. कदाचित् असला तरी सुरुंग लावून पाडून गडाचे आहारीं आणावा', ही 'आज्ञापत्रा'ची शिफारस इथल्या अनुभवांतूनच निघालेली असावी. या साध्या डोंगराचें गडांत रूपांतर झालें तें निजामशाहीच्या काळांत, असा इतिहासज्ञांचा अनुमान-धपका आहे.

गडाची पश्चिम बाजू बळकट करणारा हत्तीबुरूज यापुढें लागला. त्याच्या पुढचा कोंकण्याबुरूज गडाची नैर्ऋत्य बाजू संभाळून आहे. त्याच्या जवळचा कडा डोळे फिरतील इतका खोल आहे म्हणूनच इथून कडेलोटाची शिक्षा देत. बालेकिल्ल्याला बारा मास पाणी पाजणारें चोर-टाकें इथें जवळच आहे. सिंहगडावरच्या देवटाक्याच्या पाण्याचे जे गुणधर्म तेच याचे असें सांगतात.

कोंकण्या बुरुजाच्या पुढचा आणि शेवटचा म्हणजे फत्तेबुरूज. किल्ला स्वाधीन ठेवायचा तर या बुरुजाची विशेष काळजी घ्यावी लागे. गडावर शत्रूचे चोरटे हल्ले होत ते याच दक्षिण बाजूनें आणि कठीण प्रसंगीं गडावर रसद आणणें शक्य व्हायचें तेंही याच बाजूनें. यावरून फत्ते-बुरुजाचें महत्त्व लक्षांत येण्याजोगें आहे. उत्तरेस शेंदऱ्या आणि दक्षिणेस फत्ते हे बुरूज म्हणजे गडाचे पुष्ट स्कंधच आहेत.

यानंतर गडाचा दक्षिण दरवाजा भेटतो. हा दुहेरी आहे. इथेंही एक माची आहे. तिला 'बावाची माची' म्हणतात. इथून थेट बिनी दरवाजापर्यंत सलग तटबंदी आहे; पण मध्यें बुरूज मात्र नाहीं. शिवरायानें जयसिंगाच्या स्वारीच्या वेळीं बांका प्रसंग ओळखून याच दरवाज्यानें आपला आणि गडकऱ्यांचा कुटुंबकाबिला शत्रूला जागमाग लागूं न देतां खालीं उतरविला होता. पुरंदर गनिमी काव्याच्या लढाईस सोइस्कर म्हणतात तो अशाच अनेक सोयींमुळें.

यांतून पार झालें कीं केदारटेकडीचा देखावा उघडतो. लहान-मोठे जलाशय डाव्या-उजव्या हाताला टाकीत पुढें जातांना एका म्हसोबाची स्वारी भेटते. जवळच त्याच्या नांवचें टांकें आहे. तें पाहण्यासाठीं आडव्या पडलेल्या गवतावरून घसरत आणि कांट्यांकुट्यांना आमच्या कपड्यांशीं सलगी करायला परवानगी देत आम्ही खालीं उतरलों. हें टांकें पुढच्या बाजूनें सीमेंटनें बांधून काढलेलें आहे आणि त्याच्या मागच्या अंगाला टेकडीच्या पोटांत खोल्या खोदलेल्या आहेत. इतिहासकालांत गडावरचे घोर अपराधाचे कैदी या खोल्यांत बंदिस्त करीत. आंतल्या बंदिवानानें आपल्या शृंखलांसह पलायनाचा बेत


केल्यास त्याच्या जलसमाधीची तिथल्या तिथेंच तजवीज व्हावी म्हणून ही जागा पसंत केलेली असेल.

पाण्याचीं टाकीं मीं सगळ्याच गडांवर पाहिलेलीं आहेत; पण तेला-तुपाचीं टाकीं पाहिलीं तीं मात्र इथेंच! पिराचीं थडगीं असावीं तशीं तीं शेजारीं शेजारीं दिसतात. जरा मोठें आहे तें तेलाचें अन् लहान आहे तें तुपाचें. तीं रितीं टाकीं पाहूनही तत्कालीन सुबत्ता लक्षांत येऊन माझा आत्मराज स्निग्ध झाला! मी कोंकणांत जन्म घेतलेला अन् 'कोंकणस्य घृतं नास्ति' ही आमच्या प्रांताची प्रसिद्धि! भातावर धार पडलीच तरी ती केंसाएवढी. मला वाटलें, इतकें चळचळीत तूप खाणाऱ्या त्या लोकांचें रूप कसें असेल?

या टाक्यांसमोर, राजगादीच्या उताराला एका झाडाच्या सावलींत एका काळ्या दगडी इमारतीचा अर्धा भाग सहजपणें नजरेंत भरला. कसली इमारत तें पाहण्यासाठीं वर चढलों. ही त्या वेळची दारू-गोळ्याची कोठी. खालूनवरून दगडांचीच बनवलेली आणि त्यामुळेंच आगीला न जुमानणारी. हिच्या आसपास चारशें कदमांत मकाण उभारायचें नाहीं हा त्या वेळचा सक्त नियम होता. आजकालच्या लढाया सर्वव्यापी आणि त्यांना लागणारें स्फोटक साहित्यही अपरंपार! पण स्वराज्याच्या काळांत या एकाच गडावर चाळीस–पंचेचाळीस तोफा, चार हजार कुलपी गोळे, बावीस खंडी दारू आणि पांच खंडी शिसें एवढी रणसामुग्री सदैव जय्यत असे.

म्हसोबाच्या टाक्यापासूनच केदारटेकडीची चढण सुरू होते. हिच्या खालच्या अंगाला बहिरदरवाजा आहे. तो नेहमीं बंद असतो. त्याच्या वरच्या अंगाला बहिरटाकें आणि टेकडीच्या माथ्यावर केदारेश्वर अधिष्ठित आहे. राजगादी उजव्या हाताला ठेवून पुढें निघालें कीं दोन टेकड्यांच्या मधलें निरुंद पठार, दोन्ही बाजूंच्या खोल घळी पहात ओलांडावें आणि तें संपलें, कीं केदारेश्वराच्या चिरेबंदी पायऱ्यांशीं यावें. दोन्ही बाजूंना दगडी उंच कठडे आणि मध्यें बहात्तर पायऱ्या असा तो रस्ता आहे. या पायऱ्यांमुळेंच ती 'बिकट वाट' वहिवाटीला सुगम झाली आहे.

एका काळ्या साध्या चौथऱ्यावर पण मजबूत बांधणीचें हें शिवालय आहे. गडाखालच्या नारायणेश्वरासारखेंच हेंही मंदिर हिंदुराजवटींत भव्य आणि कलाकुसरीचें असलें पाहिजे; पण तें काळाच्या तावडींत सांपडलें आणि केदारेश्वर अगदींच उघड्यावर पडला हें बरें नव्हे म्हणून आजचें हें मंदिर महादाजीपंत पुरंदऱ्यांनीं उभें केलें!.



केदार टेकडी आणि मंदिर

मीं आंत प्रवेश करून 'शंभोऽऽहर!' म्हटलें, तशीं त्या दगडी घुमटांत माझा आवाज घुमून मोठा झाला आणि पुन्हां माझ्याच कानावर आदळला. शाळुंकेच्या मागच्या कोनाड्यांत पार्वतीची मूर्ति आपल्या परमेश्वराला न्याहाळीत उभी असलेली दिसली. गर्भगृहाच्या बाहेरच्या अंगाला दोन बाजूंना भिंतीला टेंकून ठेवलेलीं दोन पाषाण-

पीठें आहेत. पैकीं एकावर नारायणाची मूर्ति उभी होती. आजमितीस ती मुंबईच्या वस्तुसंग्रहालयांत दर्शनीय नव्हे, तर प्रदर्शनीय झाली आहे. पण दुसऱ्या पीठावरची देवता कोण ?

पुरंदराच्या बालेकिल्ल्यावर तीन टेकडया उत्तुंग आहेत. कंदकडा, केदार आणि राजगादी. पैकीं राजगादी सर्वांत थोरली बहीण. ती केदारच्या पूर्वेला समोर आणि सन्निध आहे. खूप मोठी शाळुंका असावी तसा तिचा आकार आहे. पूर्वभाग पसरट उतरता आणि पश्चिमभाग निमुळता उंच कडा. आम्ही उभे होतों तिथून ती मजेदार दिसत होती. जणुं एखादें कुलुंगें कुत्रें दमून आल्यावर जमिनीवर तोंड टेकून स्तब्ध बसलें आहे.

याच राजगादीवर शिवरायाचा राजवाडा होता. राजमहाल गडावर सर्वांत उंच जागीं बांधायचा आणि त्याची अवज्ञा होणार नाहीं अशा बेतानें खालच्या थरावर इतर वाडेहुडे उभारायचे असा त्या काळचा रिवाज होता. शिवछत्रपतींची राजधानी इथून उठल्यावर कधीं तरी तो वाडा जमीनदोस्त झाला आणि पुढें पेशव्यांच्या कारकीर्दींत इथें नवा इमला उठला नाहीं. त्यामुळें तूर्त ही जागा ओसाड आहे. लोक म्हणतात कीं, माणसांनीं आपल्यापेक्षां उंच जागीं राहणें केदारेश्वराला बरें न वाटून त्यानें राजगादीवर कोणतेंही बांधकाम टिकूं दिलें नाहीं.

पुरंदरचा निर्माता कोण हें सांगतां येत नाहीं. पण यादवांच्या पूर्वकालींही तो अस्तित्वांत होता हें मात्र कळून येतें. इ. स. १२८५ मधला यादवांचा एक शिलालेख उपलब्ध झाला आहे, त्यावरून त्यांची इथली कारकीर्द समजते. पुढें १३५० त बहामनी राजांनीं पुरंदराची दुरुस्ती केल्याचा उल्लेख सांपडतो. इथले अर्धवर्तुळाकार बुरूज त्यांच्याच हातचे आहेत. पंधराव्या शतकाच्या अखेर हा किल्ला निजामशाहीच्या ताब्यांत गेला आणि सुमारें शंभर वर्षें त्यांच्याच ताबेदारींत राहिला. त्यानंतर शहाजीला पुणें-सुपें प्रांताची जहागीर मिळाल्यावर पुरंदर त्याचा झाला हें खरें; पण त्याची अखत्यारी मात्र निजामी सरकाराकडेच राहिली. महादाजी नीळकंठराव नांवाचा एक कर्तृत्वशाली पुरुष

निजामशहानें पुरंदराचा हवालदार नेमला होता. तो गडाचा कारभार पहात असे; पण शहाजीचा आणि त्याचा घरोबा असल्यामुळें त्यांच्यांत कधीं वितुष्ट आलें नाहीं.

१६३६ त निजामशाहीचा अस्त झाल्यावर पुणें प्रांत अदिलशाहींत समाविष्ट झाला. पुरंदराची मालकी अदिलशहाकडे आली. शहाजीनें मग त्याची चाकरी पत्करली आणि त्याच जहागिरीचें दान त्याच्याकडून पुन्हां घेतलें. महादाजी नीळकंठराव आपल्या हयातीपर्यंत पुरंदराचा हवालदार राहिला. तो निवर्तल्यावर त्याचे चौघे पुत्र त्या अधिकारासाठीं आपसांत भाडूंतंडूं लागले. पुढें शिवरायाच्या हें निदर्शनाला आलें. यांचा अंतःकलह गडाला धोका आणील हें जाणून त्यानें त्या सर्वांना गडावरून दूर केलें आणि तो आपल्या ताब्यांत घेतला. मात्र त्या चौघांनाही जमिनीचें इनाम करून द्यायला तो चुकला नाहीं. नेताजी पालकरला गडाची सरनोबती बहाल करून आणि सगळी मनासारखी व्यवस्था लावून तो पुढच्या उद्योगाला लागला.

पुढें अदिलशहानें कर्नाटकांत शहाजीला कैद केलें आणि शिवाजीच्या वाढत्या पुंडाव्याचा बंदोबस्त करण्यासाठीं फत्याखान या सरदाराला बड्या फौजेनिशीं रवाना केलें. राजे पुरंदरावर सर्व सिद्धता करून त्याची वाट पहात राहिले. गडाखालच्या डोंगरांत उभयतांची गांठ पडली आणि रंजक उडाली. फत्याखानाचा मुसेखान नांवाचा एक आघाडीचा वीर होता, त्याच्या छातींत गोदाजीचा भाला घुसला. दुसऱ्या अशफरशहाला सदोजीचा घाव लागला. फत्याखानाला शिवाजीच्या उग्र सैनिकांपुढें उभें रहाणें अशक्य झालें आणि मग पळापळ सुरू झाली. शिवरायानें पार बेलसरपर्यंत त्याची पाठ पुरवली.

दिलेरखानाशीं मुरारबाजी लढला अन् पडला तो प्रसंग त्यानंतरचा. पण मुरारच्या बलिदानानें तें परचक्र परतलें नाहीं. जयसिंगानें सर्व बाजूंनीं त्याच्यावर धाड आणली. सिंहगड-पुरंदर यांवर हल्ले चालूच राहिले. जयसिंग शिवाजीला अनावर झाला. स्वपरबलाबल ओळखून

[library stamp]

त्यानें त्या प्रसंगीं माघार घेण्याचें ठरवलें. एकदांही अलाबला परत गेली कीं मागाहून पाहतां येईल असा योग्य वेळीं योग्य विचार करून त्यानें नमतें घेतलें. तो स्वतः उठून मिर्झाराजाच्या भेटीस गेला. आषाढ शुद्धांत औरंगजेबाच्या मान्यतेनें उभयतांत तह ठरला तो असा—

' शिवाजीनें पुरंदर-सिंहगडांसह तेवीस किल्ले आणि त्यांखालचा चार लक्ष होनांचा मुलूख मोंगलांस द्यावा. रायगड, राजगड वगैरे बारा किल्ले स्वतःकडे ठेवावे आणि एक जहागिरदार म्हणून मोंगल-दरबाराची चाकरी करावी. '

शिवरायानें पुरंदरच्या किल्ल्या दिलेरखानापुढें टाकल्या आणि सात हजार माणसें, दारूगोळा अन् दाणागोटा यांसह तो इथल्या राजगादी-वरून गडाखालीं उतरला. इतिहासाची आस्था असेल तर ती राजगादी तुम्हांला अशा अनेक घटनांचें स्मरण देईल !

तिथून माझी दृष्टि वळली ती आग्नेयीच्या वुधल्यावर. वुधला ही मध्येंच उंचावलेली एक टेकडी आहे. जणुं पुरंदर-महाराजांची द्वारस्थ कंचुकीच. तिच्या चारी कडा तासल्यासारख्या आहेत. वुधला हा गडाचाच एक बाह्य घटक समजायला हरकत नाहीं. इतिहासकाळांत त्याचा टेहेळणीसाठीं उपयोग होत असला पाहिजे. सिंहगडानेंही असाच एक वुधला बाळगला आहे. पुरंदरच्या या वुधल्यानें गडाचें काय भलें केलें असेल तें ठाऊक नाहीं; पण त्यानें बुरें केलें तें मात्र इतिहासाला गवसलें आहे. पेशवाईच्या अंतकाळीं इंग्रजांच्या सैन्यानें इथून तोफ डागली आणि गडावरचें दारूगोळ्याचें कोठार फोडलें. दारूगोळाच भडकून गेल्यावर मग मुकाबला कशानें करायचा !

तसेंच तें दक्षिणेचें शिरवळ अन् तो नीरा नदीचा चकाकता नील-धूसर प्रवाह. तो जर वांकडा-तिकडा वळला नसता तर मीं त्याला महाराष्ट्रभूमीचा इंद्रनील मण्याचा घडवलेला कमरपट्टाच म्हटलें असतें. या सरितेनें अनेक शेतें भिजवलीं आहेत आणि किती तरी मळ्यांतल्या इक्षुदंडांतून आपला रस गोड केला आहे. भोरजवळचें भाटघरचें धरण

म्हणजे सांठवलेला प्रचंड जलराशिच. पण तें एका डोंगरकडेच्या मागून भासमात्र प्रतीत होतें आणि व्यक्त दर्शनासाठीं मनाला ओढ लावतें. त्याच्याही पलीकडे पार क्षितिजाजवळचा तो रोहिडखोऱ्यांतला दुरून साजरा दिसणारा राजगड. स्वराज्याच्या उपक्रमाचें तें स्फूर्ति-स्थान ! इथूनच शिवरायानें दादाजी कोंडदेवाला लिहून कळविलें होतें कीं, 'रोहिडेश्वर स्वयंभू-महादेवानें मला ही स्फूर्ति दिली आहे. त्याच्याच कृपेनें हिंदवी स्वराज्य स्थापन होणार. तुम्ही डगमगूं नका !'

त्याच ओळींत सिंहगडाची पुनर्भेट झाली. निळ्या आभाळाची खोळ पांघरून तो 'गरीब बापुडा' असल्यासारखा बसला होता. मीं त्याला म्हटलें, 'तुझ्या या सौम्य रूपाला मी भाळणार नाहीं. तूं किती खडतर आहेस तें मीं नुकतेंच अनुभवलें आहे.' सिंहगड–पुरंदर म्हणजे पांडवांतले जणुं भीमार्जुन. महाराष्ट्राच्या संरक्षणाची जिम्मेदारी एका काळीं त्यांनींच पत्करली होती. पुणें, पुरंदर आणि सिंहगड यांनीं एक सुंदर समद्विभुज-त्रिकोण साधला आहे. सिंहगड हा त्याचा शिरोबिंदु आणि पुणें–पुरंदर हा पाया. म. म. पोतदार तर सांगतात कीं, 'इटली देशांत जशी गडांची एक चौकडी गाजलेली आहे तशी ही आपल्या महाराष्ट्रांतील पुरंदर, सिंहगड, तोरणा आणि रायगड यांची चौकडी आहे.'

पुष्कळ वेळां दूरचें आधीं नजरेंत भरतें आणि जवळचें नजरेंतून निसटतें; पण पुरंदरच्या वायव्येला खेटून उभा असलेला सूर्यपर्वत आपल्या वैशिष्टयानें तुम्हांला आकर्षील. तीनशें फूट उंचीच्या त्या समरेषेच्या टेकडीला दोन्ही टोंकांना दोन मनोऱ्यासारखीं उंच शिखरें आहेत. हिचे दोन लहान फांटे उत्तरेस निघाले आहेत. त्यांमधून पुणें-पुरंदर पायवाट गेलेली आहे. दोहोंच्यामधें 'साबगीर खिंड' मांडलेली आहे. याच्या पूर्वपायथ्याला दोन ताळांचें लेणें आहे, तें 'पोखरबीळ' या नांवानें प्रसिद्ध आहे. सूर्यपर्वताच्या परिसरांत विविध वस्तूंचे अवशेष बरेच सांपडतात. संशोधकांनीं कोल्हापूरच्या ब्रह्मगिरीसारखें इथें उत्खनन केल्यास त्यांचे श्रम वायां जाणार नाहींत. इथलें भूगर्भसंशोधन

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासावर नवा किरण टाकील असें श्री. कृ. वा. पुरंदरे निर्धारानें सांगतात.

अडीच हजार फूट उंचीच्या त्या केदारटेकडीवरून पुरंदराच्या घेरावर नजर टाकली कीं माचींतून निघालेला मार्ग वज्रगडाला कवेंत घेऊन किल्ल्याच्या करगोट्यासारखा पुन्हा माचीला येऊन मिळतांना दिसतो. ही तटप्रदक्षिणा करायची म्हटलें तर चार-पांच मैल सहज तुडवावे लागतील. त्याच्या वरच्या अंगाला आणखी एक तशीच वाट आहे आणि ती टाक्यांच्या अनुरोधानें जाते. तिला पायवाट म्हणण्यापेक्षां पाणवाट म्हणणेंच समर्पक होईल. याच मार्गावरून दृष्टि फिरवीत वायव्येला आणली कीं, माचींतल्या पद्मावती तळ्यांत ती लहरते, तिथल्या लहानमोठ्या केवळ छपरांचाच भाग दाखविणाऱ्या इमारतींभोंवतीं घुटमळते, जवळच्याच काळ्याकभिन्न तटावर धडकते आणि वरच्या शेंदऱ्या बुरुजाशीं निश्चल होते.

शेंदऱ्या बुरुजाच्या उभारणीशीं एक दुर्दैवी करुण कहाणी संलग्न आहे. बेदरच्या बादशहाला या बाजूला एक भक्कम बुरूज उभारायचा होता. त्यावांचून ती बाजू कच्ची आणि असुरक्षित रहाणार होती. बादशहाच्या हुकुमाप्रमाणें गवंडी, मजूर तिथें कामाला लागले. तोकड्या कड्यावर तें बांधकाम करायला हवें होतें. प्रशस्त पाया भरायला जागाच नव्हती. दगड होता तो अगदींच ठिसूळ आणि कुजका. पाया घालावा, बांधकाम उभारावें, तें पुरुष-दोन पुरुष उंचीला यावें आणि अचानक एका रात्रीं ढांसळून पडावें असा प्रकार होऊं लागला. लोकांना वाटलें, गडाच्या देवतेचा कोप असेल. शिवाराचा क्षेत्रपाल असंतुष्ट असेल. एखादा म्हसोबा—बहिरोबा कामांत मोडता घालीत असेल. मग त्यांच्या नांवानें कोंबडीं—बकरीं कापण्यांत आलीं. त्या देवतांची रक्ताची तहान शमवण्यांत आली. पुन्हां चिऱ्यांची उभारणी सुरू झाली; पण तरीही पुनश्च तीच रडकथा! कामकरी, हवालदार डबघाईला आले. त्यांनीं बादशहाला वस्तुस्थिति कळवली. तिकडे तोही बेदिल झाला.

मग एका रात्रीं त्याला स्वप्नदृष्टांत झाला कीं, ज्येष्ठ मुलगा आणि ज्येष्ठ सून पायांत गाडलीं तर बुरूज उठेल ! पण कोण देणार आपला सून-मुलगा ? कोणाला आपलीं पोरें अधिक झालीं आहेत ? कोणाचें काळीज एवढें फत्तराचें झालें आहे ? पण सुवर्णमात्रा सगळ्या रोगांवर चालते. लहानशा आमिषालासुद्धां मासा गळ गिळतो; मग कल्पनेच्याही पलीकडचें महान् आमिष दिसल्यावर, वंशाचें दैन्य-दारिद्र्य फिटतें हें समजल्यावर, एखाद्या लोभी मणंगानें त्यासाठीं कां तोंड उघडूं नये ? पुरंदराच्या घेऱ्यांत राहून गडाची चाकरी करणारा बहिरनाक महार त्याकामीं पुढें आला. या आत्मघाती स्वार्थत्यागाबद्दल त्याला वंश-परंपरा मोठें इनाम मिळणार होतें. अक्षरशः त्याचें उखळ सोन्याचें होणार होतें.

बहिरनाकाचा मुलगा नाथनाक अवघा चौदा-पंधरा वर्षांचा आणि सून देवकाई असेल आठ-दहा वर्षांची. दोघे अजाण जीव ! केवळ बापाच्या हक्काचे. त्यानें हवे तसे वाटेस लावावे. त्यांना स्वतःच्या इच्छेनें जगण्याचें अथवा मरण्याचें स्वातंत्र्य अजून मिळालेंच नव्हतें. बादशहानें बहिरनाकाची अर्जी मान्य केली. आश्विन वद्य अष्टमीचा पहिला प्रहर हा मुहूर्त ठरला. कामकऱ्यांनीं एक लांबरुंद खड्डा खणून ठेवला. त्यांत रुईच्या पानांचें दाट अंथरूण पसरलें. त्या दुर्दैवी मुलांना गोडधोड खायला घातलें. नवीं वस्त्रें ल्यायला दिलीं. तांबड्या फुलांच्या माळांनीं त्यांचे गळे सजवले. त्यांना शृंगारून बुरुजाजवळ आणलें. हजारों प्रेक्षकगण त्यांना घेरून उभा राहिला. ढोल, घमामे, कर्णे, तुताऱ्या या रण-वाद्यांच्या टणत्कारानें त्या पोरांच्या कानठळ्या बसवल्या. त्या दोघांना खड्डयांत बसवण्यांत आलें आणि काय होत आहे अन् काय होणार आहे याची खरी अन् पुरी कल्पना येण्याच्या पूर्वीच त्या अजाण, अश्राप दंपतीच्या मस्तकावर भला मोठा चिरा दडपला गेला!......

मग बुरुजाचें काम सिद्धीस गेलें. मानवी जीवनाला जर कांहीं पावित्र्य असेल, त्याच्या त्यागाला जर कांहीं पुण्याई असेल तर तें सिद्धीला जायलाच हवें होतें. त्या बुरुजानें गडाचें न्यून तें पुरतें

झालें ! बादशहा बेदराहून स्वतः उठून पुरंदरास आला आणि तो शेंदऱ्या बुरूज खंबीरपणें उभा असलेला पाहून बहोत खूष झाला ! सात अर्धवर्तुळाकार तटांच्या संयुक्त रचनेचा हा बुरूज आहे. एका तटांतून दुसऱ्यांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत असें जाण्यासाठीं वाटा ठेवलेल्या आहेत. खालीं एक खोल भुयार आहे ; पण त्याची लांबी-रुंदी अद्याप कोणीं मोजलेली नाहीं ! गेल्या महायुद्धांत इंग्रज सरकारनें बरेच जर्मन लोक या गडावर स्थानबद्ध केले होते. त्यांत डॉ. गोट्स नांवाचे एक विद्वान् गृहस्थ होते. त्यांनीं त्या काळांत पुरंदराविषयीं बारकाव्यानें संशोधन करून लेख आणि नकाशे प्रसिद्ध केले आहेत. ते सांगतात कीं, शेंदरी बुरुजांत संपत्ति पुरलेली असेल या आशेनें इंग्रजांनीं त्याच्या खालीं सुरुंग लावून त्याची पाडापाड केली. आजमितीस तो अर्धा ढांसळलेला दिसतो त्याचें कारण हें. एवंच काय, बुरुजाच्या उभारणीच्या वेळींही धनलोभ आणि तो जमीनदोस्त करण्यांतही धनलोभच ! आद्यंतीं एकच विकार !

जयसिंगाशीं केलेल्या तहानुसार मोंगलांच्या पचनीं पडलेला हा गड शिवरायानें आग्र्याहून सुटका झाल्यावर पुनश्च स्वराज्यांत आणला. त्यानंतर महाराजांच्या मृत्यूपर्यंत इथें कांहीं विशेष घडलें नाहीं. पुढें संभाजी हुतात्मा झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आंतच गडावर पुन्हां औरंगजेबाचें निशाण फडकलें ! याला ‘ अजमगड ’ हें मोंगली नांव सक्तीनें स्वीकारावें लागलें. पण शंकराजी नारायण सचिव यानें थोड्याच काळांत मोंगलांवर मात करून पुरंदर पुनश्च स्वामिसेवेस सादर केला. सचिवांच्या ताब्यांत गड असतांनाच शाहूमहाराज दिल्लीहून दक्षिणेंत येऊन राज्यारूढ झाले. नंतर १७१२ त बाळाजी विश्वनाथ यांना पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं आणि पुरंदर सचिवांकडून त्यांच्या सत्तेंत आला. पेशव्यांनीं तिथें आपला दुमजली वाडा उभारला.

आम्हांला ती जागा पहायची होती. ‘ राजगादीच्या पूर्वेस मशिदी-जवळ ’ अशी तिची खूण पुस्तकांत सांगितलेली होती ; पण मशीदच जिथें सलामत नाहीं तिथें तिच्या अनुरोधानें पेशव्यांचा वाडा कसा

शोधायचा? परब्रह्माच्या 'तटस्थ' लक्षणापैकींच तो प्रकार! 'तटावर कावळा बसला आहे तें कालिदासाचें घर' हें त्याचें उदाहरण! पण कावळा उडून गेल्यावर मग त्या घराची ओळख कशी पटायची? 'परंतु माझे सहप्रवासी श्री. गो. नी. दांडेकर यांनीं तें स्थान थोड्याच वेळांत शोधून काढलें. उंच चौथऱ्यावरच्या त्या पडित मशिदीला वळसा घालून आणि कारवीच्या जंगलांत घुसून आम्ही त्या वास्तूवर उभे राहिलों. तिथें सगळीकडे चुनेगच्चीचे थर आणि दगड अस्ताव्यस्त पडले होते. मला वाटलें, महाराष्ट्राच्या वैभवाची, उत्कर्षाची ही वास्तु इथें उभी असायला हवी होती. पण पेशव्यांचें एवढें विशाल साम्राज्य कोसळलें तिथें या प्रासादाचा कोण केवा!

माचींतल्या एका बंगल्याच्या दारांतला तो दगडी चौरंग पाहून आणखी कांहीं स्मरणें जागृत झालीं. पुरंदरावर दोन राजपुरुष जन्मले. पहिला छत्रपतींचा छावा संभाजी आणि दुसरा सवाई माधवराव! नारायणरावाच्या बाबतींत पुण्याच्या शनवारवाड्यांत 'ध' चा 'मा' झाल्यावर त्याची भार्या गंगाबाई सतीचें वाण घेऊन सहगमनाला उद्युक्त झाली होती; पण तिला दिवस गेले आहेत हें कळल्यावर जाणत्या मंडळींनीं तसें न करण्याबद्दल तिचें मन वळविलें. राघोबा-दादानेंही 'तुझ्याच वंशाकडे पेशवाई चालवीन' असें तिला संबोधिलें. पण पुढें त्याचीही मति फिरली! भाऊबंदकीच्या अंतस्थ कारवाया सुरू झाल्या. त्यांतूनच मग 'बारभाई' ही संस्था उत्पन्न झाली. ते लोक राजकारणी होते आणि कर्तेही होते. त्यांनीं राघोबादादाची पेशवेपणाची उटी उतरली आणि गंगाबाईच्या नांवें द्वाही फिरवली! तिला पुण्यांत ठेवणें सुरक्षित नव्हे, म्हणून पुरंदरावर हालविण्यांत आलें. तिच्या उदरीं पुत्ररत्न जन्मावें म्हणून नाना फडणिसांनीं जेजुरीच्या खंडोबाला राजेशाही नवस केला आणि बारभाईंचा सत्यसंकल्प फळास आला! १७७४ सालीं अधिक वैशाख शुद्ध सप्तमीस गंगाबाईनें पेशव्यांचा कुल-दीप जगांत आणला! वर उल्लेखिलेला चौरंग ही त्याच्या न्हाणीची शिळा आहे.

एवढें सगळें पाहून, आठवून झाल्यावर आम्ही झपाट्यानें गडाखालीं उतरलों. आम्हांला सासवडपर्यंत सहा मैलांचा प्रवास पायीं करायचा होता आणि त्याआधीं वनांतलें नारायणेश्वराचें मंदिर पहायचें होतें. बरेचसे प्रवासी याच्याकडे ‘काणा डोळा’ करून परतीच्या रस्त्याला लागतात. पण या आळसांत अथवा उपेक्षेंत कलेच्या केवढ्या महान् आदर्शाला आपण मुकतों याची त्यांना कल्पनाही नसेल! या हेमाडपंती भव्य शिवमंदिराच्या महाद्वारांत उभें राहून चौकटीवर नजर टाकली कीं ती आजूबाजूला वळायला तयारच होत नाहीं. महाद्वाराच्या चौकटीचे पांच थर कल्पितां येतात. प्रत्येक थरावर निरनिराळी चित्र-रचना आहे. कुठें कीर्तिमुखांची ओळ, कुठें नृत्यांगनांची विविध



वनांतला नारायणेश्वर

पवित्र्यांतली रेखीव आणि भावदर्शक रांग, कुठें एकाच्या मस्तकावर दुसरा अशा स्त्री-पुरुष वादकांच्या कोरलेल्या उभ्या पट्ट्या, कुठें लहानग्या वलयांत दुसरें तसेंच वलय गुंतवून निर्माण केलेल्या उभ्या सांखळ्या,

कुठें माणसांच्या सहभावानें पशुपक्ष्यांची दाटी, असें तें अप्रतिम सुंदर खोदकाम आहे. कुठें रुद्राचें तांडव मांडलें आहे, कुठें भवानीचें लास्य उमललें आहे, कुठें युगुलांचा प्रेमरस पाझरत आहे, कुठें आश्चर्य ओसंडत आहे, कुठें प्रणयिनींचा मनोभंग डोकावतो आहे, तर कुठें कलाचतुर नारीचा विश्वविजिगीषु आत्मविश्वास प्रगटतो आहे. असे नाना रस आणि नाना भाव त्या काहार दगडांतून उमलले आहेत, ते डोळ्यांच्या अंजुळींत मावत नाहींत.

जी कारागिरी महाद्वाराला ती आणि तशीच उत्तरद्वाराला. त्या कलाकारांना आळस नव्हता आणि दुसरा कसलाच छंद नव्हता. जें प्रतिभेंतून स्फुरलें तें जीवप्राण ओतून दगडांतून व्यक्त करावयाचें हा एकमेव त्यांचा निजानंद! आम्ही आंत शिरलों. दोन दालनें ओलांडून मध्यभागीं मांडलेल्या भरभक्कम कूर्मपृष्ठावर पाय देऊन गाभाऱ्याशीं आलों. मंदिर पश्चिमाभिमुख असल्यामुळें त्या खोलगट गर्भागारांत तिसरा प्रहर संपायच्या पूर्वींच अंधार वस्तीला आला होता. त्यामुळें त्या स्वयंभू नारायणेश्वराचें दर्शन होऊं शकलें नाहीं. हें मंदिर शिलाहारांच्या कारकीर्दींतलें असावें. याचें शिखर मात्र विटांचें उभारलेलें आहे. शिखराचें काम गडाचे हवालदार नीलकंठराव यांनीं केल्याचें सांगतात. पेशवाईंत हें सिद्धस्थान म्हणून प्रसिद्ध होतें. आपल्या मनकामना पूर्ण होण्यासाठीं इथें अनेकांनीं जपतप आचरल्याचे दाखले आहेत. त्याचा विस्तीर्ण प्राकार आजमितीस पडलेला आहे. महाद्वारांत एक पिंपळ सळसळतो. वायव्य बाजूला कांहीं कळकीचीं बेटें डोलतात. मागच्या बाजूला एक तलाव कसाबसा जीव धरून आहे. नारायणेश्वर हें पुरंदराचें तपःस्थान आहे आणि कलाप्रदर्शनही आहे.

---

# ४. शिवरायाचा ‘ प्रताप ’

शिवराज शिवनेरीवर जन्मला. तिथेंच त्याचें शैशव ओसरलें. तोरणा किल्लयावर त्यानें स्वराज्याचा ‘ श्रीगणेशा ’ गिरवला. त्याची राजधानी रायगडावर स्थापन झाली. अनेक जलदुर्ग आणि गिरिदुर्ग त्यानें उभारले. गडांवरून आणि गडांशींच त्याला झुंजावें लागलें. आग्र्याला बंदिवासाचा काळ कंठावा लागला तोही एका भुईकोटांतच. त्याचें बरेंचसें जीवन गड-दुर्गांवरच व्यतीत झालें. आणि हिंदवी स्वराज्य स्थापून त्यानें आपला पुण्यदेह विसर्जिला तोही एका गडावरच. शिवरायाचें जीवन-मरण असें किल्लेकोटांशीं संलग्न आहे.

हे जलदुर्ग आणि गिरिदुर्ग यांच्या उलाढालींमुळेंच शिवरायाला सह्याद्रीचा अंतरंग-परिचय घडला. त्याच्या स्वराज्यस्थापनेचा उपक्रम सह्याद्रीच्या साक्षीनें आणि सहकार्यानें झाला. अनेक पेंचापिळांच्या प्रसंगांतून सह्याद्रीनेंच त्याला सलामत राखलें. आणि म्हणूनच तो सह्याद्रीविषयीं आदर आणि अभिमानही वागवीत होता. “ आमच्या या कठीण प्रदेशांत नुसता कल्पनेचा घोडासुद्धां नाचवणें कठीण आहे. आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ आहे. त्यांतून नदीनाले उतरून जाण्यास वाट नाहीं. ” असे शिवबाच्या तोंडचे सह्यगौरवाचे उद्गार आहेत.

‘ राज्यास बळकटी किल्लयांची ’ हें त्याला अनुभवानें कळलें होतें. म्हणून अचानक हातीं आलेलें भूमिगत धन, छाप्यांत मिळालेली संपदा आणि परकीयांच्या मुलखांतील लुटालुटींचें अमाप द्रव्य यांचा विनियोग त्यानें किल्लयांच्या डागडुजींत आणि नव्या गड-दुर्गांच्या उभारणींत केला. असे जे बरेच गड शिवरायानें बांधले, त्यांतलाच एक प्रमुख म्हणजे प्रतापगड.

निरा आणि कोयना यांच्या कांठीं त्यानें जो मुलूख मिळविला होता तो कबजांत ठेवण्यासाठीं त्याला या ठिकाणीं एका मजबूत किल्ल्याची गरज उत्पन्न झाली. त्यानें लगेच मोरोपंत पिंगळे यांना तशी आज्ञा केली. स्वराज्यांतला हा कर्ता पुरुष मुळापासून शिवरायाच्या ध्येय-धोरणाशीं तद्रूप होता. 'श्रीशिवचरणीं तत्पर त्र्यंबकसुत मोरेश्वर' हींच अक्षरें पुढें मुख्य प्रधान झाल्यावर त्यानें आपल्या शिक्क्यांत कोरलीं आहेत. किल्ल्याच्या बांधणीचें स्थापत्य त्याला अनुभवानें अव-गत होतें. तो लगेच कामाला लागला आणि इ. स. १६५७ त त्यानें या गडाची वास्तुशात केली. शिवरायानें आपलें पहिलें ठाणें इथें ठेविलें.

उ. सातारा जिल्ह्यांतल्या जावळी तालुक्यांत महाबळेश्वराच्या पश्चिमेस आठ मैलांवर प्रतापगडाचा डोंगर आहे. पार आणि किन्हेश्वर या दोन गांवांमधल्या ढोपऱ्या नांवाच्या एका टेंबावर याची बांधणी झालेली आहे. महाबळेश्वराहून महाडला जाणारी एस्. टी. ची गाडी पकडून प्रवाशाला गडाच्या पायथ्याशीं असलेल्या कुंभरोशी या गांवीं उतरावें लागतें. मोटारचा अवघा अर्ध्या तासाचा प्रवास.

पण आमच्या नशिबीं एवढा सुखप्रवास त्या तिथीला विधात्यानें लिहिलेला नव्हता. वाईहून आमची गाडी वेळेवर महाबळेश्वरला पोंचली नाहीं आणि त्यामुळें पुढची महाडची गाडीही 'याल तर तुमच्यासह, न याल तर तुम्हांला सोडून—' या ब्रीदाला अनुसरली आणि आमची पर्वा न करतां निघून गेली. 'ततः किम्' या विवंचनेंत आम्ही आठ-दहा माणसें थोडा वेळ घुटमळलों. अगतिकपणानें आम्हांला घेरलें. सरळ रस्त्यानें गेलों तर आपल्याला अकरा मैलांहून अधिक चालावें लागणार नाहीं याची मीं खात्री करून घेतली. आमच्या प्रवासी मंडळांतले प्रमुख प्रा. के. गो. नित्सुरे मला म्हणाले कीं, 'एवढें अंतर आपण चार तासांत लीलेनें तोडूं!' मी त्यांच्या उमेदीनें अधिक उत्सा-हित झालों आणि सर्वांना म्हटलें, 'उठा, आपापल्या पिशव्या, वळकट्या खांद्याला लावा! आपल्याला देवानें पाय दिले आहेत त्यांचा आज उपयोग करावयाचा आहे. माणूस दैवाधीन असला तरी तो अजून पुरता यंत्राधीन झाला नाहीं हें आपण आज सिद्ध करूं!'

आणि आमचा तो काफिला रडतराऊत बनून नशिबाला दोष देत नव्हे; तर उत्साहभरानें मार्गस्थ झाला. विश्वामित्राला मेनका, शुकाला रंभा, तशी एक भाडोत्री मोटारगाडी आमचा निर्धार भंगवून आम्हांला नादीं लावण्यासाठीं आडवी आली. आम्हीही क्षणैक मोहवश झालों हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. पण श्रीमंत वरपित्याच्या ऐटींत तिनें उच्चारलेला आंकडा ऐकून महाबळेश्वराच्या त्या थंड हवेंतही आम्हांला घाम फुटला आणि आमचा मोहज्वर साफ उतरला. महाबळेश्वरीं नव्हे तर कनकनारायणांच्या नंदनवनांत आपण पाय ठेवला आहे हें त्या क्षणीं आम्हांला उमगलें.

दुपारचे दोन वाजले होते. सूर्य मध्यान्हावरून कलंडला होता. वस्तुतः दिवसांतला हा त्याचा ऐन प्रतापकाल; पण या ठिकाणीं त्याच्या उन्हांत चटका नव्हता. वाऱ्यांतही भरपूर थंडावा होता. आम्ही जणुं सायंसहलीला निघालों होतों. कधीं उन्हांतून, कधीं सावलींतून तर कधीं गर्द राईंतून. पावलापावलानें आम्ही उतरत होतों. प्रत्येक वळणाला नवीं शिखरें, नव्या दऱ्या, नवे कडे पहात होतों. दऱ्याखोऱ्यांतलीं नाना जातींचीं असंख्य झाडें शेंड्यांकडून दिसत होतीं आणि त्यांच्या बुंध्याशीं कोणकोणत्या हिंस्र श्वापदांची वस्ती असेल त्याची कल्पना करतां येत नव्हती.

पुराणकाळीं दिलीप आणि सुदक्षणा रथारूढ होऊन हिमालयाचा मार्ग क्रमीत होतीं. वनांतलीं हरणें रस्त्यांतून बाजूला होऊन त्यांच्या रथाकडे स्तिमित नयनांनीं पहात होतीं आणि त्या राजदंपतीला त्यांच्या विस्तीर्ण लोचनांत आपल्या प्रिय व्यक्तींच्या नेत्रांचें सादृश्य पहातां येत होतें असें कालिदास सांगतो. पण आमच्यापुढून रस्ता ओलांडणारीं हरणें मात्र चौखूर उडून वरल्या रानांत अदृश्य झालीं. दिलीपाविषयीं त्या जातीला वाटलेला निर्भय विश्वास आमच्याविषयीं वाटला नाहीं. मला वाटलें, सुधारला म्हटला जाणारा मानव आज इतका भयंकर झाला आहे का? शक्य आहे. कारण, त्याची स्वतःची जातच त्याच्यावर विश्वासत नाहीं तिथें इतरांनीं त्याचा इतबार कसा धरावा!

तो आंबेनळीचा घाट उतरतांना मी कांहीं वेळ मंडळीपासून अलिप्त, असंग झालों. इतर सर्व व्यवधानें सोडून मीं सह्याद्रीचें ध्यान धरलें. दृष्टीसमोरची ती सृष्टि न्याहाळतांना मला प्रत्यय आला तो हा कीं, वसंताप्रमाणेंच शिशिरालाही स्वतःचें असें वैभव आहे. तो कांहीं अगदींच कर्मदरिद्री नाहीं. मात्र त्याचा साक्षात्कार घ्यायला रान जवळ करायला हवें. आतां हीच टोंकदार पानांची धायटी पहा. तिच्या काठ्या रस्त्यावर कमानीसारख्या ओणवल्या आहेत आणि त्यांना अथपासून इतिपर्यंत तांबडीं फुलें डवरलीं आहेत. द्राक्षांचा रस काढावा, तो बाटलींत भरावा अन् त्यांत तिचीं चार फुलें घालून ठेवावीं कीं कांहीं दिवसांनीं रुचिक द्राक्षासव तयार. ती कऱ्याची वेल त्या तरुण आम्रवृक्षाला कशी सर्वांगीं वेटाळून राहिली आहे पहा. हिला पाहिलें कीं फाजील लाड केल्यामुळें डोक्यावर चढलेल्या रमणीची कुणालाही आठवण व्हावी. हिच्या पांढऱ्या फुलांना पाकळ्यांऐवजीं दीर्घ तंतु आहेत आणि ते सर्व बाजूंनीं लवून, वांकून देंठाच्याही खालीं आले आहेत. हा पुष्पसाज दुरून पाहाणाराला वाटतें कीं, तिच्या आश्रयवृक्षावर कोणी तरी कापूसच तुणून उधळलेला आहे.

मात्र खुरीच्या झाडाचीं फुलें पांढरींच असलीं तरी त्यांची तऱ्हा वेगळी. बांधा अटकर, पाकळ्या जाड आणि त्यामुळें तीं नेहमींच उभीं असतात. कऱ्याची दृष्टि धरणीला खिळलेली, तर खुरीची आभाळाला लागलेली. कुंद आणि करवंद या तर वनश्रीच्या अनसूया-प्रियवंदा. दोघीही शिशिरांतच फुलतात. फुलांचा वर्ण शुभ्र, पाकळ्यांचा आकारही मिळता-जुळता; पण पाकळ्यांच्या संख्येंत त्यांनीं वेगळेपण राखलें आहे. करवंदीचीं फुलें चतुर्दळ तर कुंदीचीं अष्टदळ. रस्त्याच्या कडेनें सगळ्या घाटांत पिवळ्या फुलांचीं कसलीं तरी नाजूक रोपटीं उगवलीं आहेत तीं केवळ रसिकांच्या दृष्टीला सुखवण्यासाठींच नव्हेत का? मला त्याचें नांव माहीत नव्हतें, त्यामुळें मीं त्यांचें रानशेवंती हें नामकरण स्वतः-पुरतें करून टाकलें. हसोळीच्या झाडांनाही आतांच फुलोरा आला आहे. श्रावणांत तिचीं मोठ्या वाटाण्याएवढीं लांबट फळें तयार होतील आणि

गोवळ्यांच्या फटार्शीतून बंदुकीच्या गोळीसारखीं उडून आवाज काढतील.

सह्याद्रींत जिथें झाडी दाट तिथें तिच्या अंगावर शेवाळाची दाटणीही अधिक. शेवाळ ही किती क्षुद्र, उपेक्षणीय वस्तु! पण आपली फिकट हिरव्या रंगाची मखमल जेव्हां तें वृक्षांच्या शाखा-मूलांवर चढवतें तेव्हां त्यांचें सौंदर्य दुणावतें. या घाटांत शिशिरऋतूंतही काळ्या कपारींतून ओघळणाऱ्या जलधारा तुम्हांस दिसतील. जशा कांहीं मस्त हत्तींच्या गंडस्थळांतून स्रवणाऱ्या मदधाराच. एका ठिकाणीं तिला पानांची पन्हळ बसविली होती आणि ती करांगळीएवढी शुद्ध शंखासारखी धार कातळाचें अंग सोडून थोडी पुढें पडत होती. मला तिचा अनादर करणेंच शक्य नव्हतें. तहान नसतांही भागीरथीच्या भक्तिभावानें मी तिचें जीवन प्यालों.

सात-आठ मैल पायपीट झाल्यावर मग मात्र आमच्यांतल्या नाजूक मंडळींच्या मांड्यांत गोळे आले आणि ती मैलाचे दगड मोजायला लागली. ‘ आठ गेले, नऊ गेले, आतां फक्त दोन राहिले. आतां तर एकच ! ’ आम्ही घाट उतरत होतों तसतसा आमच्या समोरचा सविताही उतरत होता. आमच्याइतकीच त्यालाही घाई होती. किंबहुना त्याच्या घाईमुळेंच आम्हांला पावलें झपाझप उचलावीं लागत होतीं. त्याच्या अस्ताबरोबरच आम्हींही पायथा गांठला. तो गगनांगणींचा दिवा मालवला. मावळतीच्या क्षितिजावर गुलालाचें पाणी ओतलें. थोडा वेळ त्या बाजूला वणवा लागल्यासारखें दृश्य दिसलें आणि मग हळूहळू पश्चिमही पूर्वेप्रमाणेंच दुर्मुखूं लागली.

कोयनेला ‘ अनुकूल ’ होऊन आम्ही चालत होतों आणि तिच्या पात्रांत पाण्याऐवजीं खडेगोटे आणि पाणझुडपेंच पहात होतों. आम्ही आतां जावळीच्या अंतरंगांत शिरलों होतों. तिथून अष्टदिशांना तटबंदी उभारून राहिलेल्या सह्यशाखांवर जेव्हां मीं नजर फिरवली तेव्हां कवि गोविंदाच्या त्या काव्यपंक्ति मनावर ठसल्या.

“ जावळिचा हा प्रांत अशानिच्या वेलांची जाळी
भयाण खिंडी वसल्या पसरुनि ‘ आ ’ रानोमाळीं ”

चंद्रराव मोऱ्यांची जावळी ती हीच. बेदरशाहीपासून मोरे हे तिथले जहागिरदार. चंद्रराव ही त्यांची किताबत. स्वराज्याचा उपक्रम केल्यानंतर त्याच्या विस्तारासाठीं आणि सुरक्षिततेसाठीं शिवरायाला जावळीची गरज निर्माण झाली. ‘ ज्याच्या कबजांत जावळी, त्याच्या कबजांत वाईप्रांत, सह्याद्रीचा घाटमाथा आणि त्यासमोरचें कोंकण,’ एवढें तिचें महत्त्व होतें. शिवरायानें चंद्ररावाला वळविण्यासाठीं प्रथम सामोपचार केला ; पण तो उद्दाम त्याला बधेना. ‘शिवाजीला राजा म्हणतो कोण ? आम्ही राजे. जावळीवर उद्यां येत असाल तर आजच या ! ’ हें त्याचें आव्हान शिवबाला स्वीकारावें लागलें. खरोखर त्याला हात लावण्याची खुद्द अदिलशहाचीही हिंमत नव्हती. तो स्वतःला ‘ बारा रावांचा काळ ’ म्हणवून घेत असे. पण शिवबानें एका झटक्यासरशीं त्याला कोयनेचें पाणी पाजलें आणि जावळी स्वराज्यांत आणली ! शिवरायांला या प्रकरणांत मुलूख तर मिळालाच आणि वर धनसंपदाही मिळाली. त्या द्रव्यबळावर त्याला आपली फौज वाढवितां आली आणि कोंकणचा मार्ग निष्कंटक झाला तो वेगळाच.

पण आम्ही जर आणखी थोडे रेंगाळलों असतों तर आमचा मार्ग मात्र चांगलाच सकंटक झाला असता. गडाच्या पायथ्याच्या कुंभरोशी गांवांत एक धर्मशाळा आहे असें आम्हीं ऐकलें होतें ; आणि रात्र तिच्याच आश्रयानें काढण्याचें ठरविलें होतें. पण गांवांत शिरतांच श्री. घोरपडे नांवाचे एक सद्‌गृहस्थ सुदैवानें आम्हांला सामोरले आणि म्हणाले,

“ धर्मशाळेंत नाहीं तुमचें जमायचें. या, मी तुम्हांला दुसरी जागा देतों. ”

देव पावला म्हणून आम्ही त्यांच्या मागून गेलों आणि एका प्रशस्त पडवींत हातपाय पसरले. त्यांचीं गडीमाणसें आमच्या दिमतीला आलीं आणि आमच्या सगळ्याच गैरसोयी दूर झाल्या.

दुसऱ्या दिवशीं उषःकालीं महाबळेश्वराच्या डोक्यावर शुक्र–चंद्र जोडीनें प्रगटले आणि आपल्या सुवर्णकिरणांच्या मऊ शलाका टोंचून त्यांनीं आम्हांला पुढच्या प्रवासासाठीं जागें केलें. मीं उठून बसलों. हातांत हात घालून चालणाऱ्या त्या उभय ज्योतींचें दर्शन घेतलें. सह्यराजाच्या शबल–धूसर वर्णावर त्यांनीं केलेली सौम्यसुंदर मखलाशी माझ्या दोन्ही डोळ्यांत मावेना. वेडें होणें, मंत्रमुग्ध होणें ही कांहीं कवींचीच मक्तेदारी नव्हे. आमच्यासारख्या गद्य माणसांनाही तसलें 'कांहीं तरी' अनुभवतां येतें. कवि असतील ते असल्या दिव्यतेवर कल्पनांची मोत्येंजाळी विणतील, तर आम्ही निदान 'वा:! सुंदर!' एवढें तरी म्हणूंच. पण पूर्वदिशेचा हा थाट क्षणभंगुर होता. सूर्याचा एकचक्र रथ या दोन ज्योतींच्या मागून दौडत येत होता. त्या नखरेल चंद्रकलेचें आणि त्या शुक्रदेवाचें राज्य आतां अवघें औट घटकेचेंसुद्धां उरलें नव्हतें. दिनमणि आधीं त्यांची कांति लोपविणार होता आणि मग त्यांनाही ग्रासणार होता. आपण पाहिलें तें जागेपणीं का स्वप्नांत असा पहाटच्या जगाला संदेह पडणार होता.



पायथ्याकडून प्रतापगड

काल सूर्यनारायणाबरोबर आम्ही उतरलों आणि आज त्याच्याच

बरोबर चढूं लागलों. आमचा चढाव अवघा दीड मैलाचा होता. आधींच मार्ग सोपा आणि त्यांतून तिथल्या सर्वोदय केंद्रानें त्यावर हात फिरवलेला. त्यामुळें तांबडमातीचा तो छायापथ चढतांना विशेषसा त्रास झाला नाहीं. आम्ही पुन्हां पुन्हां आमचें लक्ष्य पहात होतों. त्या गडाच्या सगळया विस्तारावर सूर्याची छानदार ओपळी पसरली होती. गडाखालीं पोंचल्यावर डाव्या हाताला एक पायवाट फुटलेली दिसली. 'दर्गाशरीफकडे जाण्याची वाट' अशी तिथें पाटी झळकत होती. दर्गाशरीफ म्हणजे अफजुलखानाची कबर. मीं म्हटलें, आधीं आपण गडावर जाऊन 'भवानी' करूं. इतरांची संभावना मागाहून.

या गडाला फक्त एकच महाद्वार आहे. त्याच्या खालच्या बाजूला वरून आलेलें पाणी खालीं लोटणारा पावसाळी ओढा आहे. तो ओलांडल्यावर वाट नकळत उजव्या अंगाला वळून आपली फसगत करते आणि थोड्या बांधीव पायऱ्या चढायला लावून आपल्याला दरवाजांत उभें करते. दरवाजाच्या आंतल्या अंगाला द्वाररक्षकांचीं तणारें आहेत. सायंकाळीं सूर्यास्ताच्या आधीं ते दरवाजा बंद करतात आणि सूर्योदयीं पुनः उघडतात.

तिथेंच त्या डोंगराला एक सोंड फुटली आहे आणि ती रेषा अन् अर्धवर्तुळें अशा आकारांत टोंकाच्या बुरजापर्यंत दोही अंगांनीं बांधून नेलेली आहे. हा बुरूज खालपासून आमची नजर बांधीत होता म्हणून आम्ही प्रथम त्याच्यावरच चढलों. खालच्या अंगानें ठेंगण्या दरवाजांतून त्याला सोमसूत्री प्रदक्षिणाही केली. हा बुरूज मुळाकडून खावटला असला तरी त्याची वरची बांधणी अजून मजबूत आहे. चौकशी करतां कळलें कीं, अबदुल्लाबुरूज तो हाच. अफझुलखानानें दगा केल्यावर शिवरायानें त्याला मारलें त्या प्रसंगीं, संभाजी कावजी या मर्दान्या गड्यानें तोडून घेतलेलें अफजलाचें शीर या बुरुजांत पुरण्यांत आलें असें इतिहास सांगतो.

भवानीच्या नगारखान्याची खिडकी उघडून पाहिलें तर हा देवीला थेट सन्मुख दिसतो. गडाच्या पूर्व भागास बाहेरची तटबंदी आहे. ती

आणि हा बुरूज अफझुलखानाच्या प्रसंगानंतर शिवाजीनें बांधला आहे. त्यामुळें देवीच्या मंदिराकडे जाणारा मार्ग आतां निराळा झाला आहे. पूर्वींचा मार्ग बोगद्यासारखा दगडांतून खोदून काढलेला होता. आजमितीस त्याचा वापर नसला तरी अजून तो सुस्थितींत आहे.

भवानीचें प्रवेशद्वार समोर नसून डाव्या हाताला आहे. आम्ही तिथें दाखल झालों तेव्हां आमची उंची साडेतीन हजार फूट झाली होती. शिशिरांतल्या झोंबऱ्या वायूचा झडझडाट सुटला होता. झाडेंमाडें नुसतीं घुसळून-पिळवटून निघत होतीं. मला वाटलें, मुग्ध कळ्यांशीं हितगूज करणारा, सस्यांकुरांना नाचवणारा वारा तो हाच का ? मग या वृक्षांवरोबर तो कां अशी धुमाळी खेळतो ? त्यांनीं त्याच्या स्वच्छंद वाहणीला अटक केली म्हणून ?

त्या दिवशीं महाशिवरात्र होती. सहजगत्या आम्हांला शिवाभवानीचें दर्शन घडणार होतें. पण तें निव्वळ 'धोंडभट्टी' करून घेणें प्रशस्त वाटेना. गडाच्या पश्चिमेला उंच बुरुजाच्या आंतल्या अंगाला एक तळें होतें. वरच्या बाजूला स्नानासाठीं पायरी मांडून ठेवल्या होत्या. तिथल्या पुराणिकांच्या घरून आणलेली घागर मीं भरून वर आणली. कपडे काढतानांच आर्धा अंगावर तरारून कांटाळा उठला. मग ती चर्फतुल्य जलाची घागर 'गंगेऽऽहर' म्हणून डोक्यावर ओततांना अंगाला किती सुया टोंचल्या असतील तें कल्पनेनेंच जाणावें.

पण वरून पाणी पडतांच आंतली ऊब बाहेर आली. थंडीवाऱ्याचें भय एकदम पळालें. ताज्या टवटवीत मनानें आम्ही मंदिरांत प्रविष्ट झालों. पुजाऱ्यानें गर्भागाराचें कवाड नुकतेंच खोललें होतें; पण कोंडलेला अंधार मात्र बाहेर पडायला राजी नव्हता. मूर्तीचें दर्शन होत होतें; पण तें केवळ स्थूल, निरवयव. आम्हांला तर भवानी सांग, सायुध, सशक्तिक अशी न्याहाळायची होती. आमच्या या उत्कंठेला तसेंच सबळ कारण होतें. हिच्यासाठीं शिवरायानें थेट हिमालयापर्यंत संधान बांधलें होतें. तिथल्या त्रिशूलगंडकी, श्वेतगंडकी आणि सरस्वती यांच्या त्रिवेणी-संगमावरची एकसंध शिळा मिळवली होती. तिथल्या

लीलासेन राजानें शिवप्रभूला त्या कामीं साहाय्य दिलें होतें. नेपाळी कारागिरांकरवीं त्यानें ही श्रीमूर्त घडवली होती. राजगडावर हिचें प्रथम दर्शन घेतलें होतें आणि मोरोपंत पिंगळयांच्या हस्तें तिची या ठिकाणीं प्रतिष्ठा केली होती.

पण ती शिवरायाची कुलस्वामिनी, महाराष्ट्राची जगदंबा आमच्यासाठीं तमाची बुंथी दूर करायला तयारच होईना. आम्हीं डोळे ताणले; पण फुकट! शेवटीं तिथल्या फडणिसांना आमची दया आली. त्यांनीं भिंतीजवळचा मोठा आरसा उचलून सभामंडपाच्या दारांत नेला, सूर्यकिरण त्याच्यावर घेतले आणि थेट गाभाऱ्यांत त्यांचें परावर्तन केलें! आणि मग काय बोलावें! भवानी एकदम अष्टांगीं झळाळली. तिचें मुखमंडल सुव्यक्त झालें. अष्टभुजा, आयुधें आणि सुवर्णालंकार यांच्यासह स्वच्छ दिसल्या. अगदीं काळवथर नव्हे पण शबल, खरबरीत दगडातून ही मूर्ति आकाराला आली आहे. समभंग, अभंग, त्रिभंग आणि अतिभंग असे मूर्तींचे चार प्रकार असतात. त्यांत भवानीची मूर्ति शेवटच्या प्रकारांत येते. वाऱ्यानें वृक्ष वांकतो तसें भावभरानें कोणत्या तरी एका अंगावर झोंक देऊन प्रहरणाच्या पवित्र्यांत उभें राहणें हें अतिभंगाचें लक्षण.

शिवरायानें तिच्या अष्टभोगांची कायम व्यवस्था करून ठेवली आहे. रोज तिच्या शयनीं-जागरणीं चौघडा झडतो. शिंगाडे, कर्णेकरी दीर्घनाद घुमवतात. हडप आडनांवाचा पुजारी तिला पंचामृतांसह महानैवेद्य करतो. पुराणिक नित्य पुराण सांगतो. फडणीस सगळी व्यवस्था पहातो. दर पौर्णिमेला बलिदान आणि पालखी होते. त्रिपुरीला प्राकारांतल्या दोन्ही दीपमाळा पाजळतात. शिवकालीं तर इथें येणाऱ्या भक्तांना दुपारची सोय असे. देवीचें सध्यांचें उत्पन्न तेरा हजार रुपयांचें आहे. तिचे पंचवीस-तीस सेवेकरी आहेत. गडावर वस्ती आहे ती त्यांचीच. त्यांना पूर्वींचीच सेवा आणि पूर्वींचेंच वेतन. आजच्या महागाईला तो मुशाहिरा 'शाकाय वा स्याल्लवणाय वा स्यात्!' यामुळें सगळेच तिथें हलाखीचें जिणें जगतात. वर्षांतून कांहीं महिने महाबळेश्वर


गाजवजतो आणि तिथून बरेच लोक प्रतापगडाची सहल करायला येतात, त्यांना येन केन प्रकारेण उपयोगी पडून ते आपला हात काय ओला करून घेत असतील तेवढाच.

दर्शन यथासांग झाल्यावर आम्ही देवीचा नवा सभामंडप, नगारखाना आणि प्राकार हिंडून पाहिला. त्यानंतर बाले-किल्ल्याच्या चढणीला लागलों. इथला बालेकिल्ला विशेषसा उंच नाहीं. मंदिरापासून शेंदोनशें पावलें चढल्यावर एक छोटेखानी दरवाजा लागतो आणि आपला बाले-किल्ल्यांत प्रवेश होतो. सुरुवातीलाच एक शिवमंदिर आहे. त्याच्या-पुढचा पाडित चौथरा ही शिवरायाची सदर असें सांगतात. मंदिराच्या मागच्या अंगाला राजमाता जिजाबाईंच्या वाड्याचे अवशेष दिसतात. तिथलें अजूनही जीव धरून असलेलें पिंपरीचें झाड त्या काळीं जिजाबाईंच्या आवारांत होतें अशी माहिती मिळाली.

विमानांतून पहाणाऱ्याला प्रतापगडाचा आकार साधारण फुल-पाखरासारखा दिसेल. चौदाशें फूट लांबी आणि चारशें फूट रुंदी एवढा त्याचा विस्तार. इतर गडांहून याचा विशेष म्हणजे याला सगळीकडे तटबंदी आहे. बचाव आणि चढाई या दोन्ही युद्धतंत्रांच्या दृष्टीनें हा किल्ला उपयुक्त असल्याचें कॅ. मोडकांनीं लिहिलें आहे. त्याचे पश्चिमोत्तर कडे आठशें फुटांहून अधिक उंच आहेत. तटाच्या भिंतीवर ओणवून खालच्या घळींत पाहतांना डोळ्यांपुढें अंधेरी येते. त्यामुळें इकडचे बुरूजही चाळीस फुटांहून अधिक उंचीचे बांधावे लागले आहेत. त्याच्याच वायव्येकडच्या एका बुरुजाला रेडकाबुरूज असें नांव पडलें आहे.

पूर्वी या भागांतले महार लोक दर तीन वर्षांनीं दसऱ्याच्या दिवशीं इथें भवानीला रेड्याचा बळी देत. प्रथम त्या उद्देशानें एक रेडा सोडा-यचा, त्याला यथेच्छ चरायला देऊन माजवायचा आणि दसऱ्याला शृंगारून इथें आणायचा. या बुरुजाखालीं त्याचें नाक तोडायचें. तिथून रक्त भळभळूं लागलें कीं खालच्या घेऱ्यांतून पिटीत-पळवीत त्याला तळयाच्या बुरुजाखालीं आणायचें आणि तिथें त्यांच्यांतल्या ' शामित्रकुशल ' ऋत्विजानें त्याच्यावर खड्ग उपसायचें !

पण काँग्रेसचें राज्य आल्यापासून हें दारुण पशुमारण कायद्यानें बंद झालें आहे. हेंच नव्हे तर अशीं कित्येक ठिकाणचीं !



भवानीचें मंदिर

बालेकिल्ला उत्तर–पूर्व या अंगानें उतरावा लागतो. या उतारांतच आपल्याला दोन तळीं लागतात. तिथून आणखी थोडें पुढें आल्यावर गडप्रदक्षिणा पुरी होते आणि आपण पुनः भवानीच्या पायांशीं येतों. तिथें उभें राहून आग्नेयीच्या पर्वतराजीकडे पुढा केला कीं दाट झाडांनें भरलेलें कोयनचें खोरें दिसूं लागतें. तिच्या कांठचा तो उघडा माळही चौकोनी आकारांत दिसतो. अफझुलखानाच्या सैन्याचा तळ पडला होता तो याच माळावर.

१६५७ सालांतील गोष्ट आहे. शिवाजी विजापूरच्या दरबाराला अगदीं असह्य झाला होता. त्याची शक्ति प्रतिदिनीं वाढत होती. नवे नवे मुलूख काबीज करून तो अदिलशाहीचे लचके तोडीत चालला होता. अदिलशाही मरणाच्या पंथाला लागली होती. जगायचें तर सारें बळ, सारें राजकारण पणाला लावून त्याचा पक्का बंदोबस्त करणें भाग होतें. शिवाजी असा तसा मरणार नव्हता! त्याच्यावर डोंगर उलथून घालणें अवश्य होतें. अदिलशहाची माता बडी साहेबीण हिनें अफजुलखान त्याच्यावर लोटून दिला तो डोंगर म्हणूनच. आणि त्याच्या मदतीला दिला तो सैन्याचा सागरच. बारा हजार घोडदळ, दशसहस्र पायदळ, नव्वद मोठ्या आणि चारशें लहान तोफा हे आकडे शिवरायाचें अनावर बळ आणि विजापूरकरांच्या पोटांतलें भय याच गोष्टी दर्शवीत नाहींत काय?

खानानें या मोहिमेचें सेनापत्य स्वीकारलें. त्याला या प्रांताची चांगली माहिती होती आणि थोड्याच काळापूर्वीं मोगलांविरुद्ध लढाई गाजविल्यामुळें त्याचा गर्वही तट्ट फुगला होता. 'शिवाजीचा निर्मूळ फडशा' करण्याचा अंतस्थ हुकूम घेऊन तो पुरत्या तयारीनिशीं निघाला. पण चांगल्या मुहूर्तावर मात्र नव्हे! निघ-तानांच या 'भटारणीच्या छोकऱ्याला' अपशकुन झाले. तो एका अवलियाच्या नादीं होता. त्यानें त्याला स्पष्ट सांगितलें कीं 'या मोहिमेंत तुला यश नाहीं.' त्यामुळें त्याच्या तोंडचें पाणी उतरलें. या त्रेसष्ट बिब्यांच्या नवऱ्यानें, आपलें बरें-वाईट झालें तर त्या दुसऱ्याच्या घरांत पडूं नयेत म्हणून काय उपाय केला असेल असें तुम्हांला वाटतें? उपाय अगदीं साधा! एका हारीनें सगळ्या जणींना उभें करून त्यांचें सफाईदार शिरकाण! म्हणजे प्रथम माणुसकीला चूड लावूनच त्यानें आगकूच केलें म्हटलें तरी चालेल. पुढें त्याच्या निशाणाचा हत्ती मेला हा दुसरा अपशकुन! या प्रकारांमुळें, निघतांना तो आंतून कितीसा उत्साही असेल याची कल्पना करावी. पण त्याला आपला

पाय मागें घेणें शक्य नव्हतें. परत फिरायचें तर तोंडाला काळेंच फांसायला हवें होतें.

तो निघाला. त्याला सर्वभावें मदत करण्याबद्दल जेधे-देशमुख यांना बड्या साहेबिणीचे सक्त हुकूम सुटले. घोरपडे, पांढरे, खराडे, मुंबाजी भोसले इत्यादि मराठे सरदार, कोणी खुशीनें तर कोणी सक्तीनें, त्याला येऊन मिळाले. खान प्रथम तुळजापुरीं धडकला आणि त्यानें शिवरायाच्या कुलस्वामिनीची 'अवज्ञा' केली. पुढें पंढरपुरांतही विध्वंसक प्रताप गाजवले. हूल दाखविली पुण्यावर जाण्याची आणि आला वाईला. आधीं जावळी हस्तगत करायची आणि मग तिथून कोंकण, नि पुणें यांच्यावर हात टाकायचा असा त्याचा बेत होता.

त्या वेळीं शिवरायाचें वास्तव्य राजगडावर होतें. खान वाईला येऊन पोंचण्यापूर्वींच गुप्तचरांनीं त्याला त्या गोष्टीची चित्तंबातमी दिली. समर्थांचे रामदासी शिष्य प्रांतभर धर्मसंचार करीत होते, त्यांना ही अशुभ वार्ता समजली आणि त्यांनीं ती स्वामिचरणीं सादर केली. लगेच समर्थांनीं चारच ओव्यांचें एक पत्र शिवबाला धाडलें. तें पत्र वरून भोळेंभावार्थी, पण आंतून कावेबाज होतें. इतरेजनांना त्याचा खरा अर्थ कळणें शक्य नव्हतें. प्रत्येक चरणाचें आद्याक्षर घेऊन त्यांची ओळ केली तर 'विजापूरचा सरदार निघाला आहे' हें वाक्य तयार होत होतें. हें वृत्त अशा सांकेतिक शब्दयोजनेंत कळवून समर्थांनीं त्या पत्राचा पुढीलप्रमाणें समारोप केला होता.

"एकांतीं विवेक धरूनी
इष्टयोजना करावी"

आणि त्या समर्थांच्या पट्टशिष्यानें ती ताबडतोब केली. राजगडाहून पुण्याला येऊन त्यानें आधीं तिथला बंदोबस्त केला. तिथून पुरंदरला येऊन तिथली सावधगिरी घेतली. आणि एवढें करून तो जावळी उतरून प्रतापगडीं येऊन बसला. खानाच्या प्रचंड फौजेला खडे चारतां येतील तर ते जावळींतच हें त्याला ठाऊक होतें. थोड्याच दिवसांत वाईहून खानाचा त्याला हुकूम आला. 'आजवर जबरदस्तीनें बळकावलेला

मुलूख सोडून दे आणि माझ्यापुढें दांतीं तृण धर!' शिवरायाचा ताबडतोब प्रतिनिरोप. 'सगळे किल्ले सोडीन. जावळी स्वाधीन करीन. कट्यार खालीं ठेवीन.'

शिवबानें एकंदर परिस्थिति लक्षांत आणली. आजवर आलेल्या परचक्रांत हें महाप्रचंड आहे हें जाणलें. युद्धाचा प्रसंग शक्यतोंवर टाळायचा, खानाला थातुरमातुर करून परत फिरवायचा आणि हें नच जमलें तर शेवटीं रणखांब पुजायचा, असें त्यानें आपलें धोरण ठरविलें. उलटपक्षीं खानालाही युद्ध नको होतें. त्यानें जावळीच्या दुर्गमतेचा अंदाज घेतला होता. इकडच्या निबिड दऱ्याखोऱ्यांतून आपल्या गबदुल सैन्याचा निभाव लागायचा नाहीं हें त्याच्याही लक्षांत आलें होतें. सरळ दोन हात करून नव्हे; तर दगाफटक्यानें शिवाजीचा कांटा कसा काढतां येईल हें तो मनांत घोळवीत होता.

मग उभयतांचे वकील, एकमेकांकडे खेटे घालूं लागले. मसलती, कानगोष्टी झाल्या. खानानें जावळींत यावें आणि शिवाजीनें तिथें समक्ष भेटून शरणागति स्वीकारावी असें उभयपक्षीं ठरलें. खान हुरळला. तो जावळींत उतरण्यासाठीं रडतोंडीचा घाट चढूं लागला. घाट अति खडतर; त्यामुळें चढतांना हत्ती-घोडे थकले. जनावरें मेलीं. शेंकडों सैनिक जायबंदी झाले, मेले. कळकाच्या बेटांतून आणि कारवीच्या गिचमिडांतून वाट काढतां काढतां निशाणें फाटलीं. रडतोंडीनें खानाला प्रारंभींच रडवलें. शाहीर अज्ञानदास सांगतो—

**"मागच्याची खबर नाहिं पुढल्याला**
**कटकाची कैची खबर त्याला**
**जाऊं नेणें येऊं नेणें**
**ही गत जाली अब्दुल्ल्याला**
**जावळींत उतरुनी**
**अब्दुल दिशिभुल झाला"**

कोयनाकांठच्या माळावर त्याची छावणी पडली. पुनः हेजिबांची जाये झाली. गडाखालच्या माचीवर भेटीची जागा ठरली. शिवबानें

खानाच्या स्वागतासाठीं वैभवशाली मंडप उभारला. राजेशाही थाटांत त्याच्या सर्व सुखसोई केल्या. भेटीच्या अटी पुढीलप्रमाणें ठरल्या —

'खानानें सशस्त्र सदरेस यावें. दोनतीनच शरीररक्षक समागमें असावे. शिवबानें हीच अट पाळावी. पडल्या प्रसंगासाठीं म्हणून उभयतांनीं एकनिष्ठ दहा मर्दाने आणून बाणाच्या खाचेवर उभे करावे.'

खानानें दगा केला तर आपल्यावर बाजी उलटूं नये; किंबहुना त्याच्यावरच उलटावी म्हणून शिवरायानें सगळ्या जावळीभर गुप्तपणें सैन्यरचना केली. आपल्या धुरंधर सरदारांना त्यानें मोक्याच्या जागीं दबा धरून बसविलें. तानाजीला मात्र स्वतःजवळच ठेवून घेतलें. तो त्याचा कलिजा होता. त्याला शिवराज म्हणाला —

**"माझ्यासंगें तूंच रहा मत्प्राणा तान्ह्या रे**
**शर्वांत माझ्या प्राण घालशिल कठिण समयिं बा रे"**

मग शिवरायानें भेटीला जाण्याची तयारी आरंभिली. आंत चिलखत, वर केशरी अंगरखा, डोक्यावर शिरस्त्राण, त्यावर जिरेटोप, कमरेला तलवार, कमरबंदांत कट्यार, अशा थाटांत शिवराज सज्ज झाला. त्यानें प्रथम कुलदेवी भवानीला प्रणाम केला. नंतर माउलीच्या चरणांवर माथा ठेवून तिचा आंसवांसह आशीर्वाद घेतला. 'माझें कांहीं बरेंवाईट झालें तर संभाजीच्या नांवें स्वराज्याचें कार्य पुढें चालवा' म्हणून मंत्रिजनांना आदेश दिला. अशी सर्व निरवानिरव करून शिवबा गंभीरवृत्तीनें गड उतरूं लागला.

१० नोव्हेंबर १६५९ रोजीं भर मध्यान्हीं महाराष्ट्राच्या स्वराज्याचें आणि विजापूरच्या अदिलशाहीचें अस्तित्व दैवाच्या तराजूंत घातलें गेलें. पारडीं खालींवर होऊं लागलीं. शिवभारतकार सांगतो —

**'शिवस्याफजलो वेद हृदयं स च तस्य तत्**
**तं विधिं तु विधिर्वेद वेद संधिविधिं जनः'**

शिवाजीचें मन अफजुल ओळखत होता. अफजुलाच्या अंतरंगाचा ठाव शिवबानें घेतला होता. मात्र भवितव्यतेच्या पोटीं काय आहे तें

फक्त विधाताच जाणत होता. पण लोकांची आपली साधीभोळी समजूत कीं, शिवाजी आणि खान यांचा आतां समेट घडणार आहे.

खान प्रथम आणि शिवराज मागाहून शामियान्यांत दाखल झाला. हेजिबांनीं परस्परांचा परिचय घडवला. खानानें विश्वास उत्पन्न करण्यासाठीं आपली समशेर दूर फेकून दिली आणि तो लटका प्रेम-पाडिभर दाखवीत आलिंगनासाठीं पुढें झाला. दोघे उराउरीं भेटले. या सह्याद्रींतल्या शेराला चेपण्याची खाशी संधि मिळाली असें खानाला वाटलें. खानाच्या मानानें शिवराय अगदींच ठेंगू आणि किरकोळ होता. त्यामुळें खानाला त्याची मान सहजपणें बगलेंत दाबतां आली. लगेच कट्यार उपसून खानानें शिवबाच्या कुशींत खुपसली. पण त्याच्या अंगांत जिऱ्याचें बखतर होतें, त्यामुळें 'हत्यार कारगार न जालें.' शिवराय मनांत म्हणाला, 'तूं कपट आचरलेंस ना? मग आतां माझें प्रत्युत्तर घे. वांकड्या मेढीला वांकडें नेम मला चांगलेंच काढतां येतें.' एक पेंच घालून त्यानें प्रथम आपली मान सोडवून घेतली आणि दुसऱ्याच क्षणाला स्वतःची जमदाड खानाच्या पोटकुळांत खुपसून अशा रीतीनें बाहेर ओढली कीं, त्यासरशीं त्याचा कोथळाच बाहेर निघाला. खान आंतडीं सावरीत 'मारो मारो' ओरडला. तें ऐकून सय्यद बंडा हा त्याचा खासबरदार तलवार उगारून शिवबावर धावला. पण तिथें जिऊ महालाही सावध होताच. त्यानें पुढें होऊन एका फटक्यांत तलवारीसकट त्याचा हात उतरून दिला. राजावरचें अरिष्ट टळलें. 'होता जिवा म्हणून वांचला शिवा' या म्हणीच्या रूपानें महाराष्ट्र त्याचा कृतज्ञ आहे. शिवबानें आणखी एक-दोन घाव घालून खानाला सपशेल निजवलें आणि पट्ट्याचे हात फिरवीत मांडवाबाहेर पडून परत किल्ला गांठला. कांहीं क्षणांच्या अवधींत हें सगळें घडलें आणि जगदंबेच्या कृपेनें चढतें-वाढतें हिंदवी स्वराज्य एका महान् वातचक्रां-तून सुरक्षित निभावलें!

शिवराय गड चढतांच सांकेतिक पद्धतीनें कर्णा वाजला. पाठोपाठ तोफांचे बार झाले. जावळींतल्या झाडींत दबलेल्या शिवप्रभूच्या सर-

दारांना एल्गाराचा इषारा मिळाला. सगळी जावळी एकदम प्राणमय झाली. वारुळांतून मुंग्या निघाव्या तसे जाळीजाळींतून मर्द मावळे बाहेर पडले. गडाच्या आग्नेय सोंडेच्या जनीटेंबावरच्या दरींत जेधे-बांदलांचें पथक लपून बसलें होतें, त्यानें खानाच्या पंधराशें लोकांची ससेहोलपट केली. मोरोपंत पिंगळयांच्या तुकडीनें कोयनापारच्या सैन्याचा धुव्वा उडविला. सिलीमकर, हिरोजी हेही बगलांवर तुटून पडले. बारा हजार घोडदळ, दहा हजार पायदळ, एवढा सेनासमुद्र मराठ्यांनीं एका आचमनांत आटविला. स्वतः खान मेला. त्याचा मुलगा फाजल पळून गेला. रणदुल्लाखान चतुर्भुज होऊन लोटांगणीं आला. केवढी ती प्रचंड मोहीम ! पण शिवरायाच्या अभेद्य युद्धतंत्रानें आणि मराठ्यांच्या मर्दुमकीनें मिळून गिळून टाकली !


जवळजवळ असाच प्रकार स्वित्झर्लंडच्या स्वातंत्र्यप्रयत्नांतही घडलेला आहे. स्वातंत्र्याचे इतिहास हे बहुधा एकाच वळणानें वाहतात. शिवरायापूर्वीं तीनशें वर्षांच्या सुमारास स्वित्झर्लंडची दशा महाराष्ट्रा-सारखीच होती. ऑस्ट्रियानें त्यावर आपला तीक्ष्ण नखांचा पंजा टाकला होता. जुलूम, जबरदस्ती आणि अत्याचार हे जनतेचे नित्यभोग झाले होते. स्विस प्रजा पिळून, रगडून निघत होती. पण हें असें किती दिवस चालेल ! पिळून घेण्यालाही मर्यादा आहेतच. इथल्याप्रमाणेंच तिथेंही स्वातंत्र्याचें स्फुरण भरलें. इथल्याप्रमाणेंच तिथेंही मायभूमीला मुक्त करण्यासाठीं आणाशपथा झाल्या, कट शिजले आणि उघड संग्रामही घडकले. वुइल्यम् टेल हा तिथल्या स्वातंत्र्यवीरांचा ज्वल-ज्जहाल पुढारी. शाहिस्तेखानाचें बोटांवरच निभावलें; पण वुइल्यम् टेलनें जेसलर या जुलमी सरदाराला उरीं बाण खोंचून ठारच केलें. तानाजीनें सिंहगड सर केला, त्याचप्रमाणें तिथल्या कटवाल्यानीं रासबर्गच्या किल्ल्याला शिड्या लावून तो कबजांत आणला. तोरणा–पुरंदर ज्या पद्धतीनें मराठ्यांनीं जिंकले त्याच पद्धतीनें सार्नेन किल्ल्याचाही पाडाव केला. एवढेंच करून ते थांबले नाहींत; तर झाडून साऱ्या ऑस्ट्रियनांना त्यांनीं सीमेपार पिटाळलें.

पण एवढ्यानें संपलें नव्हतें. लिओपोल्ड राजा नुकताच गादीवर आला होता. स्विस् बंडखोरांचीं एकेक वीरकृत्यें ऐकून त्याच्या तळ-पायाची आग मस्तकाला चढली. स्विस् जनता होती-नव्हतीशी करावी म्हणून त्यानें विक्राळ उठावणी केली. तो स्वतः त्या मोहिमेचा सेनापति झाला. अफजुलखानाचें सैन्य दहा हजार तर त्याचें सोळा हजार. दोन वाटांनीं त्यानें तें स्वित्झर्लंडवर ओतलें. अफजुलखान आला त्या प्रसंगीं शिवबाच्या शत्रूंना आणि मित्रांनाही वाटल कीं, 'आतां शिवाजीची धडगत नाहीं!' स्वित्झर्लंडबद्दलही त्या वेळच्या जगाला अगदीं तसेंच वाटलें.

तथापि स्विस् जनतेचा धीर मात्र मुळींच खचला नाहीं. 'मेलों तरी बेहेत्तर; पण शत्रूला स्वातंत्र्याचा अपहार करूं देणार नाहीं' अशा वज्रनिर्धारानें ते आल्या प्रसंगासमोर उभे ठाकले. लिओपोल्डचें सैन्य मॉरगार्टन डोंगरांतून पुढें येणार हें त्यांना समजलें. ते त्या डोंगरांतल्या एका अवघड खिंडींत दबा धरून बसले. लिओपोल्डचें घोडदळ खिंडींत येतांच त्यावर वरून शिळा कोसळूं लागल्या. तो दळभार काचाभुल झाला! काय करावें, कसें पार व्हावें हें त्याला सुचेना. एवढ्यांत दुसऱ्या एका शस्त्रसज्ज टोळीनें लिओपोल्डवर अचानक धाड घातली. शत्रुसेनेचें सर्पसत्र सुरू झालें. खिंडींत प्रेतांचा खच पडला. तो घेमार त्यांना असह्य झाला. जिते उरले त्यांनीं पायांत बळ आणलें. या पळपुट्या वीरपुंगवांत खुद्द लिओपोल्डही सामील झाला. त्याचाही अफजुलखानच झाला असता; पण पळाला म्हणून सुटला! जावळीप्रमाणेंच मॉरगार्टनची ही लढाई इतिहासांत मशहूर आहे.

आम्ही जिथें उभे होतों तिथून अफजुलखानाची ती रंगीत पऱ्यांची हरितनील चौकोनी कबर आम्हांला दिसत होती. बाजूनें मोकळी सपाट जागा, माचीच्या तीन बाजू उतरत्या, सभोंवतीं वृक्षराजीचा घेर आणि वरून सूर्यकिरणांचा वर्षाव अशा वैभवानें तो भाग आमचे पाय तिकडे ओढीत होता. अबदुल्लाबुरुजाखालून उजव्या वाटेनें आम्ही तिथें पोंचलों. पादत्राणें बाहेर ठेवून आंत शिरलों. मध्य

चाकोनांत वस्त्राच्छादित दोन कबरी दिसल्या. पैकीं मोठ्या थडग्याखालीं अफजुल्खानाचें कबंध आणि धाकट्यांत सय्यद बंडा चिरनिद्रा घेत आहेत, असें समजलें.



अफजुलखानाची कबर

सभोंवतीं संगमरवरी फरसबंदी, वर हंड्याझुंबरें, लांकडाच्या कोरीव चौकटी, मोरपिसांचे कुंचे, लहान-मोठीं धुपाटणीं, कुराणशरीफांतील वचनांच्या तसबिरी, असा सगळा डोळे दिपवणारा थाटमाट दिसला. सगळीकडे स्वच्छता, झळाळी आणि व्यवस्था पाहून कौतुक वाटलें. मुसलमान समाजानें एक निधि निर्माण करून या कबरीला अलीशान स्वरूप आणलें आहे. एक मुजावर तिथें राहून तिथली सगळी व्यवस्था पहात असतो. प्रतापगडावर प्रेक्षणीय काय, म्हणून कोणीं विचारलें तर खानाची कबर असें उत्तर द्यावें लागेल. पण याच्याबद्दल आश्चर्य करण्याचें कारण नाहीं. आश्चर्य करायला हवें तें शिवरायाच्या उदारवृत्तीबद्दल. त्यानेंच प्रथम खानाच्या थडग्याचा आदर केला. त्याच्या वीरमरणाची कदर राखली! कॅ. मोडकांच्या 'प्रतापगडचें युद्ध' या पुस्तकांतला एकच उतारा देतों, त्यावरून तुम्हांला शिवप्रभूचें मोठेपण कळून येईल. अजूनही तो महाराष्ट्राच्या जनमनाचा राजा आहे तें उगीच नव्हे!

"खानाचें दफन करूनच महाराज थांबले नाहींत, तर त्यांनीं

त्याच्या थडग्याच्या खर्चासाठीं वार्षिक उत्पन्नही लावून दिलें. शत्रूविषयीं इतका मनाचा उदारपणा जगाच्या इतिहासांत दुसरा सांपडणें फारच मुष्किलीचें जाईल! रणांगणावर समोरासमोर ठाकण्यापुरता शत्रु. तो मेल्यावर शत्रुपणा संपला, हें धर्मयुद्धांतील अत्यंत उच्च दर्जाचें तत्त्व महाराजांनीं त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्या वेळीं दाखविलें. या ठिकाणीं प्रभु रामचंद्राची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. रावण मेल्यावर त्याची व्यवस्था कशी लावावयाची असें बिभीषणानें विचारलें असतां 'मरणान्तानि वैराणि,' असें तत्त्व सांगून भगवंतानें रावणाचा प्रेतसंस्कार मोठ्या समारंभानें करविला. नाहीं तर मेलेल्या शत्रूचें प्रेत त्याच्या थडग्यांतून उकरून काढणारे व लढाईंत मेलेल्या शत्रूच्या शिपायांचे नाक-कान कापून ते संगिनीस टोंचून मिरविणारे या सुधारलेल्या विसाव्या शतकांतही युरोपांत कांहीं थोडेथोडके लोक नाहींत!"

# ५. 'प्रचंड' तोरणा

आजमितीस भारतीय संघराज्यांत विलीन झालेलें पण पूर्वी श्रीमंत पंतसचिव यांच्या अधिकारांत असलेलें भोर संस्थान अनेक दृष्टींनीं वैशिष्ट्यपूर्ण आहे. वनसंपदा आणि जलसंपदा या दोघी बहिणी तिथें माहेरवासाला आल्या आहेत. नीरा नदीची ती 'गंगोत्री' आहे. नीरा ही धाकुटी असली तरी यथार्थपणें लोकमाता आहे. 'माय बघी पोट' अशी एक म्हण सांगतात. ह्या मायेनें लक्षावधि जनतेचें पोट पाहिलें आहे. केवढ्या तरी विस्तीर्ण शिवारांतून हिरवी-पिवळी लक्ष्मी डोलतली आहे. नीरा म्हणजे उंसाच्या मळ्यांची रसवंती आहे.

शिवनेरीच्या परिसराप्रमाणें या भागांतही प्राचीन काळीं बौद्धांनीं डोंगर पोखरले आहेत. सुधागड तालुक्यांतलीं नाडसूरचीं लेणीं महाभारताच्या पर्वाइतकीं आणि दुर्गम डोंगराच्या एका वांकणांत मांडलीं आहेत. खडसंबळयाच्या लेण्यांतले स्तूप निराळ्या धर्तीचे असून मृत भिख्खूंचे रक्षावशेष राखण्यासाठीं त्यांत खळगे ठेवलेले आहेत. कुंडलिका नदीच्या तटाकीं असलेलें गोमाशीलेणें डोंगरांतली एक स्वाभाविक पोकळी मोठी करून बनवलें आहे. त्याच्या मागच्या भिंतींत कोरलेली बुद्धमूर्ति भूमिस्पर्शमुद्रेंत आहे. रामटेकवरच्या वामन आणि बळि या जोडशिल्पाला लोक जसे अज्ञानानें बहीणभाऊ समजले तसेंच इकडचे लोक या बुद्धाला अंबरीष म्हणून पुजतात. शिरवळजवळच्या अर्ध-चंद्राकार मांडलेल्या लेण्यांत एक बुद्धस्तूप आहे त्याला महान् शिवलिंग समजून त्याची पूजा होते आणि तिथें यात्राही भरते. अन्य संस्कृति कित्येकदां ज्ञानानें तशीच अज्ञानानेंही आत्मसात् करतां येते त्यांतला हा दुसरा प्रकार. शिवरायानें घेतलेले सर्वांत आधींचे आणि सर्वांत उंच किल्ले याच संस्थानांत आहेत. भाटघरचें धरण हा तर संस्थानचा उघडा कुबेरखजिनाच!

तसेंच तें नसरापूरजवळचें बनेश्वर. पुणें–सातारा रस्त्यावर कात्रज-घाट चढून थोडें पुढें गेल्यावर उजव्या हाताला एक रस्ता फुटतो आणि तो आपणांस नसरापूरला घेऊन जातो. नसरापूर पुण्याच्या थेट दक्षिणेस सुमारें वीस मैलांवर आहे. तिथून रस्ता सरळ पश्चिमेला वळतो आणि वेल्हें गांवीं जातो. पुणें ते वेल्हें अंदाजें चाळीस मैलांचें अंतर भरेल.

बनेश्वर भेटतें तें याच मार्गांत शिवगंगा ओढ्याच्या कांठीं. वृक्षांची दाटी, गर्द छाया, जळाची खेळवणी या आकर्षणांमुळें पुण्यांतल्या विद्यार्थ्यांचें आणि रसिकांचें हें आवडतें सहलीचें ठिकाण आहे. पहिला बाजीराव हा मोठा रसिक पुरुष. त्याला वाटलें, अशा सुंदर वनश्रीला सनाथ करणारें एक शिवमंदिर इथें असायलाच हवें आणि शिवाय आपल्यासाठीं एक वाडा. देऊळ बांधायचें ठरतांच त्याला आणखी एक रम्य कल्पना सुचली कीं, अनायासें इथें पाण्याची विपुलता आहे, मग मंदिर बांधायचें तें जळमंदिरच कां न करावें! त्यानें मग देवळाच्या चौथऱ्याभोंवतीं पाणी सदैव खेळतें राहील आणि पांच शिवलिंगें कोरलेला सहा इंची व्यासाचा तो स्तंभही नेहमीं वाहत्या पाण्यांतच उरेल अशी सुरेख व्यवस्था करून टाकली.

नसरापुराहून पुढच्या मार्गाला लागलेल्या त्या एस्. टी. च्या गाडींत गडांच्या सहलीसाठीं निघालेले आम्ही दोघेच प्रवासी होतों. मी आणि माझे साहित्यिक मित्र श्री. गो. नी. दांडेकर. मी नवखा होतों; ते पूर्वानुभवी होते. आम्ही जणुं वर्तमानांतून भूताकडे उलटे चाललों होतों. तीन शतकें आम्हांला मागें जायचें होतें. शिवरायाचें रूप आठवायचें होतें. प्रताप आठवायचा होता. त्याचें विशाल ध्येय आठवायचें होतें आणि त्या स्मृतींच्या उजिवडांत तोरणा–राजगड सोनियाचे करून पहायचे होते. मार्गासनी गांवाजवळ आम्हांला राजगडानें प्रथम दर्शन दिलें. पण मीं त्याला म्हटलें, 'तूं आमचें उद्दिष्ट आहेसच; पण पहिलें नव्हे; दुसरें. आधीं आम्हांला तोरणा चढूं दे!'

सायंकाळीं पांच वाजतां आम्ही वेल्ह्याला उतरलों. वेल्हें हें प्रचंडगड

तालुक्याचें ठिकाण. तें गडाच्या निकट पायथ्याशीं आहे आणि पूर्वी-पासून गडाची पेठ म्हणूनच प्रसिद्ध आहे. उतरल्यावर वेळ न घालवतां आम्ही गडाच्या चढणीला लागलों. गड राहतो दक्षिणेला पण चढावें लागतें मात्र गावाच्या नैर्ऋत्य अंगानें. एवढा दीर्घ वळसा घ्यावा तेव्हां कुठें तो आपल्या अंगावर पाय ठेवूं देतो. प्रवाश्याला इतका द्राविडी प्राणायाम करावा लागला म्हणून त्या अंतर्बाह्य काळ्या फत्तराला त्याची काय दया!



दक्षिणेकडून दिसणारा तोरणा

पायांखालीं माती दचत होती ती तांबडी, वाटेच्या कडेला गवत उभें होतें तें गोंडाळें आणि आंब्याच्या शेजारीं फणस, त्यामुळें मला गोड भ्रम झाला तो हा कीं, मी माझ्या कोंकणांतच तर आलों नाहीं ना? वरून

खालीं उतरणारें गोधन पहावें तर तेंही लहान चणीचें आणि खपाट-लेल्या पोटाचें. डोंगरी गुरें हीं अशींच. चढ-उताराच्या श्रमांतच त्यांच्या अंगांतलें बरेंचसें सत्त्व शोषलें जातें आणि धार काढायला जातांना हातीं तीर्थोटली पुरेशी होते.

आम्ही एक टेकडी चढलों आणि तिनें आम्हांला दुसरीच्या पायांशीं उभें केलें. दुसरीनें तिसरीच्या हवालीं केलें. प्रत्येक टेकडी आम्हांला भूमीपासून उंच आणि गडाच्या जवळ नेत होती. आम्हांला धाप लागली आहे का घाम निथळला आहे तें पाहण्याची त्या उपत्यकांना काय गरज! उन्नतीचा मार्ग हा नेहमींच कष्टाचा असतो, खडतर असतो, हें त्या मौनानेंच आम्हांला पटवीत होत्या आणि आम्हीही निमूटपणें तें पटवून घेत होतों. रात्र पडण्यापूर्वी किल्ल्याचा माथा गांठायचा या इराद्यानें मागें न पहातां सारखे चालत राहिलों होतों. पण जिथें आम्ही गडाला भिडलों तिथें मात्र उभें राहून मागें वळण्याचा मोह अनावर झाला.

मावळतीला सूर्यमंडळ फक्त हातभर उंच होतें आणि कृतांतासमोर उभें राहिल्यागत थरथरत होतें. त्याच्या आंतल्या लाटा स्पष्ट दिसत होत्या. खालीं योजनांच्या लांबीचें एक खोरें आडवें पसरलें होतें, त्यांतून कानदी नदी सरपटत होती. तिच्यावर आणि त्या सगळ्या खोऱ्यावर धुक्याची बहीण 'खार' पसरून राहिली होती. पश्चिमेकडचे सांध्यकिरण आपल्या पात्रांत पडायचे ते गाळून पडावे म्हणून जणुं कानदीनेंच तें विरल, धूसर वस्त्र वर उभवून धरलें होतें. समोरचा तो आडवा डोंगर समान उंचीच्या दंतुर शिखरांनीं एखाद्या अजस्र करवता-सारखा भासत होता. डोंगरांच्या बाजूनें तम दाटत चाललें होतें आणि खोऱ्यांतला प्रकाश क्षणाक्षणाला निर्जीव होत होता. सौंदर्यावर गांभीर्याचें आवरण चढत होतें. त्या विस्तीर्ण प्रदेशावर पूर्वेकडून पश्चिमेपर्यंत दृष्टि खेळवून आणतों तों सविता आमच्यापुढून अदृश्य झाला. सहजपणें माझ्या तोंडून शब्द निघाले—

**'एतत्त्रयीमयं ज्योतिरादित्याख्यं निमज्जति'**

'पहा, पहा, तिन्ही वेदांना उपास्य असलेला हा सूर्यनारायण

अनंताच्या उदरांत बुडतो आहे.' आतां आकाश काळवंडेल. खालचें विशाल खोरें घुंगट घेईल. राक्षसवेळा तर प्रगटलीच. आतां हिंस्र श्वापदांनाही उजाडेल. आमच्या समोरचा प्रचंडगड आधींच कभिन्न काळा! त्यावर आणखी काजळाचीं पुटें चढलीं कीं बघायलाच नको. सगळीकडे असा अंधार कालवला कीं आम्हांला आधार कोणाचा—

धड खालीं ना वर अशा त्रिशंकूच्या अवस्थेंत समोर 'आ' पसरून राहिलेल्या खोल घळीच्या किनारीवर, जीवन–मरणाच्या त्या प्रादेशमात्र सीमेवर आम्हीं उभे होतों. आम्ही म्हणजे फक्त दोघे. जणुं मानव-जातीच्या सुपांतून वेंचून टाकलेले दोन खडे. बाकी सभोंवतीं सारे दगडधोंडे आणि झाडेंझुडपें. सारी मुकी सृष्टि. आम्हीही वाणी असून मुकेच. बोलून तरी काय करायचें! आपल्या मनांतलें भयच दुसऱ्याच्या काळजांत घालायचें ना! त्यापेक्षां हातांतली काठी वाजवीत एकेक पाऊल पुढें टाकीत राहणें हें बरें!

पण आमचा मित्र पूर्वेच्या बाजूनें आम्हांला नकळत वर आला होता. आमचाच कशाला; अंधरांत घुसपटणाऱ्या अर्ध्या भूगोलाचा मित्र. सोळा नसल्या तरी चौदा कळा त्याच्या अंगीं होत्या. सूर्य गेला, संधिप्रकाशही ओसरला; त्यामुळें आतां त्याच्या अणुरेणूंत कांति भरूं लागली होती. काळी चंद्रकळा नेसायला निघालेल्या रात्रीला तो सांगत होता, 'फेकून दे तें वस्त्र. आज मीं तुझ्यासाठीं सोनसळी साडी आणली आहे. मी तुझा रजनीनाथ वैभवाच्या चढत्या काळांत असतांना तुला हें शोकाचें वस्त्र वेटाळूं देणार नाहीं.'

आणि आम्हांलाही तो आश्वासनपूर्वक सांगत होता.

"पळत्या संधिप्रकाशांत जेवढं चढतां येईल तेवढं चढा. पुढें एक कडा ढासळलेला आहे. जुनी शतकांची वाट मोडली आहे. पण माणसाचा हव्यास दांडगा! कांहींही झालें तरी त्याला गड हातचा जाऊं द्यायचा नव्हता. त्यानें त्या कोसळून अगम्य झालेल्या कड्यांतच खोदून खणून नवी वाट बनविली आहे. अगदींच दुर्गम तिथें कठडे घातले आहेत. त्यांना धरून पण खालीं न बघतां एकेक पावठणी आक्रमीत

चला. तिथपर्यंत तुम्ही पोंचतां तोंवर माझं चांदणं तुमची ती वाट दुधानें धुईल... "

मीं म्हटलें, 'जशी महाराजांची आज्ञा!' एवढ्यांत आणखी एक आश्चर्य घडलें. कोणाची तरी चाहूल लागली. मागें वळून पहातों तों एक तरणा गडी आमच्या मागून गड चढून येत आहे. दिवसां खालच्या शेतावर काम आणि रात्रीं गडावर विश्राम अशा द्विधा वृत्तीनें जगणारा तो शेतकरी तरुण होता. आम्ही दोघांचे तिघे झालों. आम्हांला तो अपूर्व अन् त्याला आम्ही अपूरू. सात पावलांतच त्याची–आमची मैत्री जमली. गप्पा सुरू झाल्या अन् रंगल्याही. एवढा वेळ आमच्या काळजांत घर करून राहिलेलें भयच आतां आम्हांला भ्यालें. त्याला पुढें घालून तो कठड्याचा कडा आम्ही लीलेनें चढून गेलों आणि तो होता म्हणूनच दरवाजांतून आंत जाऊं शकलों.

रीतीप्रमाणें तो दरवाजा सूर्यास्ताला बंद झाला होता आणि आम्हांला त्या गोष्टीची कल्पना नव्हती. पण चोराच्या वाटा चोरालाच ठाऊक! पुरुषोत्तमानें खालच्या फटींतून हात आंत घातला आणि एका धक्क्यांत तो सताड उघडला. त्यानें काय जादू केली तें पहावें म्हणून मी लगेच पुढें झालों. त्या दरवाजाला अडसर नव्हता. फक्त एक वाटोळी दगडगोटी टेकून ठेवून तो बंद केलेला होता. पुरुषोत्तमानें ती मागें ढकलली होती आणि थोड्या अंतरावर घरंगळून पडली होती. ही युक्ति नवख्या माणसाला कशी कळणार? तो नसता तर आम्हीं केलेली हाकाटी आंत कोणालाही ऐकूं गेली नसती आणि त्याच्या दगडी उंबऱ्यावर डोकें टेकून आम्हांला ती उभी रात्र पाण्याविना तडफडत आणि भीतीमुळें जागत काढावी लागली असती.

मीं म्हटलें, प्रवासांत अशीं आडमेळीं यायलाच हवींत; त्याशिवाय त्याला रुचि नाहीं. पण 'आतां काय करावं' अशी विमूढ अवस्था येण्याच्या क्षणीं तीं दूर व्हायला पाहिजेत. चन्द्रावर ढग तर वाढून यावेत; पण तो कायमचा मात्र आच्छादला जाऊं नये, यांत खरी गंमत आहे.

संसारांत भांडणें तशा प्रवासांत अडचणी. दोन्ही सुखपर्यवसायी असावीं, म्हणजे वृत्ति कशी तरतरीत रहाते.

बिनीदरवाजांतून पुढें होऊन आम्हीं कोठीदरवाजाही ओलांडला आणि तो नाममात्र बालेकिल्ला चढूं लागलों. वरच्या उंचीवर चन्द्रिकेच्या प्रकाशांत आम्हांला दोन वास्तु समोर दिसल्या. पैकीं एक होतें मेंगाईचें मंदिर आणि दुसरें होतें हवालदाराचें घर.

तो गृहस्थ आम्हीं जन्मांत कधीं पाहिला नव्हता; पण तरीही आम्ही त्याला हांका मारीत निघालों.

"हवालदार! अहो हवालदाऽऽऽर!"

"कोण आहेऽऽ?" आंतून उंच आणि दीर्घ प्रत्युत्तर आलें.

"आम्ही, पुण्याचे पाहुणे!"

"या!"

घर आणि गोठा हीं दोन्ही त्यानें एकच केलीं होतीं. खालच्या पडवींत गुरें अन् एक बकरा यांच्यासाठीं जागा केली होती आणि वरच्या ओट्यावर पुढच्या अर्ध्या भागांत बैठक अन् मागच्या भागांत पाकगृह थाटलें होतें. तो विस्तव पेटवून चुलीचीच आराधना करीत बसला होता. आम्हांला पाहून प्रथम सखाराम गुरवानें दिवा लावला आणि मग त्या दीपत्कारांत आम्हीं एकमेकांचे चेहरे पाहिले. हवालदार या रुबाबदार उपाधीवरून केलेली माझी कल्पना सपशेल चुकली. कमरेला कासटी, अंगांत कुडतें आणि वाढलेल्या दाढीमिश्या अशा स्वरूपांत हवालदार ही अधिकारी व्यक्ति आमच्यापुढें प्रगटली होती.

त्यानें आम्हांला गार पाणी दिलें आणि दह्यादुधाबद्दल ओशाळ-गतीचा नकारही दिला. भाकड गुरांचा धनी होता तो! त्यालाच नव्हतें तर आम्हांला कुठून! राजा पाहुणा झाला म्हणून कांहीं बैल दुभत नाहीं. आम्हीं मग आमची दुधाची तहान पाण्यावरच भागवली. तो अतिथिधर्माला जागला याचेच आम्हांला आभार वाटले.

त्या 'प्रचंड' गडावर मनुष्यवस्ती खरोखरच इन् मीन् तीन होती.

एक हवालदार, दुसरा तोरणेश्वराचा पुजारी गुरव आणि तिसरा आमचा सांगाती झालेला पुरुषोत्तम. त्या तिघांत आम्ही दोघे मिसळलों. त्यांच्याशीं गप्पागोष्टी करीत फराळ उरकला आणि खालीं मेंगाईच्या देवळांत येऊन देवीच्या आसऱ्याला पथाऱ्या पसरल्या.

त्या रात्रीं टिपूर चांदणें, सुखस्पर्श थंडी अन् मोकळी हवा या गोष्टी एकाहून एक उल्हासप्रद होत्या. त्यामुळें दिवसभराचे थकलेले होतों तरी लगेच ‘डोळा झांकावा’ असें वाटेना. इतकें विपुल आणि खालपर्यंत ओथंबलेलें तारकाखचित आकाश मी किती तरी काळानें पहात होतों. अष्ट दिशांचीं क्षितिजें आणि तिथले तारकापुंज मला कसल्याही व्यवधानावांचून न्याहाळतां येत होते. तो दिव्य मृग, तो त्याच्या पोटांत बाण घुसवून मागें लागलेला व्याध, तो दक्षिणापथाचा मूळ संशोधक अगस्त्य, उत्तरेच्या ध्रुवमत्स्याचें तें अभिषेकाचें शिंग, असें किती तरी......

मीं दांडेकरांना म्हटलें, “आपण या चांदण्यांतच जवळचें थोडें-बहुत पाहून घेऊं.” पण पहायचें म्हटलें तरी प्रेक्षणीय असें तिथें कांहीं नव्हतेंच. देवळासमोरचें दिवाणघर पडलेलें, त्याच्या पलीकडचा तोरणेश्वर एका लहानशा घुमटींत संकोचून बसलेला अन् मागें-पुढें सगळी ओसाडी. नाहीं म्हणायला देवळाकडचा तो नांदरुखीचा वृक्ष तेवढा दर्शनीय आहे. आजूबाजूच्या गडांवरून आणि खालच्या भूमिभागावरूनही तो दिसतो हें त्याचें वैशिष्ट्य. आम्हीं त्याच्या मुळावर आणि विस्तारावर नजर टाकली. त्याच्या हिरव्या पानांवर चांदण्याची सुंदर झिलई चढली होती ती आणि मुळांतला अंधार या परस्परविरुद्ध गोष्टीही एकाच दृष्टिक्षेपांत पाहिल्या. गडावरच्या सर्वांत उंच जागीं त्याचें ‘एकलें बीज’ पडलें आणि तें वाढलें. शतकांची आयुर्मर्यादा लाभलेला तो एकाकी वृक्ष आहे. त्याचे भाईबंद जुन्या जमान्यांत कोणी असतील तर ते आज त्याला सोडून गेले आहेत. त्याच्या अंगचा रस आतां आटत चालला आहे. पण जीवन अजून चिवट आहे. जुनी पालवी गळली तरी अजूनही वसंत त्याला नवा पर्णसाज चढवतो.

एका इंग्रजी कवितेंत अशाच एका युगादीच्या खडकाला उद्देशून म्हटलें आहे—

> “ Rock of ages, cleft for me,
> Let me hide myself in thee ”

त्या कवीला त्या खडकांत लपायचें होतें तर मला त्या वृद्ध तरूकडून जुना इतिहास उघड करून घ्यायला हवा होता. मीं त्याला म्हटलें, ‘ इतिवृत्तं निवेदय ’. तूं उदार वक्ता आणि मी सावधान श्रोता. त्यानें जरा अंग शहारल्यासारखें दाखवलें आणि पर्णांच्या झुळझुळ ध्वनीनें तो मला सांगूं लागला.

“ तुला ठाऊक असेल कीं, १६४६ त शिवप्रभूनें याच संस्थानांतल्या रोहिडखोऱ्यांतला रोहिडा किल्ला प्रथम घेतला आणि त्यानंतर थोड्याच दिवसांत हा प्रचंडगडही आत्मसात् केला. शिवराज युक्तिप्रयुक्तीनें बऱ्याच गोष्टी साधी आणि जरूर तिथेंच शस्त्रबळाचा अवलंब करी. याचा कबजा करतांना त्याला खड्ग उपसावें लागलें नाहीं अथवा कोणाचें रक्तही सांडावें लागलें नाहीं. एके दिवशीं तिन्हीसांजा तो घोड्यावर स्वार होऊन आपल्या चार अनुयायांसह गडाच्या पायथ्याशीं आला. ती सूचना मिळतांच वरून किल्लेदार खालीं उतरला. त्यांचीं त्या रात्रीं काय हितगुजें झालीं आणि कोणतीं स्फुरणें किल्लेदाराच्या हृदयांत शिरलीं नकळे; पण सकाळीं तो वर चढला आणि त्यानें विजापूरकरांचें निशाण बेदरकारपणें खालीं उतरवून त्या जागीं शिवाजीचा झेंडा फडकवला.

नंतर शिवाजी इतमामानें वर आला. किल्ल्याचा धनी म्हणून आला. या गडाचा तट ठायीं ठायीं ढासळला होता तो दुरुस्त करायला त्यानें लगेच सुरुवात केली. खणतां खणतां एका जागीं भूमिगत ठेवा सांपडला. मोजून संपणार नाहीं इतका गडगंज. एखाद्या कुळाचा उत्कर्षकाल आला कीं आदित्याच्या कहाणींत वर्णिल्याप्रमाणें लक्ष्मी चारी वाटांनीं तिथें धांवत येते. घर भरून दार ओतूं लागतें. मालोजी हा शिवबाचा आजा. त्याला वेरूळच्या

वारुळांत भाडार उघडलें. नंतर पुणें, सुपें हे मोकासे मिळाले आणि वर ‘राजे’ हा किताबही प्राप्त झाला. भोसल्यांच्या भावी राजसत्तेचीं हीं ‘प्रसादाचिन्हानि पुरःफलानि’ होतीं. शिवबा शक्ति-युक्तींचा धुरंधर तसाच दैवाचा शिकंदर. इथल्याप्रमाणेंच कल्याणचा कोट बांधतांनाही त्याला अपार निधान सांपडलें. प्रधानगड जिंकून घेतल्यावरही तोच प्रकार! वर चढतांना वाटेंत बोरीची कांटी पालखीस लागली, तेव्हां महाराज बोलले, ‘काय निमित्त कांटी अटकावते? खालीं खणावें.’ खणल्यावर बावीस घागरी व चार कढया मोहरा, होन, सोन्याच्या कांबींनीं भरलेल्या सांपडल्या.’

आणि मग काय! लोकांची भावना एकदम पालटली. शिवराज एकदम अवतारी पुरुष ठरला. संशयी होते तेही अनुकूल झाले. अनुयायांचीं मस्तकें भक्तिभावानें नमलीं. व्यवहारांतले ‘मोरावळे’ त्याला उच्छृंखल म्हणत, ती भाषा एकदम बंद पडली. सह्याद्रींत आणि घाटमाथ्यावर असणाऱ्या जाती–जमातींनीं त्याच्या नेतृत्वाला निःसंदेह मान्यता दिली. त्याच्याशीं अंगेंप्राणें सहकार्य केलें. स्वराज्याची–मराठ्यांच्या राज्याची–प्रेरणा सह्याद्रीच्या दऱ्यादरकुट्यांत नादमय, घोषमय झाली. श्री. स. आ. जोगळेकर सांगतात, “सह्याद्रींतील किल्ले हीं या सहकार्याचीं, महाराष्ट्राच्या विजिगीषु संभूयसमुत्थानाचीं प्रतीकें आहेत. शिवाजीनें महाराष्ट्राची उंची वाढविली याचीं हीं प्रतीकें आहेत आणि हेंच त्यांचें माहात्म्य!”

आम्ही थोडा वेळ निर्बंध भटकलों. चंद्रामृताचे चषकही मनमुराद प्यालों. आणि त्या शांत निःस्तब्ध रात्रीचें संगीत ऐकून मग देवळांत परतलों. आतां आमच्या मनांत विकल्प नव्हता, शंका नव्हती आणि भयही नव्हतें. त्यामुळें ताबडतोब झोंप लागली. रात्रीं कधीं तरी एकदां जाग आली आणि थंडी माझ्या पांघरुणांत घुसली. हातापायांची जुडी करून तिला निवारावें लागलें.

मेंगाईपुढच्या समईतली वात उंदरानें पळविली होती. देवळांत अंधार कोंदाटला होता. चांदणें फटींतून आंत डोकावण्याचा प्रयत्न

करीत होतें. सोसाट्याचा वारा, उनाड पोरागत देवळावरचे पत्रे थाडथाड वाजवीत राहिला होता. पुन्हा डोळे मिटण्यापूर्वीं सहजगत्या स्मरण झालें. लहानपणीं मी रात्रीं भातशेताचा माळा राखायला जात असें आणि रानडुकरांची 'भोंवसळ' शेतांत शिरूं नये म्हणून असाच डबा वाजवीत असें. मग शेजारचे माळेकरीही त्याच पद्धतीनें मला प्रतिसाद देत असत. तो अपरात्रीचा आनंद आणि हाही तसलाच आनंद! मात्र तो नेणिवेंतला म्हणून गहिरा असे अन् हा जाणिवेंतला म्हणून फिकट......

यथाक्रम पूर्वेला उषा प्रगटली. वरच्या दिव्य पणत्यांतलें तेल सरलें. धुक्यांत गुरफटलेल्या गिरिशिखरांवर दिनप्रभा पसरूं लागली. गडाच्या वातावरणांत चैतन्य मुसावलें. उन्हें प्रखर होण्याच्या आंत आम्हांला सगळा किल्ला पादाक्रांत करायचा होता. त्यासाठीं मार्गदर्शक म्हणून आम्हीं हवालदाराला पाचारलें. त्यानें प्रथम गुरें सोडून दिलीं आणि मग तो अतिथिपरायण झाला. रात्रीचा आणि दिवसाचा हवालदार यांत पोषाखी अंतर बरेंच होतें. त्यानें आतां धोतर नेसून अंगांत डगला चढविला होता आणि डोईच्या पटक्याचा समलाही सोडला होता. एकेक ठिकाण दाखवीत तो आमच्या पुढें चालूं लागला. बिचाऱ्याला सांगायचें पुष्कळ होतें; पण त्यासाठीं आवश्यक ते शब्द मात्र ठाऊक नव्हते. शब्दाचा अंत्य स्वर लांब ओढीत बोलण्याची त्याला संवय जडली होती ती त्यामुळेंच.

तो हवालदार त्या गडावरचा जणुं क्षेत्रसंन्यासी आहे. पूर्वेचा सूर्य पश्चिमेला उगवला, खालच्या पृथ्वीवर काय वाटेल ती उलथापालथ झाली तरी त्याला गड उतरतां येत नाहीं. तो गडाचा बांधील आहे. त्याच्या वांट्याला प्रेमाचे, नात्यागोत्याचे बंध तुटले नसले तरी सुटलेले आहेत. बऱ्यावाईट प्रसंगीं तालुक्याच्या अधिकाऱ्याला अर्ज करून बदली माणूस मागवून, तो आला तरच त्याला खालीं उतरणें शक्य आहे. इतिहासकाळांत घेऱ्यापासून बालेकिल्ल्यापर्यंत याची सर्वगामी सत्ता चालत असे. किल्ला लढविणें आणि सुरक्षित ठेवणें या दृष्टीनें

आवश्यक तें तें सर्व करण्याची त्याला मुखत्यारी असे. जरूर लागली तर त्यानें नवें मेट बसवावें अथवा जुनें असेल तें उठवावें. आज



बिनीदरवाजा

आतां तें कांहीं उरलें नाहीं, त्यामुळें ठाणबंद कैद्याची आणि त्याची भूमिका सारखीच झाली आहे.

बिनीदरवाजापासून आम्हीं गडप्रदक्षिणा सुरू केली. एका भयासुर काळ्या खोल कड्याच्या डोक्यावरच तो दरवाजा उभारलेला आहे. कोठीदरवाजाच्या आंतल्या अंगाला तोरण नि खोकड नांवाचीं दोन टाक्रीं दिसतात. तिथेंच डाव्या अंगाच्या तटाला लागून तोरण-जाईची लहानशी घुमटी आहे. एखाद्या मुलीनें लपंडाव खेळतांना भिंतीच्या आधारानें अंग चोरून लपावें तशी ती तोरणाजाई आहे. अंगुलिनिर्देश केल्याशिवाय ती कोणाच्या नजरेस पडायची नाहीं. ज्या जागीं खजिना सांपडला तिथेंच तिची स्थापना झालेली आहे.

तिथून हनुमानबुरुजापर्यंत उभी केलेली तटबंदी गडाच्या आकारा-प्रमाणें उंच-सखल होते आणि चीनची वेडीवांकडी अजस्त्र भिंतच आपल्यापुढें उभी असल्याचा भास होतो. तटाच्या आंतल्या अंगाला चिकटून हातभर रुंदीचा कट्टा केलेला आहे. जरूर तिथें त्याला पायऱ्या ठेवलेल्या आहेत. त्यावरून खालचा प्रदेश न्याहाळीत पुढें जातां येतें. दिवाणघराकडून पूर्वेला झुंजारमाचीच्या बुरुजाकडे निघालें कीं कांहीं उभे दगड आणि शिला तोरणेश्वरापुढें दिसतात. गडावर सती गेलेल्या अज्ञात साध्वींचें तें स्मारक पहातांना ‘ तेथें कर माझे जुळती. ’ उभे पुरलेले दगड ही धारातीर्थीं पडलेल्या वीराची खूण! पुरलेला चौकोनी दगड आणि त्याच्या डोक्यावर वाटोळें टेंबूक दिसलें कीं तो वीर समजावा. ती निरवयव मानवी आकृतीच असते.

तिथेंच ब्रह्मपिशाचाचाही एक दगड आहे. दिवेकर आडनावाच्या कोण्या ब्राह्मणाचें तें पिशाच तिथें ठिय्या देऊन बसल्याचें सांगतात. कदाचित् त्यानें तिथें गतिही घेतली असेल. तो ब्राह्मण पिशाच्चयोनींत कां गेला, त्याची कोणती बलवत्तर वासना अपुरी राहिली, तें कोण सांगणार! सांगतां येतें तें एवढेंच कीं, तो कोणाच्या मानगुटीस बसत नाहीं किंवा कोणाला भेडसावीतही नाहीं. प्रवाश्यांना एवढी खात्री मिळाली तरी पुष्कळ झालें. मला या ब्रह्मसमंधाचें कांहींच कुतूहल


वाटलें नाहीं. कारण आमच्या कोंकणांत गांवोगांवींच नव्हेत; तर घरोघरीं ब्रह्मसमंध असतात. घाड्यानें 'आसे' फिरवले कीं तो हटकून सांगतो, 'समंधाची बाधा आहे.' ब्रह्मसमंधाला कोंबडीं-बकरीं चालत नाहींत. एक नारळ फोडला कीं स्वारी खुष!

हा गड उंचीला नि विस्तारालाही प्रचंड आहे म्हणूनच याचें पूर्वीचें नांव 'प्रचंडगड' होतें. पुढें शिवरायानें तिथें स्वराज्याचें तोरण उभारलें म्हणून लोक त्याला तोरणागड म्हणूं लागले. समुद्र-सपाटीपासूनच याची उंची ४६०६ फूट आहे. प्रतापगड, शिवनेरी आणि राजधानीचा रायगडसुद्धां याचीं मुलें शोभतील. झुंजारमाचीच्या बुरुजावर नुसतें उभें राहिलें तरी तिथून दूरवर पसरलेलीं उतरतीं गिरि-शिखरें पहातांना छातीवर कसलें तरी दडपण येतें. तोरण्याचा डोंगर आणि समोरचा पर्वत यांच्यामधल्या लहान-मोठ्या टेकड्यांवर आणि त्या लांबच लांब दरीवर जेव्हां वर्षाकाळचे मेघ मांडव घालतील तेव्हां तें दृश्य किती भव्य, गंभीर दिसूं शकेल तें मी कल्पनाचक्षूंपुढें उभें करून न्याहाळूं लागलों.

झुंजारमाचीचे ते एकाखालीं एक-दोन टप्पे शकटव्यूहासारखे दिसतात. कड्यांच्या धारेवरून त्यांवर उतरणें हें 'येरा गबाळाचें काम नोहे.' काळसर तांबूस अशा दगडांनीं ती डोंगरांची चिंचोळी सोंड दोन्ही बाजूंनीं उत्तट केलेली आहे आणि तिथल्या बुरुजांना खालच्या अंगानें तशाच वाटोळया तटबंदीचें चिलखत चढवलें आहे. गडाच्या दोन्ही अंगांवर इथून नजर ठेवतां येते आणि माराही करतां येतो, म्हणून तिला झुंजारमाची म्हणतात. तिथें ना झाड ना झुडूप. पाय घसरला तर काडीचासुद्धां आधार मिळायचा नाहीं. सगळें 'अश्मा च मे मृत्तिका च मे.'

गडाच्या पश्चिमेला सगळें कोंकण मांडलें आहे. म्हणूनच तिकडच्या दरवाजाला कोंकणदरवाजा म्हणतात. तो उतरूनच पुढें बुधलामाचींत जायचें. गडाची ही दुसरी माची चांगली दोन मैल घेराची आहे. मागें-पुढें निमुळती आणि मध्यें फुगलेली. जणुं ऋग्वेदांतील 'यवमध्या'

ऋचाच. या माचीवर पूर्वी महारवाडा होता. आंत शिरलें कीं प्रथम हत्तीमाळ आणि त्यापुढें तीन टांकीं दिसतात. तटाच्या एका बुरुजाच्या उदरांत खोलवर असलेला जलाशय तो शिवगंगा. त्यापुढें द्वार लागतें तो भगतदरवाजा. इथेंही एक सदर आहेच. बुधल्याचा तो दोनतीन पुरुष उंचीचा खडक मध्यभागीं ठाण मांडून आहे. वस्तुतः तो एक खडक नसून ती जोडी आहे. उत्प्रेक्षा करायची असली तर तुम्ही



बुधलामाची

त्यांना भीमार्जुन म्हणा अथवा जयविजय म्हणा. कोंकण बाजूचे ते नित्य उभे रखवालदार म्हटलेंत तरी चालेल. बुधला ओलांडून पुढें गेलें कीं माचीला दोन सोंडा फुटतात. दाक्षिणची सोंड सरळ जाऊन राजगडाला भिडली आहे. ती दोन भावांच्या मध्यें 'लालडी' बहीण शोभते. जोंवर ती मध्यें आहे तोंवर या दोन भावांचें ऐक्य अखंड राहील. आम्ही तिच्या माथ्यावरूनच पुढें राजगड गांठण्याचा विचार करूं लागलों. पण हवालदारानें आम्हांला वेड्यांत काढलें. तो म्हणाला, 'तुम्हांला वाटतं तितकं तें सोपं नाहीं.' माचीची पश्चिम

सोंड 'कोंकणावर नजर टाकून येतें' म्हणून पार लांब गेली आहे. 'चित्ता आणि वळंजाई असे आणखी दोन दरवाजे या माचीला आहेत. या बाजूच्या बांधणीचें सगळें काम शिवबाच्या हातचें आहे.

रोहिडा, राजगड, प्रचंडगड हे किल्ले मुसलमानांच्या तावडींतून प्रथम शिवबानें सोडविले खरे ; पण त्याच्या पश्चात् राजारामाच्या कारकीर्दींत रा. शंकराजी नारायण सचिव याला तेंच काम पुन्हां एकदां करावें लागलें. शंकराजी नारायण हा मोठा चिवट आणि दांतीं धरलेलें न सोडणारा 'धुरेचा बैसणा' पुरुष होऊन गेला. याचें मूळ घराणें पैठणकडचें. प्रथम याला आश्रय मिळाला तो मोरोपंत पिंगळे यांच्याकडे. पुढें संभाजीच्या अमदानींत त्याचे अनेक गुण प्रकट झाले आणि त्याला प्रथम 'राजाज्ञापद' आणि नंतर अष्टप्रधानांतलें 'सचिवपद' प्राप्त झालें.

शिवरायाच्या अवसानानंतर औरंगजेब अगणित दळभारासह महाराष्ट्रावर लोटला. त्याच्या धडकेसरशीं अदिलशाही–कुतुबशाही कोलमडल्या. स्वराज्यांतले किल्ले-कोट एकामागून एक पडूं लागले. संभाजीचा अमानुष वध झाला. राजारामाला जिंजीकडे पळावें लागलें. मराठे पुन्हा न उठण्यासाठीं जमीनदोस्त झाले असें औरंगजेबाला वाटलें. पण संभाजीच्या वधामुळें पेटलेलें ब्रह्म-क्षत्र त्या वेळीं असें कांहीं उठावलें कीं विचारूं नका ! स्वराज्याचे दोन भाग करून त्या काळच्या अतिरथी-महारथींनीं औरंगजेबाला चांगलीच टक्कर दिली. दक्षिण भाग रामचंद्रपंत अमात्य आणि संताजी घोरपडे यांनीं संभाळला आणि उत्तर भाग शंकराजी नारायण आणि धनाजी जाधव यांनीं पत्करला. राजारामानें या भागाची संपूर्ण मुखत्यारी सचिवाला देऊन टाकली. सचिवानें गेलेले सर्व किल्ले मोंगलांच्या घशांतून ओढून काढले. हा भाग बव्हंशीं त्यानें जिंकला आणि तो अखेरपर्यंत त्याच्याच घराण्यांत राहिला.

या बळिवंत पुरुषाच्या मृत्यूचा प्रसंगही ऐकण्यासारखा आहे. शाहूमहाराजांनीं याला एकदां भेटीस म्हणून बोलावलें ; पण कबूल करूनही त्याला जाणें जमलें नाहीं. तो आला नाहीं हें पाहून स्वतः शाहूमहाराजच

त्याच्या भेटीसाठीं निघाले. सचिवाला ही वार्ता कळून जिव्हारीं लागणारें दुःख झालें. वळचणीचें पाणी आढ्याला चढणें असा हा प्रकार आपल्याला लांच्छनास्पद असें मानून या नेकजात स्वामिसेवकानें तत्काळ हिरकणी खाल्ली. पंचप्राणांनीं प्रस्थान ठेवलें, तेव्हां त्याच्या तोंडून निघालेले उद्गार त्याला श्रियाळ–हरिश्चंद्रांच्या मालिकेंत बसवितील.

" वचनाला बाध आणून जगण्यापेक्षा मरणच श्रेयस्कर ! "

आम्हीं सर्व किल्ला सावकाशपणें फिरून पाहिला आणि परत मेंगाईच्या देवळांत आलों. पिशव्या भरून पुढच्या प्रवासाची सिद्धता केली. दिवसाच्या प्रकाशांत मेंगाईची ती हातभर उंचीची मूर्ति पाहून घेतली. अजून तिचा आसरा उभा आहे. पण उद्यांचें कोण सांगणार ! समोरच्या दिवाणघराची काय अवस्था झाली आहे तें पाहूनच माझ्या मनांत हा विकल्प उठला होता.

संस्थान होतें तोंवर मेंगाईचा केवढा चालता काळ होता ! नवरात्रांत तिचा मोठा उत्सव व्हायचा. सप्तशतीचे पाठ चालायचे. ' कात्यायनि महामाये–इत्यादि मंत्र जागायचे. कीर्तनें आणि गोंधळ यांचा गदारोळ उठायचा. दहा दिवस रोज पंक्तिभोजनें झडायचीं. दसऱ्याला सरदारांची पंगत बसायची. ढालकाठी उभारली जायची आणि हवालदारानें रोख्याचा समारंभही करायचा. जुन्या काळापासून चालत आलेली ही पद्धत आहे. दसऱ्याच्या दिवशीं, पैशाची मागणी करणारे रोखे लिहून त्यावर मूळ हवालदाराचा ' रामजी शिवडे हवालदार ' असा शिक्का उठवून ते गडाखालच्या गांवोंगांवीं रवाना व्हायचे. कधीं काळीं त्या रोख्यांना चकाकतें उत्तर येत असेल; पण अलीकडे ' बोलाचीच कढी बोलाचाचि भात ' असा लुटुपुटीचाच तो कारभार होत होता.

तोरण्यावरून आम्ही राजगडाचे प्रवासी झालों होतों. थोरल्या भावाला भेटून आतां धाकट्याची भेट घ्यायला निघालों होतों. तोरण्याच्या डोंगरानें आम्हांला शुद्ध, चैतन्यमय हवा पुरवली होती. आमच्या

भोंवतीं आनंदाचें, उल्हासाचें आवार उघडलें होतें. त्यामुळें त्याला सोडतांना, एकेका पावलानें खालीं उतरतांना मनाला कसली तरी हुरहुर लागली. पण कांहीं झालें तरी गडावर कायमचें रहातां येतें थोडेंच. श्री. तात्यासाहेब केळकरांनीं सांगूनच ठेवलें आहे—

“इतिहासाच्या पर्वतशिखरावर ताजी हवा घेत सदैव राहतां येत नाहीं व राहून चालत नाहीं हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. बाराही महिने पर्वतशिखरावर घालवितां आले व खालच्या जाचांतून मुक्त होतां आलें तर तें कोणासही हवेंच आहे ; पण तें होणार कसें ?”

---

# ६. राजगड

'ज्याचें साधलें तो शहाणा अन् फसलें तो मूर्ख' हा जगाचा सनातन न्याय आहे. राजगडावर जाण्यासाठीं आम्ही तोरण्याच्या दक्षिण अंगानें उतरलों, हातींपायीं सुरक्षित आलों म्हणून ठीक; याच्या उलट कांहीं तरी झालें असतें तर 'तुम्हांला सांगितले होते कोणीं हे उपद्व्याप' म्हणून ऐकणारांनीं आम्हांला मूर्खांत काढलें असतें. 'बिकट वाट वहिवाट नसावी' हा लोकविश्रुत 'फटका'ही लगावला असता.

खरोखर मुळांतच नसलेली ती वाट आम्हीं कां पत्करली? त्या तोरणाद्रीला एवढें संकट कां घातलें? एवढे आम्ही जिवावर उदार झालों होतों का? नाहीं. आम्हांला वेळ वांचवायचा होता अन् फेरा चुकवायचा होता. रुळलेल्या मार्गानें राजगड गांठायचा तर परत आम्हांला वेल्ह्याला उतरावें लागलें असतें आणि तिथून दुसऱ्या एका डोंगराच्या खिंडींतून पार होऊन गडाच्या पायथ्याशीं यावें लागलें असतें. राजगड डोळ्यांसमोर खडा दिसत असतांना एवढा हेलपाटा कोण घेईल? थोडें साहस होतें त्यांत; पण प्रवासी माणसांत ती वृत्ति आपोआप उत्पन्न होतेच.

सखाराम गुरव म्हणाला कीं, 'मी तुम्हांला खालीं काढून देतों. ती खालीं हत्तीच्या पाठीसारखी टेकडी दिसते ना, तिथें पोंचलांत कीं गेलांत तुम्ही.' तो पुढें होऊन कोंकणदरवाज्यांत आला. तोरण्याचें हें पश्चिमद्वार पत्र्याचें झडप लावून कायमचें बंद करून ठेवलेलें आहे. त्याच्या फटींतून आंग घसटीत आम्ही बाहेर पडलों. थोडा वेळ सखाराम उतरत होता. त्याच्या पायांखालीं मोडकी तोडकी वाट असल्याचें आम्ही पहात होतों. पण जेव्हां त्यानें एका जागीं चटकन् डावीकडे मोहरा वळवला तेव्हां मला कळलें कीं, हा आडरानांत शिरला.

एक न वांकणारी जाडजूड काठी हातांत घेऊन मी त्रिपाद प्राणी झालों होतों. 'पायींची वहाण पायीं बरी' हा तुकोबांचा अर्थांतरन्यास क्षणभर दुर्लक्षिला होता. पट्ट्याची थैली पाठीला घट्ट आंवळून बांधली होती. धोतराचा बळकट काचा मारून दोन्ही पायांवरचे फलकारे वर खोंचले होते. माझ्या मतें मी सज्ज आणि सुटसुटीत झालों होतों. पण—

पण त्या आडव्या चालींत जळकट मातीवर माझे पाय सरसरायला लागले. काठी 'असून अडगळ अन् नसून खोळंबा' ठरली. तीच जिथें स्थिर होईना, तिथें तिच्या आधारावर पाय उचलायचा कसा? माझी खात्री झाली कीं, इथून पुढें उभ्यानें उतरणें सुतराम् अशक्य! आतां हातांचा उपयोग चालण्यासाठीं. सखारामानें माझें दंडकाष्ठ आपल्या हातीं घेतलें. पाठीवरची थैलीही सोडवून स्वतःच्या खांद्यावर टाकली. मी मोकळा झालों; तो लादला गेला. मीं हात-पायांचा सारखाच उपयोग करून 'माकडचेष्टा' सुरू केली. तेंही अशक्य तिथें धोतराची पर्वा न करतां घसटत घसटत, वीत वीत अंतर तोडूं लागलों. पण ती चाल कांहीं एकाच रीतीची नव्हती.

मध्येंच पाणलोटाचा चर आडवा आला कीं त्यावरून पुढें उडी मारावी लागे आणि खड्डा ओलांडायचा तर तो एका उडीसरशींच ओलांडला पाहिजे. दोन हप्त्यांनीं उडी मारूं म्हणणें मूर्खपणाचें. पण ती उडी कदाचित् आयुष्यांतली शेवटची उडी ठरण्याचा संभव होता. वर पहाण्याची सोय नव्हती. कारण आपण उभ्या कड्यावर निराधार अवस्थेंत असल्याचें समजून तो डोंगर उरावर आल्यासारखें वाटायचें. खालीं पहाणेंही भयावह. तिकडे खोल दरीचें तोंड आपल्याला ग्रासण्यासाठीं वासलेलें असायचें. मग काय डोळे मिटून घ्यायचे? छेः! तसें केलें तर सर्वनाशाला निराळें आमंत्रण नकोच.

अधेंमधें कारवीचें रान लागे. पण त्याचा आधार घ्यायला जावें तों काडी मोडून हातांत यायची. कारवी सात वर्षांनीं फुलते अन् फुलली कीं तात्काळ मरते. दुर्दैवानें तिच्या त्याच अवस्थेंत आम्ही तिथें पोंचलों होतों. तिचे सुकलेले तुरे आमच्या कपड्यांना घसटून जात

होते आणि एक प्रकारचा उग्र दर्प नाकांत भरीत होते. पण त्याबद्दल तक्रार करायला सवड होती कोणाला! एकदम पुढें आलेला उतार उताणा उतरूं का पाठ वळवून पोटावर घसरत खालीं जाऊं, ही विवंचना माझा श्वास गुदमरवून टाकायची.

एका ठिकाणीं तर माझी अवस्था अत्यंत दयनीय झाली. पुढेंही जातां येईना अन् मागेंही वळतां येईना. जिथल्या तिथें पाय तेवढे लटपटत राहिले. टाळू सुकली त्याचबरोबर जीवनाची आशाही सुकली. 'कठिण विषमकाळीं' देव आठवतो म्हणतात; पण मला तोही आठवेना. सर्वांग घामानें डबडबलें. दहा-पंधरा कदमांवर पुढें चालणाऱ्या सखारामाचा धांवा करण्याचीही शुद्ध राहिली नाहीं.

पण त्याचा पाय पुढें असला तरी दृष्टि मागें होती. माझी ती अशरण अवस्था पाहून तो लगेच माघारला. माझ्या उजव्या हाताला येऊन उभा झाला. त्याचाही वहाणेचा पाय सर् सर् खालीं जात होता. पण लगेच त्यानें तो स्थिर केला अन् माझा बाहुळा पकडला. पण मीं उठायचें कसें? त्याच्या अंगावर भार पडला अन् तो उताणा मागें कोसळला तर! आधीं तो अन् त्याच्या मागोमाग मी. 'इंद्राय तक्षकाय स्वाहा!'

तो चिवट होता, सराईत होता म्हणूनच त्यानें मला त्या प्राणसंकटांतून पुढें ओढलें. मीं कोणत्या शब्दांनीं त्याचे उपकार मानायचे!

**'तो आप्तोत्तम, कामा ये जो धांवोनि अवसरीं विषमीं'**

या पंतांच्या उक्तीप्रमाणें तो माझा परम आप्त झाला होता. खरोखर तो होता म्हणूनच मी ते अतिअवघड कडे उतरून खालच्या टेकडीच्या माथ्यावर पाय ठेवूं शकलों. आतां आमची वाट सुगम होती. अंगुलिनिर्देशानें खालचें गांव आम्हांला दाखवून सखाराम तिथून परत फिरला. तो जसा उभाच्या उभा खालीं उतरला तसाच उभाच्या उभा वर चढूं लागला. तो दुर्लंघ्य तोरणा त्याच्या वांट्याला पायांचा मळ होता. त्याची जाती मूर्ति लहान लहान होत त्या कारवीच्या रानांत केव्हा अदृश्य झाली तें आम्हांला कळलेंसुद्धां नाहीं. मीं इतिहासाच्या

पुस्तकांत वाचलें होतें, ‘ शिवाजीचे मावळे गडाची जी बाजू सर्वांत अवघड, तिकडूनच माळा लावून वर चढत. ढाल तलवारीचें ओझें संभाळून तटावर उमटत. कुठें सरपटत, कुठें शिड्या उभ्या करीत, कुठें मेखा ठोकून दोर सोडीत. त्यांचें हें आक्रमण शत्रूनें ‘आ’ वासून पहावें अन् मनांत म्हणावें, ‘ हे माणूस आहेत का पिशाच्चगण ?’ ......या असल्या वर्णनावर विश्वास ठेवायला त्या वेळीं माझें मन एकदम राजी होत नसे. पण आज सखारामानें मला त्याचें प्रात्यक्षिक दाखवलें. आतां मी त्यांतली मात्रा–वेलांटीसुद्धां खोटी म्हणणार नाहीं. त्या लढाया संपल्या ; पण डोंगर-दऱ्यांत वास्तव्य करणाऱ्या मराठमोळ्या काळजांतलें तें धैर्य अन् तो चिवटपणा अजूनही जिवंत आहे.

खालच्या पिलावरे मेटाजवळ एका झाडाखालीं बसून आम्हीं आमचीं धापावलेलीं हृदयें प्रकृतीवर आणलीं. तिथून उठतांना पुन्हां एकदां आल्या वाटेचें सिंहावलोकन केलें. तसें करतांना माझें मलाच आश्चर्य वाटलें. ‘ खरेंच का मी हा उभा पहाड उतरलों ?’ त्यावर श्री. दांडेकर मला म्हणाले, ‘ हिटलरचें एक वाक्य आहे. ‘ बंदूक लढत नाहीं, तर तिच्या मागचा हात लढतो. हातही लढत नाहीं, तर त्याच्या मागचें काळीज लढतें.’ शास्त्रीबुवा, तोरण्याची ही अवघड बाजू तुम्ही उतरलां नाहीं. पाहीन, अनुभवीन आणि लिहीन ही तुमच्या हृदयांतली दुर्दम्य आकांक्षा खालीं उतरली हें लक्षांत ठेवा.’

आतां आम्हांला गुंजवणी नदीला उजवी ठेवून पालीपर्यंत सुमारें तीन मैल जायचें होतें. नदीतीरानें प्रवास करण्यांत केवढा मनस्तोष असतो तें सांगून पुरवायचें नाहीं. मात्र ती सरिता सुजला नसली तरी सजला असायला हवी. मग तिच्या कांठीं हिरवा रंग सदाचा खुलून रहातो. उभयतीरांना वृक्ष-वल्लींचा दांपत्यभाव नयनमनोहर दिसतो. मग तिथें सौंदर्याला स्निग्धता येते. स्निग्धतेवर उल्हास तवंगतो आणि उल्हासाला पवित्रता भेटते. प्राचीन ऋषींचे सगळे आश्रम नदीतीरांवर उभारलेले असत ते याचसाठीं.

पण आम्ही जिचा पालव धरला होता ती गुंजवणी वसंतांतच

कोरडी होऊन बसली होती. तिची 'माया' पार आटली होती. फक्त-ती सरिता आहे एवढें पटविण्यापुरेसें सांचून शेवाळलेलें पाणी कोंडांत अधूनमधून दिसे. पण तीरावरंचे मोठे वृक्ष अजून तिला कृतज्ञ होते. त्यांनीं खाल्ल्या घरचे वासे मोजले नव्हते. अजूनही त्यांच्या खोल गेलेल्या मुळांना भूगर्भांत ओल्हासा मिळत होता आणि तो ते डहाळी-डहाळीवर फुलवून जगजाहीर करीत होते. विशेषतः तिथले पांगारे आणि सांवरी.

गुंजवणीच्या दोन्ही तीरांना त्यांची रांगची रांग लागली होती. त्यांचीं जीर्ण पर्णें केव्हांच गळून वाऱ्यासंगें देशांतराला गेलीं होतीं. नव्या पालवीला अजून 'मूळ' गेलें नव्हतें. आणि मध्यंतरींच्या या वसंतकालांत कळयाफुलांनीं त्यांच्यावर आपला साज चढविला होता. दोहोंचींही फुलें लाल; पण वर्णच्छटेंत आणि आकारांत फरक. पांगाऱ्याचीं बारीक टोंकदार अन् सावरीचीं पूर्ण विकसित आणि बचके-एवढीं. तशींच इतरही नाना वर्णांचीं! पण कोण त्यांचें कौतुक करणार! महाराष्ट्राच्या जनपदांत फुलांबद्दलची रसिकता अगदींच कमी. ती असती तर त्यांच्या लोकगीतांतून प्रगटली असती. हेंच पुष्पसाम्राज्य काश्मीरच्या भूमींत थाटलें असतें, तर तिथल्या गौरसुंदर ललनांनीं गाऊन गाऊन त्याला हर्षपुलकित केलें असतें—

'हे केसराच्या फुला, तूं माझ्या शेतांत सुवर्णासारखं झळकत राहिलं आहेस. कोणीं दिला तुला हा रंग? कोणीं भरला तुझ्यांत हा सुगंध? मी तुला माझ्या हृदयाशीं धरीन. माझं तन–मन तुझ्यावर कुरबान करीन. हे माझ्या शहाजाद्या! मी तुला 'कोसम' पुष्पांनीं सजवीन. थकलेल्या मुशाफिरा! तूं 'नरगिस' फुलाचा शोध करीत इतक्या दूरवर आलास ना? हें फूलही तुझीच प्रतीक्षा करीत राहिलं होतं. हेंच नव्हे, तर जसपुष्प, यास्मीन, आरवल हीं सगळीं. ये, हलक्या पावलांनीं ये. हलुवार हातानें या सगळ्यांना मधुमय स्पर्श कर......'

पण त्या सावरी–पांगाऱ्यांना, त्या मोहरल्या आम्रवृक्षांना, त्या अनेक अपरिचित चित्रवर्ण तरूंना मानवाच्या कौतुकाची काय मातब्बरी!

त्यांचा आदर करणारी मंडळी वेगळीच आहेत. पहा त्यांच्या शिखरांकडे एकदां. तिथें छोट्या छोट्या पांखरांचें 'सर्वान्नं मधु' असें भोजन चाललें आहे. ती मी पुढें, का तूं पुढें अशी मंडपघसणी, ती फुलाच्या काळजांत हळुवारपणें खुपसली जाणारी चोंच, लगेच उडून वृक्षाभोंवतीं घातली जाणारी ती प्रदक्षिणा, तो धालेपणाचा चिवचिवाट, तो आदराचा मधुर संभ्रम...मुक्त दानांत जीवनाचें सार्थक मानणारे ते वृक्ष रघु, नल, समुद्रगुप्त, अशा जातीचे उदारात्मे बनून तिथें उभे होते.

आम्हीं तें मधुदान थोडा वेळ उभें राहून पाहिलें. आम्हांला तरी विशेष सवड होती कुठें! क्षणाक्षणानें दुपार तरुण होत होती. वरून नक्षत्र तापत होतें. खालून तांबड्या मातींतून वाफारे उठत होते. सर्वांग घामानें चिंब झालें होतें. लवकर कुठें तरी पाण्यांत नेऊन जीव ढकलावा, यासाठीं आम्ही आसुसलों होतों. हवालदाराच्या पालीजवळ आम्हांला गुंजवणीच्या दुसऱ्या तीराला निघायचें होतें. तिथेंच थोडेंसें पाणी झुळझुळतांना दिसलें. तेवढ्यानेंच आम्हीं बुडबुड काकस्नान केलें आणि आंगणांत मांडव असलेल्या हवालदाराच्या सौम्य, शीतळ पडवीवर प्रविष्ट झालों. त्याच्या पडवींतल्या फुगीर पोटाच्या उंच कणग्या पाहून उपाहारापूर्वीच आमचें पोट भरलें.

या हवालदाराचें आडनांव भोसले असून हें घराणें शिवाजीमहाराजांचें संबंधी आहे. महाराजांनीं राजगड सुसज्ज केल्यापासून तों आजवेरीं याच भोसले घराण्यांत त्याची किल्लेदारी चालत आली आहे. त्या काळीं गडावर कैदी आणून ठेवीत, ते यांच्याच हुकमतीखालीं. गडावरच्या नोकरीबद्दल खालीं त्यांना दुमाला आहे. शिवाय थोडाबहुत पगारही मिळतो.

पाली गांव हें राजगडाच्या पायथ्याशींच वसलें आहे. जुन्या काळापासून हाच गडाचा हमरस्ता आहे. राजबाग, प्रधानबाग इत्यादि तिथल्या स्थळावरून पालीचें ऐतिहासिक महत्त्व समजतें. त्या गृहस्थानें चार पावलें पुढें येऊन आम्हांला नीट गडाच्या वाटेला लावलें. तिथलें जीवन किती शांत, सुस्थित आणि निश्चिंत असेल त्याबद्दल मी त्याच्याशीं अंतरींच्या

उल्हासानें बोललों; पण त्यानें उत्तर दिलें तें मात्र नेमकें निरुत्साही आणि प्रतिकूल —

" जमीन बरड अन् त्यामुळें नापीक. पोटापुरतं मिळवायचं तरी अति कष्ट पडतात. शिवाय अनेक उपद्रव, सोय कसलीच नाहीं. त्यामुळं वाटतं कीं, या घरादाराकडे पाठ करावी अन् शहराची वाट धरावी ! "

शहराची वाट ! किती भयंकर शब्द होता तो ! मला तो लागला. खेडीं ओस पडणें अन् शहरें अतोनात फुगणें हें काय बऱ्याचें लक्षण ? आपली समाजरचना बिघडली असल्याचें हें द्योतक नव्हे काय ? कुठें तरी भुंगा आंतून पोखरतो आहे; त्याच्यावर तावडतोब इलाज झाला पाहिजे. खेडयांच्या नाडया ठीक असल्या तरच शहरांची धडगत ! भारतांतली तीस-पस्तीस कोटि जनता खेडयांत रहाते. पण आज तिचें आसन डळमळलें आहे. गांवलक्ष्मीनें शहराकडे तोंड वळविलें आहे. तिला शहरांचा मोह निर्माण झाला आहे. हें तावडतोब थांबायला हवें. सरकारनें आणि समाजधुरीणांनीं हें प्रथम कर्तव्य मानायला हवें.

त्या भोसलेकुलोत्पन्न पुरुषाचा आम्हांला शक्य झाला, तेवढा भ्रम-निरास करून आम्ही गडाच्या चढणीला लागलों. दुपार-तिपार न म्हणतां कासवाच्या गतीनें चालतच राहिलों. दिवस अंगावर घेऊन आम्हांला वर पोंचायचें होतें. काळोख पडेपर्यंत बालेकिल्ल्यासह सगळें पाहून पुरें करायचें होतें. राजगडाची वाट सामान्यतः सिंहगडासारखीच आहे. मधोमध असलेल्या एकाच दांडानें वर चढावें लागतें. पहिलाच चढाव सामान्य माणसाची खात्री करतो; पण मधल्या माळावर येतांच थोडा दम टाकतां येतो. त्यापुढें पुन्हां दुसरा चढाव.

मी तो आक्रमायला लागलों आणि मला कळलें कीं, माझे पाय गळाठले आहेत अन् मी मिठाच्या होड्यावर आलों आहें. पण आतां मागें फिरणें शक्य नव्हतें. अर्धा रस्ता कसाबसा संपल्यावर पुढें चिरेबंदी पायऱ्या लागल्या. त्या सुखावह झाल्या असें मात्र नव्हे. पूर्वी म्हणे याच पायऱ्यांवरून महाराजांचे हत्ती, घोडे जात. जातही असतील कदाचित्. त्या पायऱ्यांच्या डाव्या अंगाला इतक्या खोल घळी आहेत

कीं, पहाणाराचे डोळेच फिरावेत. माझें तसें झालेंच; शिवाय पायांवरचा विश्वासही उडाला. वाऱ्याची एक धडक छातीवर आदळली तर मी कोसळून पडेन असें मला वाटूं लागलें. मी शक्य तितक्या उजव्या अंगानें चालूं लागलों. म्हटलें, पडलों तरी वरच्या झिळकुट्यांत पडावें; एकदम कडेलोट होऊं नये. आणि अशा रीतीनें आम्ही पालीदरवाज्यांत पोंचतों, तों खालच्या रानांत कुकुडकुंभ्यानें आवाज काढून तिसरा प्रहर संपल्याचें जाहीर केलें.



पाली दरवाजा

आंत शिरल्यावर उजव्या हाताला वळणेंच भाग पडतें. कारण समोर डोंगरमाथ्याची धार येते. तिच्यावर तट बांधलेला असून त्यांत जागोजाग रुंद चौकोनी जंग्या ठेवलेल्या आहेत. एखाद्या माणसाचें मोटळें सहज आंतून खालीं कोसळावें. तिथून खालीं पहातांना आपण खोलवरचा कुठला तरी अधोलोक पहात आहोंत असा भास होतो. उजव्या हातानें पायऱ्या चढत गेल्यावर गडाचा दुसरा तेवढाच भव्य

असा दरवाजा भेटतो आणि त्यांतून आंत पाऊल टाकलें कीं, आपण पद्मावतीमाचीवर उभे रहातों.

विमानांतून विहंगमदर्शन घेणाऱ्या माणसाला राजगडाचा आकार विमानासारखाच दिसेल. हें प्रचंड विमान वायव्येकडे तोंड करून उभें आहे. त्याच्या उजव्या पंखावर पद्मावतीमाची वसली आहे. नैर्ऋत्येच्या डाव्या पंखावर संजीवनीमाची मांडली आहे. आग्नेयीचा पुच्छभाग सुवेळामाचीनें व्यापला आहे आणि पाठीवर बालेकिल्ला उभा राहिला आहे. गडाच्या या तीन माच्यांमध्यें पद्मावती हीच माची रुंद, प्रशस्त आहे. इतिहासकालीं सुमारें साडेसातशें माणसें या माचीवर वस्ती करून होतीं. शिवरायाचा राजवाडाही इथेंच होता. पद्मावतीमंदिराच्या खालच्या अंगाचा सदा लहरता गंभीर जलाशय या वस्तीला मुबलक पाणी पुरवीत होता. देवळाच्या वरच्या अंगाला त्या वेळची कचेरी होती. आजमितीस ती इमारत कशीबशी उभी आहे आणि हवालदारानें तिच्यांतच आपले तीन दगड मांडले आहेत.

आम्ही तिथें गेलों तेव्हां तो पिकल्या केसांचा वृद्ध प्राणी आपलीं मूठभर हाडें घेऊन खांबाशीं बसला होता. त्यानें अतिथि पाहिले; पण संभ्रम मात्र कसलाच दाखवला नाहीं. हर्ष म्हणा, विषाद म्हणा, त्याच्या त्या भरभरीत चेहऱ्यावर छटामात्रसुद्धां दिसला नाहीं. गरज त्याला नसून आम्हांला होती; म्हणून आम्हींच हळूहळू त्याला बोलकें केलें. तोरण्यावर तीन तर इथें साडेतीन माणसें. एक हवालदार, एक गुरवदांपत्य आणि अर्धा त्यांचा आठ-दहा वर्षांचा पोरगा. पैकीं गडावर त्या दिवशीं अडचांचीच उपस्थिति होती. त्या मुलालाच आम्हीं बालेकिल्ल्याचा मार्गदर्शक केला आणि मोकळ्या अंगानें त्याचा मागोवा घेतला.

बालेकिल्ल्यांत जायचें तर सुवेळामाचीचा मार्ग धरावा लागतो. हा अर्धा मैल लांबीचा चढाव पुरा केल्यावर आपण अगतिकपणें एका खोल घळीच्या माथ्यावर आणि उभ्या कड्याच्या पायथ्याशीं उभे रहातों. हिंमत असेल त्यानें वर चढावें आणि कचदिल असेल त्यानें

तिथूनच त्या गडेश्वराला निवांत नमस्कार करून मागें फिरावें. बारा महिन्यांत शेंकडों माणसें राजगड पहायला येत असतील; पण त्यांतलीं बालेकिल्ला चढणारीं किती तें त्या हवालदारालाच विचारा.



राजगड आणि त्याचा बालेकिल्ला

सुमारें साडेचार हजार फूट उंचीला भिडणारा तो बालेकिल्ल्याचा खडक विठोबाअण्णांच्या भाषेंत बोलायचें तर 'शुद्ध दगड' आहे. मेघ शिळंधारीं वर्षतात; पण तिथें तृणबीजही उगवत नाहीं; मग झाडें-झुडपें कुठलीं! तो पावसांत भिजतो, वाऱ्यावर सुकतो आणि उन्हांत तापतो. जणुं युगायुगांचा उभा, अनिकेत तपस्वीच! त्याचें पद्मावती-कडचें तोंड रुंद आहे; पण तिकडे नजर करतांच खात्री होते कीं, इथें

माणसाचा लाग नाहीं. आणि म्हणूनच माणूस त्याच्यावर आरोहण करण्यासाठीं टेहळीत टेहळीत मार्गे गेला आणि त्यानें अखेर ही वाट शोधून काढली. आणि ती तरी कशी ? तर उभ्यानें चढतां येऊं नये, काठीचा उपयोग होऊं नये अन् पाय घसरला तर प्राणदंडाची शिक्षा मिळावी, अशी. चढत्याचा पाय खोलांत जाऊं नये म्हणून एका जागीं डाव्या अंगाला लोखंडी गज घातलेले आहेत ; पण पुढें मात्र ना गज, ना पायरी ना कांहीं. तो दोन-अडीच पुरुष उंचीचा भाग दगडाला केलेल्या खोबणी मुठींत घट्ट पकडून, अंगावर भार घेऊन अन् शरीराचा तोल संभाळून वानरासारखा पार करावा लागतो.

आजवर अनेक गडांचे अनेक बालेकिल्ले मीं पाहिले, आक्रमले ; पण याची सर कोणालाही नाहीं.

**' गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः '**

म्हणतात त्याप्रमाणें याच्यासारखा हाच ! आमच्या गोमंतकांत अनेक सुप्रसिद्ध देवस्थानें आहेत. सौंदर्य हें त्या सर्वांना सामान्य असलें तरी प्रत्येकाचें कांहीं तरी वैशिष्ट्य आहे. नागेशाचें तळें, मंगेशाचा घूड, शांतादुर्गेचा प्राकार इत्यादि. गडांच्या बाबतींत मींही अशीं वैशिष्ट्यें मनाशीं निश्चित केलीं आहेत. देवगिरीचा तासींव घेर, पुरंदराचा उप-पर्वत, सिंहगडाची एका दांडाची चढण, पन्हाळ्याचें पठार, तोरण्याची प्रचंडता आणि राजगडाचा बालेकिल्ला. पण या सगळ्या कल्पना सुचतात केव्हां ? धोक्याची वाट संपवून जननीच्या देवळाशीं सही-सलामत आल्यावर. ' स्वस्थे को वा न पण्डितः ! '

तिथून आणखी एक वळण घेऊन पुढें गेल्यावर प्रथम लागतें तें तळें. वर असें प्रसन्न सरोवर असेल याची मला कल्पनाही नव्हती. चालून चालून गरम झालेल्या माझ्या पायांचें एका क्षणांत त्यानें सांत्वन केलें आणि सबंध दिवसाची तहानही त्याबरोबरच शमविली. त्याच्या कांठावर लहानसें शिवमंदिर आहे. पद्मावतींतला गुरव नित्य इथें येऊन बिल्वपत्र नसलें तरी निर्गुडीचें त्रिदळ अथवा पांढऱ्या

चांफ्याचें फूल इथल्या शिवलिंगावर ठेवतो. मागच्या बाजूनें तळ्याचें पाणी गाभाऱ्याच्या खालीं शिरलें आहे तें जर आणखी दोन हात पुढें सरकतें तर त्याला जलमंदिराची शोभा आली असती.

तिथेंच वरच्या अंगाला सदर आहे. आणखी एक टप्पा चढून गेलें कीं, बालेकिल्ल्याची सपाटी भेटते. पद्मावतीमाचींत होता तसाच इथेंही राजांचा लहानसा वाडा असावा; कारण त्याच्या पडित खुणा अजूनही स्पष्ट दिसतात. अजूनही खोल्या आणि दिवाणखान्यांच्या आकृती कल्पनेनें बसवितां येतात. इथें त्या काळीं बाजारही भरे असें सांगतात. सुवेळा-माचीच्या अंगानें एक टप्पा खालीं उतरल्यावर तिथें कांहीं चौकोनी कट्टे एका रेषेंत आंखलेले आहेत, ते बहुधा दुकानदारांचे गाळे असावे. इथें वस्तुतः तटबंदीची गरज नाहीं. ज्या बाजूनें आम्ही वर चढलों ती एकुलती एक वाट बंदिस्त केली कीं, बालेकिल्ला सुरक्षित. पण तरीही इथें शिवरायानें तट बांधले आहेत आणि माऱ्याचे बुरूजही केले आहेत. विषाला पुटें देण्याचा, दुर्लंघ्याला दुस्सह करण्याचाच हा प्रकार असला तरी त्यावरून शिवरायाची राजगडाविषयींची आपुलकी निस्संशय कळून येते.

बालेकिल्ल्यांतून खालीं आल्यावर मधूनच मार्ग काढीत आम्ही सुवेळामाचीच्या वाटेवर आलों. तीन्ही माच्यांमध्यें ही सर्वांत धाकुटी खरी; पण हिच्यावर पाहण्याजोगें पुष्कळ आहे. तिच्या मधोमध एक टेंकडी उठावली आहे, तिला 'डुबा' म्हणतात. डुब्यावर झाडीही बरीच आहे. यापुढें ओळीनें काहीं घरठें आहेत. आजमितीस ते पडलेले असले तरी त्यांचा अभिमान शाबूत आहे. एकांत तानाजी, दुसऱ्यांत येसाजी, तिसऱ्यांत सिलीमकर अशीं स्वराज्यासाठीं वाहिलेलीं तोलामोलाचीं माणसें या घरांतून रहात असत. राजे पुरें एक तप या ठिकाणीं राजधानी करून राहिले. त्यामुळें त्यांच्या नेकजात सरदारांनाही राजांच्या हांकेवर राहणें भाग होतें. त्यामुळें त्या पडक्या वास्तूंबद्दलही प्रेम वाटतें. ती जागा एखाद्या तीर्थस्नानासारखी आदरणीय वाटते.

डुब्याच्या आग्नेयीस चार टाकीं आहेत तीं जणुं त्या निष्ठावंत सरदारांच्या निर्मळ मनाचीं प्रतीकेंच. तिथें एक नंदी भंगून पडलेला आहे तो

खालच्या रामेश्वरापुढचा असूं शकेल काय ? आणि ती कवच-खड्गधारी पुरुषमूर्ति कोणाची असावी बरें ? तो शिवाच्या आपटलेल्या जटेंतून निर्माण झालेला वीरभद्र असावा. ही मूर्ति उठावाची आहे आणि एकावर एक रचलेल्या तीन शिलाखंडांवर मिळून पूर्ण झाली आहे. संशोधक सांगतात कीं, असली शिल्पकारी जावा–सुमात्रा बेटांतच आढळते. कदिम काळीं तिकडचा कोणी कलाकार इथें येऊन आपली खूण उमटवून गेला असावा काय ?

तिथून पुढें माचीच्या टोकाला जायचें असेल तर तुम्हांला एक टप्पा खालीं उतरलें पाहिजे. तिथेंच डाव्या अंगाला डोंगराच्या नैसर्गिक तटाला एक आरपार वाटोळें भलेंमोठें छिद्र आहे. हें कधीं अन् कसें पडलें तें विश्वाचा अध्यक्षच जाणे ! राजगडाचें हें उल्लेखनीय आश्चर्य आहे. तोरण्यावरचें नांदरुकीचें झाड तसा हा 'वाघाचा डोळा' कोसांच्या अंतरावरून दिसतो. त्यांतून दिसणाऱ्या पलीकडच्या आकाशाच्या तुकड्यांत रात्रीच्या वेळीं एखादी पहिल्या प्रतीची तारा जेव्हां आपली उपस्थिति दाखवील, तेव्हा त्या शोभेचें वर्णन कोणीं करावें !

सुवेळामाची हें नांव मोठें अन्वर्थक आहे. भाटघरधरणाची नदी इथून जवळच असून ही माची तिची 'सुवेळा'च आहे. धरणानें अडविलेल्या पाण्याचा फुगोटा इथूनही वरपर्यंत पोंचलेला आहे. त्या बाजूनें तुषारशीतल वारे सारखे झुळझुळत असतात. माचीच्या टोंकाला जाऊन एखाद्या बुरुजावर आसन ठोकावें आणि खुशाल ते अंगावरून वाहूं द्यावे. या बाजूनें गडाकडे येण्याला जलमार्ग आहे, तो मोठा मनोरम आहे. खालच्या प्रदेशातून नावा वर येतात त्यांपैकीं एखादी पकडावी आणि मळें गांवांत उतरावें. गुंजवणें, पाली, भूतोंडें हीं जशीं गडाच्या घेऱ्यांतलीं मेटें तसेंच मळें हेंही एक मेट आहे. इथून काळेश्वरीच्या दिंडीनें वर चढून या माचींत दाखल व्हावें. अर्थात् पालीपेक्षां हा मार्ग अवघड हें देवच बोलला आहे.

आतां फक्त संजीवनीमाची राहिली. ही दीड मैल लांब पण

अगदींच अरुंद आहे. पालीहून गड चढतांना आम्हांला शेवटपर्यंत उजवी राहिली होती ती हीच माची. ही प्रवाश्यांचें चित्त आकर्षिते ती




संजीवनी माची आणि तिची नाळ

आपल्या चिलखती बुरुजांनीं. या बाजूचे बुरुज उघड्या अंगाचे ठेवले तर ते गोलंदाजीला टिकणें कठीण म्हणून त्या प्रत्येकाच्या कमरेइतका उंच, वाटोळा तट बाहेरच्या अंगानें उभारून त्यांना मजबुती आणलेली आहे. सुवेळामाचींतले बुरुजही याच जातीचे आहेत. संजीवनीमाची मावळतीकडे तीन टप्प्यांनीं उतरत गेली आहे. तिसऱ्या टप्प्यापासून शेवटच्या दोन्ही अंगच्या तटांना आंतल्या बाजूनें समांतर अशी तेवढीच भिंत उभारून ती तटबंदी द्विगुणित केली आहे. गनिमानें बाहेरच्या तटाला भगदाडें पाडलीं तरी त्याला पुन्हां आंतल्या तटावर डोकें आपटून घेण्याची पाळी यावी. या जोडतटामुळें दोन फूट रुंदीची आणि अधिकांत अधिक वीस फूट खोलीची एक लांबच लांब नाळ तिथें तयार झाली आहे. या नाळेंतून आंत बाहेर जाण्यास मधून मधून दिंड्या ठेवलेल्या आहेत. प्रमाणाबाहेर उंच असल्यामुळें शत्रूवर हल्ला चढविण्यासाठीं हिचा विशेषसा उपयोग नाहीं; पण खालून होणारा मारा चुकविण्यासाठीं ती हमखास सोयीची आहे. राजगडाच्या या तीन्ही माच्या चढायला विशेषशा दुर्लंघ्य नाहींत हें जाणून महाराजांनीं त्यांचा हा असा विशेष बंदोबस्त केला आहे.

१६५६ ते १६६३ हीं आठ वर्षें हा किल्ला मनासारखा बळकट करण्याच्या कामीं खर्ची पडलीं आहेत. १६५८ ते १६७० असें पुरें एक तप इथें शिवरायाची राजधानी होती. पुरंदर, पुणें इ. ठिकाणांवरून प्रथम कांहीं वर्षें त्यानें स्वराज्याचा कारभार चालविला; पण आपण राजे आहोंत ही जाणीव जेव्हां त्याच्या मनांत निर्माण झाली आणि यापुढें आपण भोंवतालच्या यवनीसत्तांच्या डोळ्यात कायमचे सलत राहणार, आपल्याला त्यांच्याशीं संघटित, सबळ अन् सतत सामना द्यावा लागणार हें जेव्हां त्याला पुरतें उमगलें तेव्हां त्यानें राजधानी म्हणून आपलें बस्तान मांडलें, तें या ठिकाणीं. स्वराज्याची पहिली राजधानी हा मान या गडाचा आहे. स्वतःच्या देखरेखीखालीं महाराजांनीं हा गड दुर्भेद्य केलेला आहे. या गडाचा परिसर समृद्ध आहे, दर्शनीय आहे. आंगठींत खडा बसवावा, गोपाळांच्या मेळांत सांवळा वनमाळी

उभा रहावा, तसा राजगड हिरव्या पर्वतराजीच्या मध्यभागीं मांडलेला आहे. सिंहगड, तोरणा, कंगोरी अन् रोहिडा ही त्याची चौकट आहे. राजगड महाराजांचा विशेष आवडता झाला तो या नि अशाच अनेक कारणांनीं.

शिवरायांच्या झुंजार जीवनांतल्या अनेक हर्ष-विषादांच्या स्मृती या गडाशीं संलग्न आहेत. शंभुराजे पुरंदरावर जन्मले तर राजाराम १६७०त राजगडावर जन्मला. महाराजांच्या पुत्रोत्सवाचें हें दुसरें स्थान. आपला आणि बाळसें धरूं लागलेल्या स्वराज्याचा ग्रास गिळण्यासाठीं अफझुलखान अफाट सैन्यसामग्रीसह निघाला आहे ही घनघोर चिंतेची बातमी महाराजांना इथेंच प्रथम कळली. राजगडाचें 'न्यून तें पुरतें' करून महाराज त्याच्या समाचारासाठीं इथूनच खालीं उतरले. जयसिंगाशीं तह झाल्यानंतर आग्र्याला निघण्याचें प्रस्थान त्यांनीं इथूनच ठेवलें आणि तिथून निसटून महाराष्ट्रांत पाय लागल्यावर ते प्रथम चढले तो हा राजगडच !

शिवरायाला प्रथम वाटलें होतें कीं, राजगड ही आपली कायमची राजधानी होऊं शकेल. आणि म्हणूनच तोरण्यावर मिळालेली अमूप धनदौलत त्यानें राजगडाच्या उभारणींत मुक्तहस्तानें वेंचली. त्याच्या आकांक्षांचें क्षेत्र मर्यादित होतें तोंवर ही राजधानी ठीक होती ; पण बळिवंत शत्रूंनीं वेढलेल्या उभ्या महाराष्ट्राचें स्वराज्य ती पेलूं शकत नव्हती. त्या दृष्टीनें राजगडांत कांहीं उणीवा होत्या. तो उत्तुंग असला तरी घाटमाथ्याच्या तोंडाशीं आणि रहदारी असलेल्या एका खोऱ्याच्या कडेवर होता. मैदानी आक्रमण आलें तर तो पुरा पडण्याजोगा नव्हता. शिवरायाच्या धोरणी बुद्धीला जेव्हां हें न्यून उमगलें तेव्हां त्यानें राजधानी तिथून उठवून रायगडावर नेण्याचें निश्चित केलें.

तो राजदुर्ग पायांनीं चालून अन् दृष्टीनें चाळून आम्ही पद्मावती-माचींत परतलों. तिथली सदर, ढालकाठीची जागा, अंबरखान्याचें ठिकाण, पागा आणि राजवाडा यांच्या जागा इ. स्थळें पाहून शंकराच्या देवळासमोर असलेल्या दगडी सोप्यावर विसावलों. मात्र कृतकृत्यतेच्या

समाधानानें नव्हे; तर विषण्ण अंतःकरणानें. महाराजांचा राजवाडा काळानें केव्हांच पुसून टाकला आहे. पण जिथें बसून ते राज्यकारभार चालवीत ती सदर मात्र चार वर्षांपूर्वीपर्यंत शाबूत होती. आज तीही खचली आहे. गुलामगिरीच्या काळांत नव्हे; तर भारत स्वतंत्र झाल्यावर ती पडली, भोर संस्थान विलीन झाल्यावर कोणी आपंगिता उरला नाहीं म्हणून पडली, याचें मला अधिक दुःख वाटलें. राजगडावरच्या कित्येक वास्तु-देवता अलीअलीकडे कोसळलेल्या आहेत. दिवाणघर उभें दिसतें खरें; पण तेंही ठायीं ठायीं ढांसळलें आहे. पडलेल्या भगदाडांतून आंत घुसणारा वारा त्याच्या खांबांना अविरत घुसळीत राहिला आहे. कोणत्याही क्षणीं तें आंतल्या हवालदाराच्या अंगावर कोसळूं शकेल.

आम्ही जणुं आत्मप्रसाद आणि मनःसमाधान मिळविण्यासाठीं नव्हे; तर तो मानस्थानांचा विध्वंस पाहून हृदयाला कट्यार लावून घेण्या-साठींच तिथें गेलों होतों. मला वाटलें, इथले दगड-धोंडे, इथलीं झाडें-माडें आम्हां मराठ्यांचा अधिक्षेप करून म्हणत असतील. 'तुमचा शिवछत्रपतीचा अभिमान पोकळ आहे. तुमचे जयजयकार कृत्रिम आहेत. तुम्हांला इतिहासाची खरी कदर नाहीं. तुमच्या हिंदवी स्वराज्य-संस्थापकानें जें आस्थेनें आणि अभिमानानें तुमच्यासाठींच उभारलें, तें तुम्ही अक्षम्य औदासीन्यानें खचूं दिलेंत. तुमच्या बाबतींत बोलायचें तर तें हेंच कीं, 'ते के न जानीमहे!'

पोपच्यापुढें बोलतांना नेपोलियननें एकदां आत्मगौरवानें सांगितलें होतें. 'मी होमरसारखाच महाकवि आहें. मी आपलें 'इलियड' प्रत्येक दिवशीं उघड्या मैदानावर, मोकळ्या हवेंत, सूर्य-चंद्रांच्या दिव्य प्रकाशांत रक्ताच्या शाईनें रचीत असतों-' राजगड हेंही शिवराजकवीचें क्रांतदर्शी काव्य होतें. भोंगळ, भाबडें नव्हे; तर सुश्लिष्ट आणि कलासुंदर. पण महाराष्ट्राला तें जगवतां येऊं नये यापरतें दुसरें दुर्दैव कोणतें!

शेक्सपियर हा इंग्रजांचा कंठमणि. पण त्याचा केवळ शाब्दिक बडेजाव मिरवीत न राहतां ते त्याची कृतज्ञता मूर्त स्वरूपांत आणून मोकळे झाले आहेत. त्याच्या स्ट्रॅट्फर्ड एव्हन् या जन्मग्रामीं तुम्ही चला. तिथें तुम्हांला

एक सुबद्ध नाट्यगृह दिसेल. त्याच्याच समोर उंच चबुत्र्यावर शेक्सपियरचा पुतळा उभा दिसेल. त्याच्या चारी कोनांना फॉल्स्टॉफ, प्रिन्स हाल, हॅम्लेट आणि लेडी मॅक्बेथ् या त्यानें निर्मिलेल्या पात्रांचे पुतळे त्यांच्या स्वभावविशेषांसह पहायला मिळतील. इतकें करूनही त्यांनीं त्याचें राहतें घर, त्याच्या भांड्यांकुंड्यांसुद्धां यथास्थित राखलें आहे हें आणखी विशेष. त्यांच्या या जागरूक, सक्रिय अभिमानाशीं आमचा निर्जीव, निष्क्रिय अभिमान ताडून पहा; म्हणजे दोहोंतलें अंतर कळेल.

शनिवारवाड्याच्या जीर्णोद्धाराविषयीं लेख लिहितांना श्री. तात्यासाहेब केळकरांनीं एक वाक्य लिहिलें आहे. 'दैवानें किंवा वैराग्यानें आणलेल्या विद्रूपपणाचा असा कळस झाला म्हणजेच जीर्णोद्धाराचें नवें युग सुरू होतें.' राजगडावर खरोखरच आतां विद्रूपपणाचा कळस झाला आहे. आतां त्या नव्या जीर्णोद्धार युगाची वाट पहायला हरकत नाहीं. हें काम विशेषतः मुंबई सरकारचें आहे. पण त्याला या पडझडीची वार्ता आहे काय ?' चारैः पश्यन्ति राजानः' असें म्हटलें आहे. मुंबई सरकारचा 'चारचक्षु' तोरणा-राजगडावर केव्हां पोंचणार !

एवढ्यांत सूर्यनारायण संजीवनीमाचीकडून डोंगराआड झाला. सुवेळेच्या वरच्या अंगानें तारानाथानें आपलें पूर्णप्राय हंसतमुख दाखविलें. म्हातारा हवालदार चरायला सोडलेल्या आपल्या म्हशीची शेपटी धरून आम्ही बसलों होतों तिथें आला. तें म्हसरू त्याचा विरंगुळा आहे आणि गुजराणही आहे. त्याच्याकडून शेरभर दूध घेऊन अंधार पडायच्या आंत आम्हीं नक्तभोजन आटोपलें. ती रात्र आम्हांला गडावरच काढायची होती. काल तोरण्यावरून पाहिलेलें तारामंडळ आज राजगडावरून पहायचें होतें. पण कालचा उत्साह मात्र आज नव्हता. शिमग्याचा ढोल उद्यां-परवां वाजायचा होता. त्यामुळें थंडी अजून पळाली नव्हती. ती झोंबऱ्या वाऱ्याला सोबत घेऊन येणार होती आणि आजही आम्हांला डसणार होती.

अंथरुणावर पडण्यापूर्वी, पद्मावतींतून शिळोप्याची संथ सहल करीत असतां आमची नजर समोरच्या डोंगरावर गेली, तर तिथें वणवा लागलेला. उभ्या आडव्या तेजाळ कांपऱ्या रेषेंत ती आग चरत चरत

जात होती. मधूनच किटाळें उठत होतीं. धूमरेखा आकाशाच्या पोकळींत रिगत होत्या. उजवीकडचा भला मोठा तुकडा करपून काळा ठिक्कर पडला होता. तें दृश्य पाहून माझ्या मुखांतून वामदेवाच्या राक्षोघ्न सूक्तांतला मंत्र सहजगत्या बाहेर पडला.

> " कृणुष्व पाजः प्रसितिं न पृथ्वीं
>
> याहि राजेवा मवाँ इभेन । "

वामदेवानें असाच एक महाप्रचंड वणवा पाहिला होता आणि अंतरांत उफाळलेल्या रौद्र स्फूर्तीनें तो म्हणाला होता —

'हे रक्षोहा अग्ने ! प्रचंड अस्त्रजाल सोडल्याप्रमाणें तूं आपलें धगधगीत तेज जिकडे तिकडे पसरून दे. आग, ठिणग्या आणि निखारे सगळीकडे उडवून दे. हत्तीवर आरूढ होऊन फिरणाऱ्या प्रतापशाली नृपतीप्रमाणें अकुंठित संचार कर. आपलें विकराल स्वरूप आमच्या राक्षसशत्रूंपुढें उभें कर. सर्व पदार्थांमध्यें दर्शनीय वस्तु एकच आणि ती म्हणजे तुझी चंचल ज्वाला. त्यांचा फटफटा शब्द सोसाट्याच्या वाऱ्याशीं मिसळून जातो. एखाद्या अबलख वारूला उत्तेजन द्यावें त्याप्रमाणें वायु तुला प्रोत्साहन देतो आणि मग तुलाही स्वारासारखें स्फुरण भरतें...'

आम्ही बराच वेळ तो खांडवदाह स्तिमित नेत्रांनीं पाहिला. पण ती दूरच्या डोंगरावरची आग आमची थंडी निवारूं शकत नव्हती. त्यासाठीं परत दिवाणघरांत येऊन हवालदारानें पेटविलेल्या परश्यालाच शरण जाणें भाग होतें. मग मात्र आम्हांला इतकी गाढ झोंप लागली कीं, उषःकालीं चंद्राचें मावळतें बिंब पहायलाच आम्ही उठलों. वेळ न गमावतां आल्या वाटेनेंच गड उतरलों. आतां आमच्यापुढें दोन डोंगरांच्या मधली खरीब् खिंड उभी होती. ती पार करून आम्हांला पलीकडच्या अंगाला उतरायचें होतें, डाव्या अंगाला बराच मोठा वळसा घेऊन वेल्ह्याच्या पेठेला पोंचायचें होतें आणि पुण्याला परतण्यासाठीं अकरा वाजतां सुटणाऱ्या मोटारींत चढायचें होतें. तीन दिवसांच्या प्रवासांत आम्हीं दोन गडांची चढ-उतर केली होती आणि चार दिवसांच्या विश्रांतीचे अधिकारी झालों होतों.

---

# ७. लोहगड-विसापूर

लोहगडाच्या यात्रेसाठीं पहांटेच्या लोकल गाडीनें आम्ही जेव्हां मळवली स्टेशनवर उतरलों, तेव्हां नुकताच संधिप्रकाश झाला होता. एखाद्याचें दैव अचानक खुलावें, तशी पूर्व दिशेला उषा उजळत होती. महावाक्याचा उपदेश कानांतून हृदयांत शिरावा, तशी गुलाबी थंडी कपड्यांतून अंगांत घुसत होती. भक्तवत्सल भगवंताच्या करुणेसारखा वारा झुळझुळ अंगावरून वहात होता. पायांखालचा रस्ता अजून नीटसा दिसत नव्हता. समोरच्या टेकड्यांनीं अजून पांघरूण फेकलें नव्हतें. नाम-रूपें अजून वेगळेपणें सुस्पष्ट झालीं नव्हतीं. आणि तरीही, आम्ही चालत होतों, तो राजमार्ग असल्यामुळें आमचीं पावलें अडखळत नव्हतीं.

सूर्यबिंब उमाळ्यावर येण्याच्या आंतच मैल-दीडमैल अंतर चालून आम्हीं भाजें गांव गांठलें. गांव अजून पुरतें जाग्रत झालें नव्हतें. तेव्हां आमचें स्वागत केलें तें कुत्र्यांनीं. आम्हीं जवळच्या साटल्यापोटल्या तिथेंच एका घरीं ठेवल्या आणि मोकळ्या हातांनीं गडाच्या मार्गाला लागलों. नुकतींच नांगरून टाकलेलीं कांहीं भातखाचरें तुडवून आम्हीं पहिल्या टेकडीवर पाय ठेवला. मात्र या टेकडीचा आणि गडाचा संबंध होता, तो परंपरासंबंध. खुद्द लोहगडाच्या डोंगराला पाय लागण्यापूर्वीं ज्या कांहीं अवांतर टेकड्या चढून मार्गे टाकाव्या लागतात, त्यांपैकीं ही पहिली होती. तसें म्हटलें, तर गड आमच्या उजव्या हाताला अगदीं टेकून होता. पण बहुतेक सगळे गड हे द्वाड असतात. आपल्याला हवी तिथून ते वाट देतीलच असा नेम नसतो. ते मोठे अन् आपण छोटे; तेव्हां त्यांच्या कलानेंच आपल्याला चढावें लागतें आणि त्यासाठीं आधीं निरर्थक कित्येक मैल तुडवणें भाग पडतें.

पण लोहगडाचा तो वळसा, निदान या ऋतूंत तरी आम्हांला निरर्थक वाटला नाहीं. त्या रानाला माडती, किंजळी, सांवरी वगैरे झाडें बरींच असलीं तरी मुख्य भरणा करवंदीच्या जाळ्यांचा. दृष्टि टाकावी, तिथें करवंदी. हात लांब करावा तो करवंदीच्याच जाळींत. त्यांचा ऐन मोसम सुरू होता. आम्ही लहानमोठीं सात-आठ माणसें गडाचे पांथस्थ होतों आणि रांग न सोडतां एकामागून एक अशीं चढत होतों. पण करवंदें दिसतांच एका क्षणांत सगळ्यांची पांगापांग झाली. प्रत्येक जण या ना त्या जाळींत घुसला. एकाची शुद्ध दुसऱ्याला नाहीं. हातातोंडाची गांठ पडल्यामुळें सगळीं जणुं मुकीं, निःशब्द. स्वार्थाच्या वेळीं कोणी कोणाचा नव्हे, याचें तें एक गमतीदार उदाहरण होतें.

कांहीं वेळानें सगळीं एकत्र आलीं, तीं भरल्या मुठींनीं, चिकट ओठांनीं आणि ओरखडलेल्या हातापायांनीं. प्रत्येकाच्या जिभेचा रंगही पार बदललेला. जिभेची लाली करवंदीच्या पल्लवांकुरांनीं घेतली आणि आपल्या फळांची नीलिमा जिभेला बहाल केली. सकाळच्या रामपाऱ्यांत सगळ्यांची धणी पुरली; पण तरीही त्या अमाप, अगणित फलसंपदेचें कांहींच खर्चलें नाहीं. उन्हें पडायच्या आंत गडाच्या माथ्यावर पोंचायचें, हा आमचा निर्धार त्यानंतर आम्हांला आठवला आणि मग पुढच्या करवंदींचीं शाखाहस्तांनीं दिलेलीं निमंत्रणें नाकारीत, आम्ही झपाझप चालूं लागलों.

लोहगड आणि विसापूर हे एकमेकांना खेटून असलेले किल्ले. दंडकारण्यांत फिरणाऱ्या राम-लक्ष्मणांमधलें जेवढें अंतर, तेवढेंच त्यांचें. तोरणा आणि राजगड हे किल्लेसुद्धां यांच्या मानानें एकमेकांपासून दूरच. लोहगडावर जाण्यासाठीं, विसापूरच्या अंगानें आम्ही चढत होतों. प्रत्येक चढण आम्हांला विसापूरच्या जवळ जवळ नेत होती आणि लोहगड होता तेवढाच लांब ठेवीत होती. मीं म्हटलें, आपण लोहगडाला चाललों आहोंत, का विसापूरला? कोलंबस निघाला हिंदुस्थानच्या उद्देशानें आणि पोंचला अमेरिकेला, तसा तर हा छोटासा


प्रकार नाहीं ना? पण दांडेकर मला म्हणाले, 'मी सात वेळां लोहगड केला आहे. तेव्हां आपण इष्ट स्थळाकडेच जात आहों, यावर विश्वास ठेवा.' आप्तवाक्य प्रमाण, म्हणून मग मी पुढें कांहीं बोललों नाहीं.

जोंवर लोहगडाच्या पूर्व अंगानें आम्ही चाललों होतों, तोंवर ती बाजू नवपल्लवित वृक्षांनीं भरलेली होती. माथ्याकडचा एकचतुर्थांश भाग सोडला, तर तिथून खालपर्यंत सगळा डोंगर हिरवागार आणि डोळ्यांना सुख देणाराच होता; पण दक्षिण बाजूला वळतांच सगळें शून्य आणि भकास! ढालीची फक्त एकच बाजू पहाणारे दोघे जण ती सोन्याची का चांदीची, या मुद्द्यावर जसे हमरीतुमरीवर आले, तसे दोन गृहस्थ लोहगडाचें एकच अंग पाहून परततील* आणि यदृच्छया एकमेकांना भेटतील, तर त्यांच्यांत चांगलाच 'कळंभा' माजेल. एक म्हणेल, 'लोहगड वृक्षवेष्टित आहे' तर दुसरा म्हणेल, 'छट्! अगदीं ओसाड अन् जळकट मातीचा!'

वर जाण्याची वाट याच दक्षिण अंगानें होती. आतां आम्ही पायथ्याला वसलेलें लोहगांव जवळ करीत होतों. गांवाचें शिवार लागल्यामुळें आंबे-फणस, हे मुद्दाम लावून वाढवलेले वृक्ष अधिक दिसूं लागले होते. वाटेंत डाव्या हाताला ओळीनें कांहीं दगडी चौथरे पहायला मिळाले. इतिहासकाळांत त्या चौथऱ्यांवर चौकाचे वाडे उभे होते आणि त्यांत सरदार, देशमुख अशा बड्या असामी रहात होत्या, असें कळलें. आजमितीस होरून गेलेल्या तिथल्याच एका विहिरीचीही शोकांतिकाच आहे. नुकतेंच विवाहबद्ध झालेलें एक नवदांपत्य, त्या विहिरींत पडून देवाघरीं गेलें, अशी आख्यायिका सांगतात. त्यांचा नकळत तोल गेला, का त्यांना मागून कुण्या दुष्टानें ढकलून दिलें, का कोणत्या तरी मरणाहून जाचक अशा दुःखांतून एकदम सोडवणूक व्हावी, म्हणून त्यांनीं आत्महत्या केली? एवढें खरें कीं, ज्या अर्थी तिथली भोंवतालची वस्ती उठली, त्या अर्थी त्या दुर्घटनेंत कांहीं तरी भयावह असें असलें पाहिजे.

लोहगांव लहानसेंच आहे. घरें केंबळी अन् विरळ विरळ आहेत.

वरून विहंगमदृष्टीनें तीं मोठीं सुंदर दिसतात. परिसरांतल्या उतरत्या टेकड्यांवर नाचणी-वरी पिकवून ते लोक संसाराची जोगवण करतात. कांहींनीं दुभत्याच्या धंद्यासाठीं म्हशीही बाळगल्या आहेत. ते दिवस आगोटीचे होते. पाऊस पडतांच तरू पेरण्यासाठीं त्यानीं जमिनीचे लहान लहान चौकोन जिकडे तिकडे भाजून ठेवले होते. तिथली जमीन काळी तर नाहींच; पण धड तांबडीही नव्हे. त्यामुळें हळद मिसळलेल्या तिखटासारखा तो नांगरलेला आसमंत स्वतः खुलून कडेच्या निसर्गालाही खुलवीत होता.



लोहगड - प्रवेशद्वार

अर्धा डोंगर नागमोडी वाटेनें चढून आम्ही गणेशदरवाज्याशीं प्राप्त झालों. लोहगडाला चार दरवाजे आहेत आणि ते एकाच्या माथ्यावर दुसरा अशा पद्धतीनें बांधलेले आहेत. आजवर मीं पाहिलेल्या कोणत्याही गडाचा दर्शनी भाग इतका सुबद्ध, नेटका आणि रुबाबदार नव्हता. गणेशदरवाज्याच्या दोन्ही अंगांना भव्य बुरूज आहेत. त्यांच्या आंतल्या अंगानें फिरण्यासाठीं तटाला लागून वाटोळी वाट आहे. खालीं खोल भुयारें आहेत. पहारेकऱ्यांसाठीं देवड्या आहेत. तिथून दुसऱ्या दरवाज्यांत जाण्यासाठीं तिरकी पाज बांधलेली आहे. दुतर्फा कठड्याची दगडी भिंत आहे. दुसऱ्या दरवाज्याचें नांव नारायण-दरवाजा. त्यापुढचा तो हनुमानदरवाजा आणि सर्वांत वरच्याचें नांव महादरवाजा. हनुमानदरवाजा तेवढा मूळ बांधणींतला असून बाकीचे तिन्ही नाना फडणिसांच्या हातचे आहेत. त्यांनीं जो कोणी स्थपति या कामीं नियुक्त केला होता, त्याचें नांव कोणास माहीत नाहीं. पण तो दुर्गशास्त्रांत प्रतिभावंत होता. त्यानें कांहीं तरी नवीन मांडलें आहे आणि तें पुन्हां रुबाबदार स्वरूपांत.

पण तें बांधकाम करतांना त्याच्याही पुढें एकदां डोकें धरून बसण्याचा प्रसंग आलाच. जसा पुरंदरावर शेंदऱ्या बुरूज उठवतांना तिथल्या गवंड्यावर आला होता तसा. दोन्ही ठिकाणची परिस्थिति सारखीच. गणेशदरवाजा भक्कम करायचा तर त्याला डावी-उजवीकडे दोन बुरुजांचा आधार देणें भाग होतें; पण ते बांधायचे होते, ते मात्र डोंगराच्या उभ्या उतारावर. त्यामुळें दिवसां पाया घालावा आणि रात्रीं तो खचावा असें सुरू झालें. त्यानें कालची चूक दुरुस्त करून नव्यानें पाया भरावा, पण पुन्हां आपलें 'ये रे माझ्या मागल्या.' कामाबरोबर बांधणाऱ्यांची उमेदही खचली. शेवटीं हा व्याघात नाना फडणिसांच्या कानांवर घातला गेला. तो मुत्सद्दी पुरुष विचार करूं लागला कीं, पुढें काय ? बहुधा त्यांना शेंदऱ्या बुरूजच आठवला असावा. नाहीं तर रात्रीं त्यांच्या स्वप्नांत एक पुरुष येणें आणि त्यानें नवदांपत्य बळी मागणें, या घटनेचा आगापीछा लागत नाहीं. 'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' ही म्हण तरी शतसहस्रांच्या अनुभवांतूनच आली असेल कीं नाहीं !

पण नानांनीं तो साक्षात्कार मानला. त्यांनीं तो आदेश मानायचें ठरवलें. मग ते चौकशी करूं लागले कीं, आपला सून–मुलगा कोण देऊं शकेल? दुसरा कोण देणार? जो लोभाचा पुतळा असेल तोच! मायेचे चिवट तंतु अन् वात्सल्याचे रेशमी पाश तोडायला दुसरा कोण समर्थ आहे! सून–मुलगा म्हणजे गोठ्यांतल्या गाई–बैलांसारखी एक जंगम मिळकत असें जो समजत असेल, त्यानेंच हें निर्दयपण आचरावें. साचळे नांवाचा एक पुरुष त्यासाठीं सिद्ध झाला. स्वप्नांतल्या पुरुषाला जोडचळी मिळाला. दोन कोंवळ्या जीवांच्या उरांवर ते दोन्ही बुरूज ठाण मांडून निश्चल उभे राहिले. नानांनीं लोहगांवची पाटिलकी घडशी नांवाच्या इसमाकडे होती, ती साचळ्याला देऊन त्याच्या त्यागाचें मोल केलें.

पुरातनकाळीं अजीगर्तानें आपला मुलगा शुनःशेप यज्ञांत बळी देण्यासाठीं शंभर गाईंच्या मोलानें रोहिताला विकला, तेव्हांपासून पुत्रावर पित्याची अशी सर्वतोमुखी प्रभुता दिसून येते. मध्ययुगीन काळापर्यंत भरतखंडांतच नव्हे; तर सर्व जगभर तिचा वापर चालू होता. आपल्या देशांत नजीकच्या इतिहासकाळापर्यंत तिचें शेंपूट आलेलें दिसतें, तें वर उल्लेखिलेल्या स्वरूपानें. मुलाला विकणें, दान देणें, त्याचा वध करणें या सर्व गोष्टींचा त्या रानटी मध्ययुगापर्यंत बापाला कायदेशीर अधिकार होता. रोमन इतिहासाच्या ग्रंथांत गिबननें लिहून ठेवलें आहे कीं, राजसभेंत, लष्करांत किंवा सार्वजनिक स्थळीं कोणाही रोमन नागरिकाला माणूस या नात्याचे मूलभूत अधिकार असले, तरी बापासमोर त्याला जंगम मिळकत याहून अधिक किंमत नव्हती. बाप त्याची वाटेल तशी वासलात लावूं शकत असे आणि तो गुन्हाही ठरत नसे. दत्तक मुलावरही बापाचा हाच अनियंत्रित अधिकार चालायचा. सेव्हरस अलेक्झांडर आणि नंतर व्हॅलेंटिनिअन यांच्या कारकीर्दींत अपत्यवध हा गुन्हा म्हणून कायद्यांत समाविष्ट झाला.

नारायण आणि हनुमान या दोन दरवाज्यांमध्यें दोन भुयारें आहेत. मराठी राज्यांत त्यांचा पेंवासारखा उपयोग करीत. एकांत नाचणीची

अन् दुसऱ्यांत भाताची सांठवण होई. त्या दरवाज्यांतून आंत शिरल्यावर आणखी एका उभ्या सुळक्याच्या मुळाशीं उभें रहावें लागतें. त्याची वरची कड तट आणि बुरूज यांनीं पक्की केलेली आहे. संशयास्पद अशी तिळाएवढी जागाही बांधल्याशिवाय ठेवायची नाहीं, हें तर गडाच्या उभारणीचें मुख्य सूत्र. तें शिखर गांठायचें तर तिथून डाव्या हाताचा वळसा घेऊनच गेलें पाहिजे.



महादरवाजा

आम्ही तसे गेलों. धापा टाकीत एकदां शिखरीं काठ्या लावल्या. वर

वाऱ्याशिवाय दुसरें कोणी नव्हतेंच. त्यानेंच आमचें ‘ स्वागतपर पद्य ’ म्हटलें. आम्हांला विंझणें करून तो अतिथिधर्माला जागला. वैशाखांतला चंडभानु त्यानें आम्हांला कःपदार्थ मानायला लावला. लोहगडावर स्वतंत्र असा बालेकिल्ला नाहीं आणि समतळ असें पठारही नाहीं. आंत शिरतांच प्रथम दिसते ती मशिदीच्या आकाराची एक इमारत. आजमितीस तीच एक वास्तु तिथें उभी आहे. आंत थडगें आहे तें औरंगजेबाच्या मुलीचें असें सांगतात. ही आणखी दुसरी कोणती मुलगी? आम्हांला ठाऊक आहे ती झेबुन्निसा एकटीच; पण तिची मृत्युभूमि तर औरंगाबादला आहे. त्या इमारतीचा पुढचा कट्टा ढासळलेला आहे. तिला लागून असलेली सदर संपूर्ण उध्वस्त झाली आहे. पुढें लोहारखान्याची जागा होती तिचीही गत तीच.

मशिदीच्या मागें एक टेकडी आहे. तिच्या उजव्या अंगाला सुमारें तीस फूट उंचीवर एक चार चौकी इमारत होती ती थोरली सदर. हिच्या मागच्या खडकांत चार गुंफा आहेत अन् एक टाकेंही आहे. उजव्या बाजूस एक खालीं अन् एक वर अशा दोन कोठ्या आहेत. पहिली खजिनदाराची आणि दुसरी ओळंबलेल्या खडकाखालीं आहे ती लोमशऋषीची. तो इथें बसून तप करी असें म्हणतात. हा लोमशमुनि म्हणजे केसाळ अंगाचा एखादा बौद्ध भिख्खु असावा.

इथून आणखी वर गेल्यावर एक मोठें आवार लागतें. त्यांत एका कुणग्याएवढी जागा गडगा उभारून बंदिस्त केलेली आहे. तिच्यांत एक कबर दिसते अन् एक तणार. कबर शेख उमर या अवलियाची आहे अन् तणार मुजावराचें असावें. हे सहा बंधु महंमदी धर्माचा प्रचार करण्यासाठीं अरबस्तानातून भारतांत उतरले अन् तिथून महाराष्ट्रांत आले. मुसलमानांची धाड महाराष्ट्रावर आदळण्यापूर्वीं या त्यांच्या पुरःपताका पुढें फडकल्या. पैकीं शेखसल्ला हा पुण्यास राहिला. त्यानें इथल्या पुण्येश्वरकेदार आणि नारायण या दोन देवांना स्थानभ्रष्ट केलें आणि तिथें आपलें बस्तान मांडलें. त्याच्या भयानें मग ते देव पुरंदरावर नेऊन बसवावे लागले. बावा मलंग हा कल्याणजवळच्या ज्या किल्या-

वर जाऊन बसला, त्याला आज मलंगगड असेंच नांव पडलें आहे. हजारों लोक त्याच्या दर्ग्याला भजतात, पुजतात. वार्षिक यात्रा तर लाखांनीं भरते.

तिसरा हा शेख उम्र. यानें लोहगड गांठला. बरें, रहायचें तर तिथें पूर्वीं कोण असेल त्याच्याशीं गुण्यागोविंदानें रहावें ? पण तें त्यांच्या रक्तांतच नाहीं त्याला ते काय करतील ? त्यांच्या धर्मप्रचाराचीं तंत्रेंच वेगळीं आणि आततायी स्वरूपाचीं. त्यानें पहिलें सत्कृत्य केलें तें तिथें एकान्त साधून रहाणाऱ्या एका साधूला तंगडी धरून पलीकडच्या विसापूरगडावर फेंकून देण्याचें. तेवढें करतांच त्याला आयत्या बिळात नागोबा व्हायला मिळालें. स्वतःच्या राजसत्तेच्ें पाठबळ नसतांना शेख सल्ल्यानें पुण्यात आणि शेख उमरनें लोहगडावर जें केलें तें वाचून त्याच्या धटाईची तारीफ करावी का आपल्या मेणाहून मऊपणाला निखंदावें तेंच कळत नाहीं !

शेख उमरनें फेकून दिलेला साधु जिथें पडला म्हणजे कायमचा निजला, तिथें त्याची 'वनदेव' म्हणून अजूनही पूजा होते. त्याचा पुजारी एक कोळी आहे. त्याची जत्राही भरते. शेख उमरच्या दर्ग्या-जवळ एक चौकोनी खोलगट जागा आहे. पूर्वीं बहुधा तिथें तळें असावें. आज तें बुजून जमिनीसरपट व्हायला आलें आहे. निसर्गांत अशा घडामोडी नेहमींच चालायच्या ! जिथें पूर्वीं नद्यांचे प्रवाह खळाळायचे, तिथें कालांतरानें नुसतें वाळवंट होतें आणि वृक्षांचे घन-विरलभावही उलटेच्या पालटे होतात, हें भवभूतीचें वचन ज्याला सोदाहरण पटवून घ्यायचें असेल, त्यानें आमच्या महाराष्ट्रांतल्या गडांची यात्रा करावी. एका काळीं गरजणारे आणि गजबजणारे हे गड आतां सुप्त, जीवन्मृत झाले आहेत.

शेख उमरच्या दर्ग्याकडून विसापूर किल्ला अगदीं नजिक दिसतो. पुढें आकडी लावून एखादा कोंडा लांब करावा आणि विसापूरावरची वस्तु अलगद उचलून आणावी. बाकी आहेच काय तिथें आतां उचलून आणायला ! सगळी निर्जीव, शून्य सपाटी. मधें एक टेंभूक आहे, त्याचें नांव बालेकिल्ला. तोही फक्त आडनांवाचाच. त्याला ना तट ना बुरूज.

मात्र लोहगडापेक्षां विसापुराचा विस्तार मोठा आहे. त्याची पश्चिम बाजू सुगम होती, ती तटबंदीनें भक्कम करून डोंगराला किल्ल्याचें स्वरूप दिलें गेलें आहे. एक दक्षिणेस आणि दुसरा पश्चिमेस असे त्याला दोनच दरवाजे आहेत. आहेत म्हणजे होते असें म्हणायला पाहिजे. कारण इंग्रजांनीं किल्ला हातीं येतांच ते दोन्ही पहिल्या सपाट्याला निजवले. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांना तो गड बांधायला किती कष्ट पडले असतील! पण इंग्रजांनीं तो पाडण्याचें काम कसें चुटकीसरसें करून टाकलें.

'अशक्तोऽहं गृहारम्भे शक्तोऽहं गृहभञ्जने'

याचा मासला दाखवला. पण असें असलें तरी विसापूरचें सौंदर्य एका स्वभावसिद्ध गोष्टींत आहे; तें कोणालाही नष्ट करतां येणार नाहीं. त्याला तीन बाजूंनीं धारदार असे तीन कोन आहेत. खालपासून वरपर्यंत आणि केवळ काळ्या दगडांनीं बनलेले.

ज्या टेकडीवर फिरून आम्ही तिथली गुहा आणि टाकीं पहात होतों, तिच्या माथ्यावर एक मोठें तळें आहे. आंत पाण्याचा थेंब नसल्यामुळें तें विस्तीर्ण विहिरीसारखें खोल आणि भकास दिसतें. त्याच्या आंत उतरण्यासाठीं दोन बाजूंना पायऱ्या केल्या आहेत. 'हें तळें शके १७११ ( १७८९ ) मध्यें बाळाजी जनार्दन भानु यांनीं बांधलें. बांधकाम करणारा बाजी चट' अशा अर्थाचा एक शिलालेख तिथें आहे. बाळाजी जनार्दन भानु म्हणजेच महाराष्ट्राचा मुत्सद्दी नाना फडणीस! हें तळेंसंच काय, सगळा गडच त्यानें सुधारून बांधला आहे. पुण्यांतली बेलबाग आणि लोहगड हीं दोन नानांचीं निजनिर्मित स्मारकें आहेत. त्यांचें या गडावर विशेष प्रेम होतें. सवड मिळेल तेव्हां ते या गडावर येऊन वास्तव्य करीत. इथून दिसणारा सह्याद्रीच्या बाजूचा निसर्ग त्यांना आवडत असावा. राजकारण करून शिणलेल्या त्यांच्या मेंदूला इथली थंड हवा मानवत असावी. या तळ्याच्या कांठीं वारा खात आणि तळ्यांतल्या मासोळ्यांची क्रीडा पहात ते बसत असावे. पण

आज त्या तळ्याची अशी दीन अवस्था कां? तें चोहों बाजूंनीं माती पडून पुरलें कां? त्यांतलें पाणी कां गेलें व कुठें गेलें?

तें स्वतः गेलें नाहीं. उताराच्या बाजूनें तळयाला भगदाड पाडून त्याला वाट मोकळी करून देण्यांत आली. तें आपल्या स्वभावधर्मानुसार निम्न मार्गानें धावून पसार झालें. आणि हें काम कोणीं केलें माहीत आहे? अजून आम्ही ज्यांचे पवाडे गातों, त्या इंग्रजांनीं. त्यांची कल्पना होती कीं, मोहोरांनीं भरलेले हांडेच्या हांडे तळाशीं पुरून ठेवलेले असतील. पाणी काढून लावावें आणि खुशाल ते खणून वर काढावे. कारण नानांनीं आपला खजिना लोहगडावर पाठवून दिला होता, ही बातमी त्यांना होती. पण तो खजिना लोहगड इंग्रजांच्या ताब्यांत जाईपर्यंत तिथें शिल्लक होता का? असला तरी तळ्यांत गुप्त होता का? आणि तिथें असेल तर इंग्रजांना मिळाला का? कोण सांगणार? कोण्या मांत्रिकानें त्याच्या तटाचे चिरे मंत्राची भारणी टाकून जर बोलके केले तर तेच काय ते खरें सांगूं शकतील.

खालून वर येतांना गडाच्या वायव्येला डोंगराची एक लांब सोंड पुढें आलेली आम्हांला दिसत होती. सुप्रसिद्ध 'विंचूकांटा' तो हा म्हणून श्री. दांडेकर मला म्हणाले होते. पण त्या सोंडेला हें नांव कां पडावें, तें त्या वेळीं मला कळलें नाहीं. वर गेल्यावर मग तें कळलें. ही सोंड म्हणजे निसर्गाच्या लहरीनें निर्माण झालेली दगडी भिंत आहे. पंधराशें यार्ड लांब आणि चाळीस यार्ड रुंद. वरची माती पार धुपून गेल्यामुळें ती आतां स्वच्छ काळी कुळकुळीत झाली आहे. दोन्ही अंगांना दाट झाडी माजलेली आहे. तिच्या माथ्यावर दोन्ही कडांची तटबंदी केलेली आहे आणि ते तट टोकांच्या बुरुजांत येऊन मिळालेले आहेत. रुंदी कमीजास्त असेल, त्यामानानें तटांची रचना नागमोडी झालेली आहे. त्यामुळें वरून पाहणाऱ्याला ती भिंत एखाद्या अजस्र विंचवाच्या पुच्छभागासारखी दिसते. गडाच्या उंचीपेक्षां 'विंचूकांटा' उंचीला कमी भरतो, त्यामुळें त्यावर पाय ठेवायचा तर एक टप्पा खालीं उतरलें पाहिजे. हा 'विंचूकांटा' शुष्क नाहीं. त्याच्या मधोमध

एक चौकोनी उघडें टाकें आहे. सूर्यकिरणांमुळें त्याचें निळें पाणी चकाकतें आणि डोळ्यांना वेध लावतें. वस्तु लहान असो अथवा क्षुद्र असो; ती जर योग्य स्थानीं मांडली गेली, तर मोलाला चढते ती अशी.



विंचूकांटा

हा 'विंचूकांटा' प्रेक्षकाला गमतीचा वाटत असला तरी इतिहास-कालांत तो गनीमाला भयप्रद वाटत असे. त्याच्या अग्रभागीं लांब पल्ल्याच्या दोन तोफा बसवल्या कीं गडाच्या घेऱ्यांत पाय टाकण्या-पूर्वीच शत्रूचा धुव्वा उडायचा. सह्याद्रीचा बोरघाट रोखून धरायला याचा फार उपयोग होत असे. लोहगड किल्लाच मुळीं त्यासाठीं उभारला गेला आहे. 'जीवधन' आणि 'भैरवगड' हे जसे नाणेघाटाचे द्वाररक्षक

तसे लोहगड आणि राजमाची हे किल्ले बोरघाटाचे जय-विजय. लोहगडाचा निर्माता कोण हें इतिहासाला अज्ञात आहे; पण तो शिवनेरी, जीवधन यांच्या बरोबरीचा म्हणजे दोन हजार वर्षांचें आयुष्य लाभलेला आहे, असें अनुमानानें सिद्ध होतें.

सामान्यतः ज्याच्या कुशींत बौद्धांच्या गुंफा आणि लेणीं आहेत, तो किल्ला सर्वांत प्राचीन असें समजतात. लोहगडाच्या अंगाला तर कित्येक गुंफांचे कोनाडे आहेतच; शिवाय प्रसिद्ध भाज्याचीं लेणीं लोहगडाच्या समोरच्याच डोंगरावर कोरलेलीं आहेत. नाणेघाट आणि बोरघाट हे बौद्धांच्या काळापासून व्यापारी वाहतुकीचे घाट. कल्याण आणि सोपारें या बंदरांत उतरलेला माल याच दोन घाटांतून देशावर चढायचा. फार मोठा व्यापारीसंघ या घाटांत गुंतलेला असायचा. बौद्ध भिक्षूंना याच व्यापारीवर्गाचा घवघवीत आश्रय असे. त्यांच्या देणग्यांच्या वंगणावरच भिक्षूंचें धर्मचक्र फिरतें राही. त्यामुळें त्या काळचीं लेणीं हीं राजधानीच्या पंचक्रोशींत आणि रहदारीच्या मार्गावरच खोदलीं जात. तत्कालीन सत्ताधीशांना घाटांतून होणाऱ्या वाहतुकीच्या नियंत्रणासाठीं आणि शस्त्रसज्ज आक्रमक टोळ्यांना सबूर म्हणण्यासाठीं सह्याद्रीच्या प्रदेशांत लष्करी छावण्यांची गरज पडली आणि या गरजेंतूनच अशा अनेक डोंगरी किल्ल्यांची उभारणी झाली आहे. लोहगड या कामीं सर्व डोंगरी किल्ल्यांत बळिभद्र आहे.

त्यामुळेंच याच्यावर सत्तांतरें खूप झालीं आहेत. बळकटपणामुळें आणि मोक्याच्या जागीं असल्यामुळें तो प्रत्येक राज्यसंस्थापकाला हवाहवासा वाटला आहे. बहामनी राजांपासून तों इंग्रजांपर्यंत सगळे सत्ताधीश याच्या वाटेला गेलेले आहेत. निजामशाहीचा संस्थापक मलिक अहंमद यानें १४९१ त तो बहामनी राजांकडून बळकावला. निजामशाही मोडल्यावर विजापूरची आदिलशाही इथें आली. १६४८ त शिवरायानें आदिलशाहीला इथून हुसकावलें. पुढें जयसिंगाशीं केलेल्या तहांत जे अनेक किल्ले शिवाजीकडून मोगलांकडे गेले, त्यांच्याबरोबर याचीही दावण बांधली गेली. नंतर पांच

वर्षांनीं शिवाजीनें पुन्हा तो हस्तगत केला. शिवाजीच्या पश्चात् पुन्हा याला मोंगल भोंवला. राजारामाच्या कारकीर्दीत पश्चिम किनाऱ्याचें उत्तम संरक्षण करून 'सरखेल' हा बहुमानाचा किताब मिळविणाऱ्या कान्होजी आंग्र्यानें मोंगलांना इथून पिटाळून त्या जागीं आपलें स्वामित्व प्रस्थापित केलें. १७५० त भाऊपणाची शपथ घेऊन आंग्र्यानें हा नानासाहेब पेशव्यांच्या हवालीं केला. बाजीराव पत्रव्यवहारांत याला 'कान्होजीकाका' म्हणून संबोधी तें याच कारणासाठीं.

१७७० त नाना फडणिसांनीं जावजी बोंबले या कोळ्याला लोहगड हस्तगत करायला लावून तो आपल्या ताब्यांत घेतला आणि रा. धोंडोपंत नित्सुरे यास त्याच्यावरचा अधिकारी नेमलें. सन १८००त नानांचा मृत्यु झाल्यानंतर त्यांची पत्नी जिऊबाई लोहगडावर जाऊन राहिली. ती नानांची नववी बायको. एकामागून एक त्यांच्या बायका मरतच राहिल्या आणि नाना नवीं आणीतच राहिले. केवळ अपत्यासाठीं, पुत्रसुखासाठीं ! नानासारख्या जरठाची आयुष्याच्या अखेरीस केलेली ही अखेरची पत्नी वयानें केवढी असेल, असें तुम्हांला वाटतें ? अगदीं परकरी पोरगी. फार तर नऊ-दहा वर्षांची. 'नवी सूनबाई कशी आहे ती आम्हांला दाखवायला आणा' अशी बाजीरावाच्या बायकोनें त्यांची गर्भित थट्टाही केल्याचा इतिहासांत उल्लेख आहे. ती सुरेख होती. चुणचुणीत होती, असें जनरल वेलस्लीनेंही लिहून ठेवलें आहे. त्यांच्या इतर बायका आपले वज्रचुडे घेऊन स्वर्गवासी झाल्या. नानांचें वैभव, त्याचा अधिकार, त्यांचे मानमरातब, हें सगळें त्यांना भोगायला मिळालें. थोड्यांत गोडी साधून त्या पसार झाल्या. परवड झाली ती जिऊबाईच्या जन्माची. ज. वेलस्ली होता म्हणून तिला वार्षिक तनखा तरी मिळाला. एवढेंच तिच्या दुःखांतलें सुख ! प्रथम कांहीं दिवस तिनें पनवेलीस काढले आणि मग ती नानांच्या गांवीं मेणवलीस रहायला आली.

नाना निवर्तल्यावर धोंडोपंत आणि बाजीराव यांचें बिनसलें. बाजीरावाला लोहगड त्याच्या अधिकारांत ठेवायचा नव्हता आणि

धोंडोपंत तो सोडायला राजी नव्हता. बरेच दिवस त्यांची ही धुसफूस चालली होती. अखेर ज. वेलस्ली मधें पडला आणि त्यानें दोघाना एका मेळावर आणलें. धोंडोपंतानें बाजीरावाशीं इमान राखावें आणि बाजीरावानें किल्ला त्याच्या हातांतून काढूं नये असा उभयतांत करार ठरला ; पण जिथें मनें निर्मळ नाहींत, तिथें कितीही करार केले तरी ते कागदावरच रहायचे. धोंडोपंतानें पुन्हा कुरापती सुरू केल्या. धुमसतें वैर ज्वाला निघण्याच्या बेतांत आलें. ज. वेलस्लीला तें कळलें आणि तोही मग चिडला. त्यानें लोहगड घेऊन धोंडोपंताचें पारिपत्य करायचें ठरवलें. बाजीराव हा त्या वेळीं नांवाचाच पेशवा होता. ज. वेलस्लीचें उठिंगण होतें, म्हणूनच तो उभा होता. सगळा कारभार वेलस्लीच्या तंत्रानेंच चाले आणि बाजीराव खुशाल तीर्थयात्रा करीत हिंडे. ज. वेलस्ली आपल्याविरुद्ध हालचाली करीत आहे हें समजतांच धोंडोपंताची ' म्हातारी कांपली. ' ' तुज मी शरण ' म्हणून तो वेलस्लीच्या पुढें येऊन नतमस्तक झाला. त्यानंतर त्याचे पाय लोहगडाला लागले नाहींत !

पण पुढें इंग्रज आणि दुसरा बाजीराव यांचेंही सूत जमेना. पेशवाई दुहीनें पोखरली होती. कर्तृत्वानें दुबळी झाली होती. स्वार्थ आणि लोभ यांनीं बुजबुजलेली होती. एखाद्या राज्याच्या पतनाला जितक्या म्हणून अवगुणांची गरज असेल, तितक्यांचें कोठार बनली होती. तिचा सूर्य अस्ताचलावर टेंकला होता, तर इंग्रजांचा उदयाचलावर आला होता. इंग्रजांचीं पाळेंमुळें आतां घट्ट झालीं होतीं. ते आता कोणाच्या मोहबतीवर जगत नव्हते ; तर स्वतःच निग्रहानुग्रहाला समर्थ झाले होते.

इंग्रज आणि बाजीराव यांच्यामध्यें जो तह झाला होता, तदनुसार बाजीराव वागत नाहीं असें दिसून येतांच जनरल प्रोथर सैन्याची एक मोठी तुकडी घेऊन लोहगडाच्या रोखानें निघाला; पण त्याला ठाऊक होतें कीं, लोहगड मोठा द्वाड आहे. तो असा तसा दाद द्यायचा नाहीं. त्याच्या-वर डोकें आपटून घेण्यापेक्षां आधीं विसापूर जेर करावा आणि तिथून लोहगडाला शह बसवावा, असें त्यानें ठरविलें. त्या बाबतींत

ज. प्रोथर डोक्याचा ठरला. विसापूर चालतां चालतां पडला आणि तो पडला हें समोर दिसल्यामुळें लोहगडावरचें सैन्य आपभयानेंच खालीं उतरलें. इंग्रजाला एकही गोळी झाडावी लागली नाहीं. १८१८ पासून ते १८४५ पर्यंत इंग्रजांनीं इथें आपली शिबंदी कायम ठेवली होती.

विंचूकांट्यावरून पश्चिम बाजू मनोहर दिसते. हिरव्या रंगांत गुरफटलेलें तांबडें-पांढरें लोणावळें आपल्या अवगुंठित सौंदर्यानें ओढ लावतें. तसाच तो वलवणचा जलाशय. तो मोठ्या थोरल्या धरणानें अडला आहे अन् वरच्या डोंगरांच्या सांदीफटींतून शिरला आहे. अजस्र 'नळराज' बसवून त्याचें पाणी घाटांतून खालीं खोपोलीला नेलें आहे. तिथें जी प्रचंड वीज निर्माण होऊन गिरण्या, कारखाने, लोहमार्ग आणि मानवी जीवन चालवते, तिचा हाच तीर्थरूप आहे. धरणाच्या भिंतीआडून त्याचें जें दर्शन होतें, त्याचें वर्णन करायला बाणभट्टानें अच्छोद सरोवरासाठीं वापरलेलें शब्दच पुनरुक्त केले पाहिजेत--

'......जणुं त्रैलोक्य लक्ष्मीचा मणिदर्पण. जणुं वसुंधरेचें काचबंद आंगण. जणुं अष्टदिशांचा एकीभूत द्रव. जणुं गगनमंडलाचा अंशावतार. जणुं पिळून सांठवलेलें चांदणें इ. इ......'

लोणावळें, कार्लें, भाजें, मळवली आणि पश्चिमेचीं छोटीं छोटीं सह्य-शिखरें, हा एवढा भूभाग लक्ष्मीच्या क्रीडेसाठीं खास बनवलेला असावा, असें वाटतें. लोहगड–विसापूर आणि पूर्व अंगाचे तुंग–तिकोना हे किल्ले जर जमेस धरले तर हें वर्तुळ आणखी विशाल होऊन भव्यतेचा साक्षात्कार घडवतें. खालच्या खाचरांत भात आणि वरच्या डोंगरावर वरी-नाचणी यांचीं त्रिकोण, चौकोन आणि वर्तुळें जेव्हां हिरवीं होऊन लहरूं लागतील आणि जेव्हां आलटून-पालटून त्यांच्यावर ऊन-पाऊस खेळायला लागतील, तेव्हां तें ललित-मंगल दृश्य कवीला आणि चित्र-काराला निःसंशय मुग्ध करील.

आम्हीं तास–दोन तास किल्ल्यावर घालवले. यापेक्षां अधिक राहणें शक्य नव्हतें. कारण आमच्या शिदोऱ्या भाज्यांत राहिल्या होत्या

आणि आतां त्यांचें वारंवार स्मरण होऊं लागलें होतें. दुपार भाज्याच्या लेण्यांत घालवायची, हें आमचें आधींच ठरलें होतें. म्हणून मग झपाझप किल्ला उतरून आम्ही लेण्यांच्या डोंगराच्या पायथ्याशीं आलों. बरोबरच्या बायकामंडळीला म्हटलें कीं, 'तुम्हांला उगीच हेलपाटा नको. अशाच वर चढा म्हणजे चैत्याच्या दारांत जाऊन पोंचाल.' त्यांना तशा वाटेला लावून मी अन् दांडेकर गांवांत आलों. डबे, पिशव्या उचलल्या अन् राजरस्त्यानें चढून लेणीं गांठलीं. एवढ्यांत आमचा अर्धा तास सहज मोडला असेल. आम्हांला वाटलें होतें कीं, आमचें ओझें उतरायला मंडळी पुढें उभी असेल; पण त्यांचा तर पत्ताच नव्हता! वाट ही का ती म्हणून तीं माणसें खालच्या अरडी–दरडींत घोटाळत राहिलीं होतीं. दांडेकर धपाधपा खालीं उतरले आणि त्यांना एकदांचे वर घेऊन आले. सोपें तेंच त्यांच्या वांट्याला कठीण झालें होतें आणि जवळ तेंच दूर ठरलें होतें.

भाज्याच्या लेण्यांतलें प्रेक्षणीय शिल्प म्हणजे तेथील चैत्य. पुढची कोरीव कमान, आंतले ओळींचे खांब आणि शेवटीं मधोमध वाटोळा गुळगुळीत आणि ढोलाच्या पुडावर नगारा पालथा ठेवावा, तशा आकाराचा स्तूप असें त्याचें स्वरूप आहे. वास्तूच्या उंचीच्या मानानें ते खांब किरकोळ आहेत आणि किंचित् कलतेही आहेत. तें अवडंबर खालीं येऊं नये म्हणून छताच्या दगडी कमानींना लांकडी कमानींचा आधार दिलेला आहे. या चैत्यासमोर कार्ल्याला आहे तशी जवानिका असती, तर आज आहे त्यापेक्षां त्याचें गांभीर्य वाढलें असतें.

इथें लहान-मोठीं अठरा लेणीं आहेत. चैत्य त्यांच्या मध्यभागीं येतो. या लेण्यांत कुठेंही बुद्धमूर्ति नाहीं. हीं सर्व लेणीं हीनयान बौद्धांचीं आणि सातवाहनांच्या कालांतली आहेत. सनपूर्व दोनशें वर्षें हें या कालाचें मान ठरतें. सातवाहन हे वैदिक धर्माचे अनुयायी होते. नाणेघाटांतील शिलालेख त्याबद्दलचा पुरावा देतो; पण तरीही ते सहिष्णु वृत्तीचे होते. त्यांच्या बऱ्याचशा प्रजेनें बुद्धाचा धर्म स्वीकारला होता. जाणते विद्वान् लोक भिख्खु होऊन धर्मप्रचाराला जुडले होते.

सातवाहनांनीं त्यांच्या धर्मसंस्थांना देणग्या दिल्या आणि चैत्य अन् विहारही खोदून दिले. श्री. स. आ. जोगळेकर सांगतात--

'लेणीं हें सह्याद्रीचें वैशिष्ट्य. या शिल्पकृत्याला हें स्थान विशेषतः अनुकूल आहे. सह्याद्रींतील लेण्यांचें वैशिष्ट्य हें कीं, येथील बहुसंख्य लेणीं बहुजनसमाजानें परस्पर सहकार्यानें निर्माण केलेलीं आहेत. राजाश्रयावर विसंबून राहण्याचा महाराष्ट्राचा धर्मच नाहीं!'

चैत्याच्या उजव्या अंगाला, दुसरा मजला या स्वरूपांत खोदलेला विहार ह्या सर्वांत मोठा आहे. शंभर माणसें त्यांत ऐसपैस बसूं शकतील. चैत्याच्या दारांतूनच वर चढण्यासाठीं पायऱ्या मांडलेल्या आहेत. बाहेर ग्रीष्मऋतूंतल्या सूर्यानें कितीही आग ओतलेली असली तरी तुम्ही त्या विहारांत जाऊन विसावलांत कीं तुम्हांला गुलाबपाणी अंगावर शिंपडल्यासारखें थंड वाटेल. बसल्या बसल्या डुलकीही येईल. बाहेरचें ऊन दिसायलासुद्धां नको असेल, तर बाजूच्या अनेक लहान खोल्यांपैकीं एखादींत शिरून तिथल्या ओट्यावर सुखैनैव पहुडावें.

मात्र परत येतांना लेण्यांच्या रांगेंत अखेरीस एका जलप्रपाताखालीं सूर्यगुंफा आहे ती पहायला चुकूं नये. इथें इंद्र-सूर्यांच्या मूर्ति खोदलेल्या आहेत. इंद्र ऐरावतावर बसलेला असून त्याच्या गळ्यांत कल्पद्रुमाची पुष्पमाला आहे. त्याच्या हातांत अंकुश आणि मागें पताकाधारी सेवक आहे. सूर्याचा रथ एकचक्र नसून द्विचक्र आहे आणि घोडेही सात नसून चारच आहेत. संज्ञा आणि छाया या दोन्ही सूर्यपत्नी छत्रचामरें घेऊन त्याच्या पार्श्वभागीं उभ्या आहेत. सूर्याचा हाडवैरी राहु त्याच्या घोड्यांच्या टापांखालीं तुडवला जात आहे. सातवाहन हे सूर्योपासक होते; तेव्हां त्यांच्या लेण्यांत सूर्यमूर्ति दिसली तर तें नवल नव्हेच!

आम्ही जेव्हां एका विहाराच्या पुढच्या कोपऱ्यांत असलेल्या पुष्करिणीवर स्नान करीत होतों, त्याच वेळीं खालच्या वाटेच्या कडेला असलेल्या टाक्यावर कांहीं स्त्री-पुरुषांचा घोळका जमला होता. सकाळ-

पासून वरच्या डोंगरावर हिंडून त्यांनीं लाकडांचे लांब लांब भारे बांधून आणले होते आणि वरच्या घडेला ते ओळीनें टेकवून ते आतां हरण-गुटी लावून टाकयाचें पाणी पीत होते. त्या जलामध्यें त्यांचे सगळे श्रम हरण करण्याची ताकद निस्संशय होती. उगीच का त्यांचा रांगडा हास्य-विनोद एवढा खदखदत होता! कमरेच्या आंकडींत अडकवलेले कोयते-सुद्धां त्यांच्या अंगविक्षेपांबरोबर लटलट हालत होते. टोंकाला टोंक लावून जेव्हां ती भाऱ्यांची रांग डोंगर उतरूं लागली तेव्हां चालत्या खांबांवर उभारलेला सांकवच पुढें पुढें सरकत आहे असें मला वाटलें.

# ८. पर्णाल पर्वत

ज्या वेळीं पुण्याच्या स्टेशनावर आषाढीच्या वारकऱ्यांची तिकिटा-साठीं मंडपघसणी चालू होती त्याच वेळीं मी दुसऱ्या खिडकीशीं एका घारातीर्थाच्या यात्रेसाठीं कोल्हापूरचें तिकिट घेत होतों आणि ज्या आषाढी एकादशीला यात्रेकरू पंढरीस 'चंद्रभागे करूं स्नान। घेऊं पुंडलिकाचें दर्शन' म्हणत असतील, त्याच वेळीं पंचगंगा नदी ओलांडून मी पन्हाळ्याचा पांथस्थ झालों होतों. पंचगंगेला मोठासा पूर नव्हता; पण तिचा यौवनकाल आला होता. वरून कुठून तरी चिकट तांबड-माती वाहून आणून ती आपल्या उभय तीरावर तिचे थर रचीत, मदोद्धत गतीनें चालली होती.

आम्ही जात होतों ती पश्चिम दिशा होती. सह्याद्रीच्या आंबेघाटांत उतरणाऱ्या रस्त्यानें आम्हांला नऊ मैल जायचें होतें. पुढें तीन मैलांची चढण होती. एस्. टी. ची बस आम्हांला थेट पन्हाळ्यावर नेणार होती. ज्याच्या माथ्यावर मोटार चढूं शकते, असा हा महाराष्ट्रांतला एकच गड. डोंगराची चढण सुरू झाली आणि प्रथम भेटलीं तीं साग-वानाचीं झाडें. पंधरा दिवसांच्या पावसानें तीं चांगलींच टवटवीत झालीं होतीं. त्यांच्या त्या फताड्या पानांच्या मध्यें हात हात उंचीचे तुरे आले होते, तरी ते कांहीं मनमोहक दिसत नव्हते. पण सागवानाचें सौंदर्य पहायचें तें त्याच्या सडेसोटपणांत; पानांत नि फुलांत नव्हेच मुळीं.

डोंगराच्या उतरत्या पाठीवर बहुतेक सगळीकडे शेतकऱ्याचा नांगर फिरला होता. खालच्या ओलीनें आणि वरच्या मेघच्छायेनें इवलाले सस्यांकुर वाढीस लागले होते. बाजूच्या टेकड्यांच्या अंगावर एकावर एक असे बारीक लंबचौकोन कुणगे तयार झाले होते आणि शेतकरी त्यांतही कसली तरी लावणी करणार होते. माझे सहप्रवासी डॉ. श्रीखंडे

म्हणाले कीं, 'पहा ते कुणगे कसे साखरपाऱ्याच्या वड्या कापून ठेवल्यासारखे दिसतात.' माझ्या मनांत आलें कीं, हे श्री. तात्यासाहेब केळकरांच्याच वर्गांतले दिसतात. त्यांनाही स्पेनच्या किनाऱ्यावरच्या नेव्हाडा पर्वताच्या माथ्यावर पडलेलें बर्फ पाहून वांगीभाताच्या ढिगावर किसलेलें खोबरें पसरल्याची उपमा सुचली होती. मी त्यावर नुसताच हसलों आणि मी का हसलों त्याची कल्पना येऊन तेही हसले. हसून सगळेंच गोड होतें नाहीं का?

सुदैवानें त्या दिवशीं पाऊस नव्हता. हवा प्रसन्न होती. निसर्ग नाचत होता. गाडी पळत होती आणि माझें मनही आंतल्या आंत उमलत होतें. माचीच्या सपाटीला आल्यावर वड, नांदरुखी यांच्या घनदाट कमानींतून तांबडा रस्ता झराझर मार्ग टाकीत गडावरच्या मनुष्यवस्तीत शिरतांना मला खूप उल्हास वाटला. महालकचेरीजवळ सोनाळें तळ्याच्या कांठीं आमच्या गाडीनें वळण घेऊन घरघर थांबवली आणि आमचे पाय गडाला लागले. एवढा वेळ बसून आलों; पण आतां चंक्रमणाचें काम स्वतःच्या पायांवर उभें राहूनच करणें भाग होतें.

प्रथम आल्या रस्त्यानें थोडें मागें जाऊन आम्हीं निरीक्षण सुरू केलें. पन्हाळा हा कोल्हापूरचा पेटा आहे. त्यामुळें लहान प्रमाणांत का होईना सगळ्या कचेऱ्या इथें आहेत. पन्हाळ्याचे दोन विभाग पडतात. वरचा अन् खालचा. वरच्या भागांत कोर्टकचेऱ्या आणि खालच्या घेऱ्यांत मंगळवार, गुरुवार अशा नांवांच्या पेठांतून रहाणारी ग्रामवस्ती. समुद्र-सपाटीपासुन किल्ला तीन हजार फुटाच्यावर उंच असल्यामुळें इथली हवा नेहमींच थंड असते अन् सह्याद्रीचाच एक फांटा असल्यामुळें पाऊसही भरपूर पडतो.

सरकारी दवाखान्याकडे उभें राहून पूर्व तटावर नजर फेंकली कीं एका उंच इमारतीचा पडून शिल्लक उरलेला थोडासा भाग दिसतो. 'नायकिणीचा सज्जा' हें त्याचें नांव आहे. आदिलशाहीच्या काळांत कलावंतिणीसाठीं बांधलेला तो खास महाल असावा. रस्त्याच्या डाव्या हाताला उंच वृक्षांच्या छायेंत धर्मकोठी नांवाची दगडी इमारत आहे.

शिवाजीच्या काळांत तिथें शिधासामुग्री भरलेली असे आणि 'आल्या अतिथा मुठभर द्याया' नेमलेले लोक उभे असत. आज त्याच जागीं कोर्ट थाटलेलें आहे. पुण्याच्या शनिवारवाड्यांत जिथें पूर्वी पेशव्यांचा शृंगारलेला दिवाणखाना होता, तिथें इंग्रजी अमदानींत मुन्सफकोर्टाचे शौचकूप झाले, असें श्री. तात्यासाहेब केळकरांनीं एके ठिकाणीं लिहिलें आहे त्यापेक्षां हें कांहीं तरी बरें. धर्माचा आणि न्यायाचा संबंध 'बादरायण' खास नव्हे.

पुढें संभाजीचें आणि त्याच्यासमोर जिजाबाईचें मंदिर आहे. ही जिजाबाई शिवछत्रपतींची मातुश्री नव्हे; तर कोल्हापूरचें राज्य स्थापणाऱ्या ताराबाईची सून; आणि हा संभाजी म्हणजे त्याच कुळांतला कोल्हापूरचा दुसरा राजा. तिथून पुढें उजव्या हाताला सोमाळें तळें लागतें. याला चोहों बाजूंनीं तट आणि घाट बांधलेले आहेत. सुमारें दोनशें फूट लांबीरुंदीच्या या तळ्याचें पाणी तीन पुरुष खोल, म्हणजे कांहीं अगदींच कमी नव्हे. आजमितीस त्याची बांधावळ ढांसळली असली, तरी तीरावरचे सोनचाफे मात्र चिरंजीवपद घेऊन उभे आहेत. शिवाजीराजे प्रथमच जेव्हां या गडावर स्वामी म्हणून आले, तेव्हां त्यांनीं याच सोनचाफ्याचीं फुलें तोडायला लावून पलीकडच्या शिवलिंगाला लक्ष वहायला सांगितला होता, असें जयराम कवि लिहितो.

गडाची वस्ती जिथून सुरू होते, तिथेंच डाव्या हाताला इतकेंच मोठें पण याहून दुप्पट खोल असें दुसरें एक तळें आहे; त्याला साधोबाचें तळें म्हणतात. हे दोन जलाशय गडाला अविच्छिन्न पाणी पुरवतात. साधोबा हा एक मुसलमान अवलिया होता. त्याचा दरगा तळ्याच्या कांठावर आरामशीर आहे. दरवर्षीं त्याचा उरूसही भरतो.

महालकचेरीला डावी घालून पुढें गेलें कीं डाव्याच हाताला एक चौरस ओसाड जागा दिसते ती कविश्रेष्ठ मोरोपंतांची जन्मभूमि. पाऊण-लाख कविता रचून महाराष्ट्रशारदेचा लाखमोलाचा तन्मणि ठरलेला हा मयूर १७२९ सालीं इथल्या वास्तूंत अवतरला. त्या भूमीवर पंतांचें कांहीं तरी स्मारक उभें झालें पाहिजे, असें पुन्हां एकदां मला वाटलें.

एक साधें वृंदावन, त्याच्या कोनाड्यांत रामसीतेच्या मूर्ति, सभोंवतीं तुळशीचें बन आणि नित्य सांजवात एवढें केलें तरी पुरे. रसिक महाराष्ट्राला हें अशक्य आहे काय ?

डॉ. श्रीखंडे आणि मी पंतांचें स्मरण करीत त्यांच्या त्या क्षणीं आठवल्या त्या आर्या परस्परांना देत घेत आणखी थोडें वर चढून राजवाड्याशीं पोंचलों. हा राजवाडा लहानसाच पण जुना आहे. सांप्रत तो उदास, निःसत्त्व दिसत असला तरी एका काळीं तो गजबजलेला अन् शृंगारलेला असे. १७०९ त ताराबाईनें पन्हाळा ही आपली राजधानी बनविल्यापासून १७८२ सालापर्यंत करवीर इलाख्याचीं राज्यसूत्रें याच वाड्यांतून हालत होतीं. इथें दरबार भरत होते. उत्सव मांडत होते. मंगल समारंभ घडत होते आणि खलबतखानेही कुजबुजत होते. शिवाजीमहाराजांच्या वेळीं जसें रायगडाचें तसेंच ताराबाईच्या काळीं पन्हाळ्याचें 'समृद्धं सौभाग्यम्' झालें. शिबंदी वाढली. बाजार भरले. खालच्या पेठा वसल्या. कचेऱ्या थाटल्या आणि देशांतून अन् कोंकणांतून अनेक कला-गुणांचीं माणसें आपलें नशीब काढण्यासाठीं पन्हाळा चढून आलीं. त्या काळीं इथें गजान्तलक्ष्मी झुलत होती, याचें प्रत्यंतर म्हणजे राजवाड्याच्या मागच्या अंगाला लागूनच असलेली साठमारी.

साठमारी म्हणजे मदांध हत्तीला ताळ्यावर आणण्याची जागा. सुमारें शंभर हात लांब आणि तीसचाळीस हात रुंद अशी ती बंदिस्त जागा आहे. एका बाजूनें राजवाड्याचा तट आणि दुसऱ्या बाजूनें वरच्या टेकडीची उभी खणून घेतलेली दरड. तटाला चिंचोळीं खिडारें असून दरडीला अरुंद, खोल गुहा खोदलेल्या आहेत. हत्तीला आंत मोकळें सोडायचें आणि तो फुंफाटत, चीत्कारत सोंड उंचावून उधळूं लागला कीं साठमाऱ्यांनीं हळूच मागून येऊन त्याला भाले, काठ्या टोंचायच्या. तो अंगावर आला कीं पळत पळत गुहेंत जाऊन दडायचें. गुहेंत आपला प्रवेश होत नाहीं, म्हणून रागानें तो तिथेंच भिंतीला धडका देत राहिला कीं, मागून दुसऱ्या बाजूच्या

लोकांनीं येऊन त्याला ढोसायचें. समोर सामना देण्याऐवजीं मागून वार करून पाठ दाखवणाऱ्या त्या क्षुद्र मानवांची त्याला विलक्षण चीड यायची. तो अधिकच खुचळत सुटायचा आणि बऱ्याच वेळानें मद ओसरला कीं मग गळून पडायचा. वाड्यांतली खाशी मंडळी गच्चीवर बसून हा रौद्र खेळ पहातांना मौज मानायची. आतां हत्ती गेले द्वीपांतराला अन् त्या जागेंत आली ती लाकडांची वखार!

राजवाड्याकडून सज्जेकोठीकडे जायला पूर्वेकडे आणखी थोडें चढावें लागतें. सुमारें पन्नास फूट उंचीच्या पूर्व तटाला लागूनच ही दुमजली आणि वर गच्ची असलेली इमारत आहे. १६०२ मध्यें दुसऱ्या इब्राहिम अदिलशहाच्या कारकीर्दींत मकसूद आका यानें ही बांधली, अशी बाहेर पाटी झळकते. तिच्यापुढें छायावृक्ष आहेत आणि देशी-विलायती फुल-झाडाचा बगीचाही आहे. सज्जेकोठी नेहमींच सजून सज्ज असते. कोण्याही धनवंताला किंवा चार दिवस मौज करायला आलेल्या पाहुण्याला इथें दाम मोजले कीं आरामखुर्च्या, गाद्यागिरद्या इत्यादि सर्व सुखसोयी लभ्य आहेत; पण ज्या वास्तूंत साक्षात् धर्मावतार शिवछत्रपति राहिले, त्या वास्तूचा विलासी लोकांसाठीं रंगमहाल बनविण्यांत योजकाच्या पदरीं अनौचित्याचा घवघवीत दोष आला आहे, असें मी तरी म्हणेन. माझ्या मतें ही जागा मोकळी ठेवायला हवी होती आणि पवित्र मंदिरा-सारखी भक्तिभावानें सांभाळायला हवी होती. ज्याला महाराष्ट्राच्या त्या उज्ज्वल इतिहासाची जाण आहे, ज्याला पुण्यश्लोक शिवराजाविषयीं पूज्यभाव आहे, त्याला त्या पलंगावरच्या दुहेरी मऊ मऊ गाद्या आजही टोंचल्यावाचून रहाणार नाहींत! तो म्हणेल, ‘ इथें नको; मला बाहेरच्या पडवींत जाऊन पडूं दे!’

जयराम नांवाच्या एका कवीनें संस्कृत भाषेंत पांच अध्यायाचें ‘ पर्णालपर्वतग्रहणाख्यान ’ रचलें आहे. जनमेजयानें वैशंपायनाला पुसलें आणि वैशंपायनानें त्याला त्याच्या पूर्वजांची म्हणजे कौरव-पांडवांची भारती कथा विस्तरशः ऐकविली. त्याचप्रमाणें शिवरायाचा बंधु व्यंकोजी जयरामाला म्हणतो कीं, ‘ पन्हाळ्यासारखा जबरदस्त किल्ला महाराजांनीं

आदिलशहाच्या ताब्यांतून कसा घेतला तें मला सांगा' आणि मग कविरुवाच—

**"चरितं शिवराजस्य प्रोच्यते तन्निशम्यताम्"**

अफजुलखानाच्या वधानें महाराजांचा आत्मविश्वास बळावला. खानाचें सैन्य गारद करून जावळी मोकळी केल्यावर त्यांनीं करवीर प्रांताचें नाकें असलेला पन्हाळा हस्तगत करायचें ठरविलें. आनाजी पंडित आणि कोंडाजी फर्जंद यांच्याशीं एकांतीं मसलत करून त्यांच्यावर ती मोहीम सोंपविली. गणोजीमामा आणि मोत्याजीमामा यांना त्यांच्या मदतीस दिलें. हे सगळे लोक महाराजांना प्रणाम करून आणि पागोट्यांत शमीचीं पानें खोंवून गुप्तपणें रायगडाहून निघाले. घोरपडी, शिड्या, मेखा, बाण वगैरे साहित्य जमवून एका अंधाऱ्या रात्रीं पन्हाळ्याखालीं पोहोंचले. आनाजी आपल्या टोळीसह मागच्या रानांत दबा धरून बसला. कोंडाजीनें रात्रीचा दिवस करून, वरच्या शत्रूला चाहूल न लागूं देतां माची गांठली. लगेच कर्णे फुंकले गेले. गडावरचे शत्रुसैनिक घोरत पडले होते, ते दचकून जागे झाले. प्रसंगीं ज्याला जें शस्त्र सांपडलें, तें त्यानें हातीं घेतलें. लढाईला तोंड लागलें. कोंडाजीनें धमाल उडवून दिली. पाठोपाठ आनाजीही वर चढला. गनीम पुढें आला तो पडला. पळाला तो सुटला. पहांटेस गड हातीं आला. घराघरावर कोंडाजीचे पहारे बसले. गडावरचे सर्व अधिकारी कोंडाजीचे बंदिवान झाले. आनाजीनें पन्हाळा फत्ते झाल्याची सुवार्ता जासुदामार्फत रायगडीं पोंचविली. महाराजांना परमानंद झाला. शंभर होन बक्षीस देऊन त्यांनीं जासुदाच्या तोंडांत साखर घातली.

दुसऱ्याच दिवशीं महाराजांनीं पन्हाळ्याचें प्रस्थान काढलें. भरल्या घागरी घेऊन पुढें आलेल्या सुवासिनींनीं त्यांना शुभशकुन केले. वाटेंत प्रतापगडीं मुक्काम करून त्यांनीं हा विजय भवानीच्या चरणीं निवेदिला. पन्हाळ्यास पोंचल्यावर गड आणि तिथली सर्व व्यवस्था पाहून राजांचे नेत्र निवले. इंद्राच्या भयानें सागरांत बुडी देऊन राहिलेल्या मैनाक पर्वताप्रमाणें पन्हाळा यवनी सत्तेच्या समुद्रांत बुडला होता; पण

महाराजांनीं सदय होऊन आपल्या दुर्दांत सामर्थ्यानें त्याला वर काढलें. अफजुलखानवधानंतर अवघ्या अठरा दिवसांत हा दुसरा महापराक्रम करून शिवरायांनें अदिलशाहीला 'तोबा, तोबा!' म्हणायला लावलें.

ज्या पद्धतीनें पन्हाळा सर करण्यांत आला, त्या पद्धतीचें भूषण-कवीलाही आश्चर्य वाटलें आहे. तो म्हणतो—


**"देखत उँचाइ उदरत पाग, सुधी राह धोस हूं में चढें तेजे साहसनिकेत हैं**

**सिवजी हुकुम तेरो पायपैदलन सलहेरि परनालो ते वै जीते जनु खेत हैं**

किल्ल्याची उंची पाहूं गेलें असतां पागोटें गळून पडतें. धाडसी लोक फक्त दिवसां आणि तेही सरळ रस्त्यानेंच वर चढूं शकतात. पण हे शिवजी, तुझी आज्ञा होतांच, सालेरी आणि पन्हाळगड यांच्यासारखे अवघड किल्ले तुझ्या पायदळानें सपाट शेत आक्रमावें इतक्या सहजतेनें जिंकले. तुझें मावळें सैन्य इतकें दक्ष आहे कीं, श्रावण–भाद्रपदांतील अमावास्येच्या काळ्याकुट्ट अंधाऱ्या रात्रीं देखील असले किल्ले चढून वर जातें. भूषण म्हणतो, मीं या गोष्टीचा विचार केला तेव्हां, मला असें प्रतीत झालें कीं, तें मावळें सैन्य तुझ्या प्रतापसूर्याच्या प्रकाशामुळेंच गड सर करूं शकतें."

सज्जेकोठीचा दगडी जिना चढून आम्ही वरच्या दिवाणखान्यांत गेलों. 'पन्हाळ्याला शिद्दी जोहाराचा वेढा पडला असतां शिवाजीराजे ज्या खिडकींतून निसटून गेले ती खिडकी ही' म्हणून आमच्या मार्गदर्शकानें एका ठिकाणीं बोट दाखविलें. मीं म्हटलें, 'ही तर भिंत दिसते.' तो म्हणाला, 'खिडकी बुजवून टाकली आहे.' मीं म्हटलें, 'खिडकी बुजवली म्हणून इतिहास कसा बुजेल? पाटीवरचीं अक्षरें पुसलीं म्हणून अर्थ कांहीं पुसला जात नाहीं.' खालीं उतरून तटाच्या बाजूनेंही आम्हीं तो खिडकीचा भाग पाहिला. तिच्याखालीं खालच्या छपरावर

टेकलेला एक छोटेखानी जिना आहे. महाराज या जिन्यावरूनच खालीं आले असतील. खालच्याच कुठल्या तरी घळींत डोली तयार राहिली



सज्जेकोठीची खिडकी

असेल आणि सहाशें मावळे सैनिकांसह शिवाजी वेढ्यांतून निसटला, हें कळून येतांच शिद्दी जोहाराच्या अंगाचा तीळपापड झाला असेल.

या अद्‌भुत पलायनपर्वाची पूर्वपीठिका लक्षांत येण्यासाठीं इतिहा-

सार्चीं मागचीं चार पानें उलटलीं पाहिजेत. पन्हाळा काबीज होताच शिवाजीनें भोंवतींचा सगळा करवीरप्रांत जिंकून घेतला. रुस्तुमजमा हा करवीरचा सुभेदार त्या वेळीं कोंकणांत होता. शिवाजीवर नेटानें चढाई करण्याबद्दल विजापूरचा त्याला हुकूम झाला. तो आणि फाजलखान एक झाले. दोघांनीं मिळून रणशिंग फुंकलें. शिवाजीच्या वतीनें नेताजी 'हरहर महादेव' गर्जिन्नला. नेताजीचा मारा त्यांना सहन झाला नाहीं. दोघे दोन वाटांनीं पळाले. जिवापुढें रणसामुग्रीची फिकीर कोण करणार? नेताजीला दोन हजार घोडीं आणि बारा हत्तीं सुखासुखीं मिळाले ते आणून त्यानें महाराजांच्या चतुरंगदळांत सामील केले. शिवराजानें नेताजीला 'भले बहाद्दर' म्हटलें आणि लगेच त्याला खुद्द विजापूर प्रांतावरच लोटलें. कृष्णा पार करून शत्रूला लुटीत-पिटीत थेट लक्ष्मेश्वर गडापर्यंत त्यानें गरुडभरारी मारली. त्याच्या वावटळींत शत्रु म्हणजे पालापाचोळा ठरला.

विजापूरदरबारनें आ वासला! आतां मराठे आपल्याला आवरत नाहींत, हें कटु सत्य विजापूरला मान्य करावें लागलें. त्यानें 'त्राहि माम्' म्हणून दिल्लीश्वराचा धांवा मांडला. पण तिकडून मदत येईपर्यंत मराठ्यांना निदान थोपवून तरी धरलें पाहिजे! पण दरबारांतला एकही वजीर उठेना. अखेर शिद्दी जोहार म्हणाला, 'मला पाठवीत असाल तर मी मराठ्यांना खडे चारीन!' अदिलशहाचें अन् त्याचें नाडी-नक्षत्र जुळत नव्हतें. कारण तो स्वतः महत्त्वाकांक्षी होता आणि आदिलशहा-विरुद्ध कारस्थानें करून शिरजोर बनला होता. पण या वेळीं अदिल-शहाची स्थिति 'अडला नारायण' अशी झाली होती. त्याला शिद्दी जोहारचे सगळे अपराध गिळून अन् वर 'खलचतखान' अशी पदवी बहाल करून त्याची या मोहिमेवर रवानगी करावी लागली. अंतःशत्रु तो जिवलग मित्र ठरला. राजनीतीला जाणत्या लोकांनीं वारांगना कां म्हटलें तें अशा घटनांवरून कळून येतें.

शिद्दी जोहारानें धांवत दौडत येऊन पन्हाळा वेढला. रुस्तुम, फाजल हे पळपुटे बहाद्दरही त्याला येऊन मिळाले. वरच्या तिघांनीं पन्हाळ्याची

पूर्व बाजू आणि सादातखान, मासूद, घोरपडे यांनीं पश्चिम बाजू बळकट धरली. महाराज आंत अडकले. वरून केलेल्या माऱ्याचा कांहीं उपयोग होईना. चार महिने वेढा तंग राहिला. थोड्याच अवधींत दिल्लीहून शाहिस्तेखानही दक्षिणेंत उतरला. दिल्लीचें सगळेंच काम प्रचंड! सत्त्याहत्तर हजार घोडेस्वार त्याच्या मार्गेपुढें चालत होते. शिवाय दणदणीत तोफखाना! पुणें, सुपें काबीज करून त्यानें त्या भागांत हैदोस सुरू केला. चोहोंकडून वातचक्र उठलें. स्वराज्याचें भवितव्य संशयांत पडलें. राजगडावर असलेल्या जिजाबाईनें 'देव पाण्यांत घातले!' ती अस्वस्थ झाली. हरप्रयत्नानें शिवबाला पन्हाळ्यावरून सोडवलेंच पाहिजे; त्यावांचून तरणोपाय नाहीं, अशी तिची खात्री झाली.

नेताजी आणि सिद्दी हिलाल या जोडीला तिनें या कामगिरीवर पाठविलें. ते शिद्दी जोहाराशीं जिवाच्या शर्थीनें लढले; पण या वेळीं त्यांची शक्ति अपुरी पडली. नेताजीसारख्या धुरंधराला खिन्न मनानें परतावें लागलें. एवढ्यांत पावसाळा सुरू झाला. जोहारानें सैनिकांना सभोंवतीं खोपटीं उभारून दिलीं. खालून तिळाएवढी मदत पोंचेनाशी झाली. वरचें दळ संपुष्टांत आलें आणि मग शिवरायानें हें धाडस करायचें ठरवलें. जिथें शक्ति चालत नाहीं, तिथें युक्तीची मात्रा उगाळायची, हें चातुर्यलक्षण त्याला उपजतच होतें.

आणि आषाढ वद्य प्रतिपदेच्या रात्रीं शिवराजानें कुठून अन् कसा भेद केला, कोण जाणे! पण तो खालीं आला आणि तिथून तीस-पस्तीस मैलांवर पश्चिमेस असलेल्या विशाळगडाकडे दौडला. ही अघटित करणी शिद्दी जोहाराला कळली तेव्हा त्याला वाटलें कीं, आपल्या चार महिन्यांच्या मेहनतीवर एका क्षणांत पाणी पडलें! त्यानें लगेच मसूदखानाला शिवाजीच्या पाठीवर पिटाळलें. विशाळगडाच्या पायथ्याशीं जाईतों मासूदखान शिवाजीच्या पाठीला भिडला. त्या वेळीं बाजीप्रभु शिवाजीबरोबर होता. 'मी गडावर पोंचेतों तूं ही पवनखिंड अडवून धर' अशी त्याला आज्ञा करून शिवाजी गड चढूं लागला. बाजीप्रभूनें शत्रूचा तो कडवा दुर्धर हल्ला आपल्या पंचप्राणांवर झेलला. तो गोळी

लागून पडला खरा; पण त्यानें आपली कामगिरी पुरी केली. राजे गडावर सुखरूप पोंचल्याचा इशारा देणारी तोफ जेव्हां वरून दणाणली, तेव्हांच त्याचा प्राणपक्षी स्वर्गाच्या वाटेला लागला! स्वामिकार्यी देह अर्पून त्यानें स्वतःला उज्ज्वल देशभक्तांच्या नामावळींत गोवून घेतलें.

पन्हाळ्याला मदतनीस असा दुसरा एक गड त्याच्या पूर्व अंगाला आहे, त्याचें नांव पावनगड. हा लहान असला तरी क्षुद्र नाहीं. सभोंवतीं वीस फुटांचा कडा तुटलेला असल्यामुळें तो शत्रूला सुखानें पदस्पर्श करूं द्यायचा नाहीं. तिथूनच डाव्या हाताला, पन्हाळ्याच्याच उंचीचा ज्योतिबाचा डोंगर दिसतो. पन्हाळा अन् ज्योतिबा—दोघेही सह्याद्रीचेच पुत्र; पण पन्हाळा निसर्गलक्ष्मीनें भाग्यवंत अन् ज्योतिबा अगदींच कंगाल. असें कां व्हावें, हें मोठेंच आश्चर्य आहे. सगळें अनुकूल असलें तरी दैव आडवें पडलें कीं कशाचाच उपयोग नाहीं. शंखाचेंच उदाहरण घ्या. क्षीरसागर हा त्याचा बाप. लक्ष्मी थोरली बहीण. अर्थात् वैकुंठपति हा मेहुणा झालाच; पण त्याच्या नशिबीं जंगमाच्या खांद्यावर लोंबकळत दारोदार फिरणेंच आलें कीं नाहीं?

सज्जेकोठीहून निघतांना आम्हीं आमच्या मार्गदर्शकाला विचारलें, 'संभाजी इथेंच नजरकैदेंत होता ती जागा तुला ठाऊक आहे काय?' तो म्हणाला, 'अहो, याच कोठींत वरच्या मजल्यावर!' मला आपलें सहज स्फुरलें कीं, इथें जो वारा हुंदडतो आहे, त्यांत शंभुराजाचे क्वचित् क्रोधाचे, क्वचित् अनुतापाचे उच्छ्वास मिसळलेले असतील. या धडाके-बाज वाऱ्याचें संभाजीच्या स्वभावाशीं खूप साम्य आहे. शिवराजांच्या देहावसानापर्यंत त्याची इथून सुटका होऊं शकली नाहीं. राजांनीं मायामोह मारून हें कठोरपण आचरलें होतें. दिलीपाला सरळ अंतःकरणाचा शत्रूही, आर्ताला जसें औषध तसा प्रिय होत असे आणि प्रिय व्यक्ति जर अस्तनींतला निखारा होत असेल तर साप डसलेली अंगुलि कापून टाकावी, तसा तिचा तो त्याग करीत असे, असें कालि-दास सांगतो. शिवराजही याच राजधर्माला जागले. पोटचा मुलगा झाला

म्हणून काय झालें ! तो जर शत्रूला धार्जिणा होत असेल, तर त्याचा निग्रह केलाच पाहिजे. पुत्रापेक्षां राष्ट्राचें स्वातंत्र्य हें केव्हांही महत्त्वाचें !

'वाघदरवाज्या'कडे जातांना माझ्या मनांत हेच विचार तरंगत होते. वाघदरवाजा हा दोन कमानींचा आहे. 'तीनदरवाजा' तर तिप्पट



'तीनदरवाजा'

आहे, हें त्याच्या नांवावरूनच उघड होतें. याच्या मधल्या कमानीवर सुरेख नक्षीकाम आहे. बांधणीचे दगडही भलेभक्कम आहेत आणि ते शिशाचा रस मधें ओतून एकावर एक बसवलेले आहेत. कमानीजवळचें जलकुंड विष्णुतीर्थ या नांवानें प्रसिद्ध आहे. इथें टाकलेलें लिंबू कोल्हा-पुरांतल्या रंकाळ्यांत उतरतें, अशी एक दंतकथाही कोण्या गप्पीदासानें निर्मून ठेवली आहे. बाह्य कमानीवर गणेशपट्टीच्याखालीं तोफेचा गोळा

लागून तिथला कपचा उडाला ; पण दरवाज्याचा रोमही हालला नाहीं ! 'तीनदरवाज्या 'प्रमाणेंच चारदरवाजाही इथें होता आणि तेंच गडाचें महाद्वार होतें ; पण आजला त्याची नांवनिशाणीही नाहीं ! नुसती जागा तेवढी दाखवतात. 'तीनदरवाज्या 'च्या जवळच 'अंधारबाव ' आहे. ही बारव तीन कमानींत आणि गुडुप अंधारांत लपलेली आहे. आपल्या संथ निळ्या गहिऱ्या पाण्यावर सूर्यकिरणांनीं हळूच उतरून बागडावें आणि तो जलप्रकाशाचा उज्ज्वल खेळ आपण डोळे भरून पहावा म्हणून ती देवाला नवस करीत बसली असेल.

हे दरवाजे, ही विहीर, गडावरची बरीचशी तटबंदी हें सगळें बांधकाम विजापूरकरांच्या हातचें आहे. पन्हाळा अशा रीतीनें अभेद्य करायला त्यांना शंभर वर्षें लागलीं असें सांगतात. १४८९ त हा किल्ला अदिलशाहीकडे गेला आणि उणीपुरीं दोनशें वर्षें तिच्याच सेवेंत राबला. इब्राहिम अदिलशहाचे बरेच शिलालेख पन्हाळ्यावर दिसतात. अदिल-शहानें डागडुजी केली ; पण किल्ला बांधणारा मात्र तो नव्हे. त्याचें नांव समजायला आणखी चारशें वर्षें मागें गेलें पाहिजे.

शिलाहार हे मुळांत चालुक्याचे सामंत. महाराष्ट्राची पश्चिम सीमा आणि समुद्रकिनारा यांच्या रक्षणाची जबाबदारी चालुक्यांनीं त्यांच्यावर सोंपवली होती. या वंशांतले पण करवीरप्रांताचा कारभार करणारे शिलाहार पुढें ऊर्जित काळाला आले. या वंशांतला शेवटचा राजा दुसरा भोज. त्याच्या राजवटीचा काळ महाराष्ट्रांत धामधुमीचा होता. चालुक्यांची सत्ता आक्रसत होती. यादव 'आपलें घोडें, जाऊं द्या पुढें ' म्हणत होते. भोजाला वाटलें कीं, आपल्या महत्त्वाकांक्षेला ही संधि सोन्याची आहे. त्यानें आपलें सामर्थ्य सर्व प्रकारें वाढवून सामंतपद फेंकून दिलें आणि चक्रवर्तीपणाचीं बिरुदें धारण केलीं. पांडवगड, पावनगड, भूधरगड, विशाळगड, रांगणा, खेळणा, पन्हाळा असे सुमारें पंधरा किल्ले त्यानें धडाक्यासरशीं बांधून काढले. पन्हाळा ही आपली राजधानी केली. इ. स. ११०० च्या सुमारास असें हें शिलाहारांचें साम्राज्य गाजलें. दुसरा भोजराजा हा केवढा अतुर्बळी

आणि केवढा प्रचंड संघटक होता हें यावरून कळून येईल. लोक-वाङ्मयांत ज्याला आदराचें स्थान मिळालें, तो महापुरुष असें समजायला हरकत नाहीं. याच भोजराजाविषयीं एक लोककथा एका वृद्ध गोंधळयानें मला ऐकविल्याचें स्मरतें—


"पन्हाळदुर्गी राजा भोज. त्याच्या दरबारांत एक दिवस बोलणं निघालं, 'स्त्रीचरित्र मोठं, का भोजचरित्र मोठं?' राजा म्हणाला, 'भोजचरित्र मोठं.' त्यानें गल्लोगल्लीं तशी दवंडी पिटवली. सातव्या गल्लीला एका म्हाताऱ्या गुरविणीनं ती ऐकली. ती दवंडीवाल्यांना म्हणाली, 'तुम्हांला लागलंय् वेड अन् राजाला भरलाय फांटा. अर, स्त्रीच्या मावा न कळे स्वर्गीच्या देवा! कोंबडीला पीस तितकं बाईला मिस...'

पण भोजचरित्र मोठं म्हणून पुकारा करणाऱ्या या राजाला चारी मुंड्या लोळवून यादवांनीं तें 'खोटं' म्हणून जगजाहीर केलें. १२०९ सालीं शिलाहार घराणें बुडून या प्रांतावर यादवांची सत्ता प्रस्थापित झाली.

तीनदरवाज्यापासून थोड्याच अंतरावर तटाला एक भगदाड दिसतें, तें इंग्रज सैन्याचें कर्तृत्व आहे. १८२१ ते १८३७ या अवधींत पन्हाळा आणि पावनगड हे ब्रिटिशांच्या ताब्यांत होते. पुढें चवथा शिवाजी बालराजा हा कोल्हापूरच्या गादीवर आला, त्या वेळीं त्या प्रांतांत एक बंड उठलें. बंडवाले शिरजोर होऊन त्यांनीं बालराजाला आपल्या ताब्यांत घेतलें आणि पन्हाळाही बळकावला. १८४४ च्या डिसेंबरांत दिलामोटी या इंग्रज सेनापतीनें दरवाज्यांतून प्रवेश मिळेना म्हणून तटाला हें भगदाड पाडलें आणि किल्ला परत मिळवून बंडाची इतिश्री केली.

किल्याच्या मध्यभागीं असलेल्या दाट झाडींत पूर्वी महाकालीचें मंदिर होतें असें सांगतात. ताराबाईची सून जिजाबाई हिच्या कारकीर्दींत या महाकालीपुढें नरमेधही होत असत म्हणे. ती जोंवर प्रसन्न आहे तोंवर राज्याकडे कोणीही शत्रु वांकडा डोळा करून पाहूं शकणार नाहीं, अशी तिची भावना होती. बलि देण्याचीच गोष्ट निघाली म्हणून आणखी एक प्रकार सांगणें भाग आहे. कुठल्या तरी बुरुजाखालीं जिवंत पुरण्यासाठीं एका तेल्यानें आपली सून दिली होती, त्याबद्दल त्याला जें इनाम

मिळालें, त्याची सनद मेजर ग्रेहॅम यांनीं उपलब्ध करून दिली आहे. हे बळजबरीनें तरण्याताठ्या देहांतून उठवलेले अतृप्त आत्मे या गडांवर घिरट्या घालीत असतील आणि वाऱ्याच्या वाहणींत शिरून, धडका देऊन देऊन, तट-बुरूज आणि जुन्या इमारती पाडीत असतील. मला त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट एवढीच वाटली कीं, शिवरायानें असले नरबली दिल्याचें ऐकिवांत नाहीं. त्याची श्रद्धा डोळस अन् सात्त्विक होती. तो सत्यधर्म ओळखणारा होता.



अंबरखना-गंगाकोठी

किल्ल्याच्या उत्तर अंगाची सगळ्यांत उंच जागा हाच इथला बाले-किल्ला. सभोंवतीं खंदक खणून हा दुर्गम, दुःसाध्य केलेला आहे. मूळचा हा खंदक किती खोल असेल न कळे; पण आजमितीस तो बुजून सामान्य चर या स्वरूपांत अवशिष्ट आहे. प्राचीन राजवाडा इथें होता, असें सांगतात. तूर्त फक्त दगडी चौथऱ्यावरूनच त्याच्या लांबी-रुंदीचें अनुमान करायचें आणि तत्कालीन वैभवविलासांच्या झगमगा-टांची कल्पना बांधायची. या नामशेष राजवाड्यांची उणीव तिथें उभ्या

असलेल्या तीन कोठ्यांनीं थोडीबहुत भरून काढलेली आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती या पावन नामांचीं तीं तीन धान्यकोठारें आहेत. आदिलशाहीच्या अमलांत हीं बांधलीं गेलीं. उभारणीही दगडांचीच आणि आच्छादनही दगडांचेंच, असें यांचें केवळ पाषाणमय स्वरूप आहे. त्यांतली गंगाकोठी ही सर्वांत मोठी. गणिताच्या भाषेंत सांगायचें तर ही दशसहस्र चौरस फूट बांधणीची आहे. उंची तर सतरा-अठरा हात सहज भरेल. हिचें महाद्वार एखाद्या चैत्याच्या उभारणीसारखें आहे. या तिन्ही कोठ्यांत मिळून पंचवीस हजार खंडी धान्य मावतें असें तिथल्या पाटीनें सांगितलें. 'सैन्यें पोटावर चालतात' हा वाक्प्रचार या कोठ्या निराळ्या अर्थानें सूचित करतात. बालेकिल्ल्यांत आंबे, जांभळी, बकुळी भरपूर आहेत. वानरांनीं तिथें आपली मिरासच केली आहे. हंगामांत कच्चीं-पक्कीं फळें आणि बाकीच्या दिवसांत पाला खाऊन त्यांच्या पिढ्यान् पिढ्या तिथें नांदत आलेल्या आहेत.

या रानाला पक्षीही नाना प्रकारचे आहेत. इथें तांबड्या कल्ल्यांचा बुलबुल आहे. आंगठीवजा तपकिरी रंगाचे ठिपके असलेलें कबूतर आहे. काळ्या पंखांचा पतंग आहे. ठिपक्यांचा आणि पांढऱ्या पाठीचा 'मुनिया' आहे. पुढचा भाग पिवळा असलेला सुतार आहे आणि असेच किती तरी. श्री. ओब्रायन नांवाचा एक साहेब कोल्हापूरचा रेसिडेंट असतांना त्यानें इथल्या पक्ष्यांचें संशोधन करून सुमारें शंभर नांवनिशींचा वर्णनासह तक्ता करून ठवलेला आहे.

पन्हाळ्याला कोल्हापूरच्या महाराजांच्या कांहीं इमारती आहेत आणि आतां श्रीमंतांचे नवे नवे बंगले तिथें उठत आहेत. पन्हाळ्याचें पठार प्रशस्त असल्यामुळें तिथें त्यांना बगीचे, क्रीडांगणें वगैरे सगळ्या सुखसोयी करणें शक्य झालें आहे. बोलपटाचें निसर्गचित्रण करण्याच्या कामींही पन्हाळ्याचा उपयोग होऊं शकतो. भावी काळांत पन्हाळ्याचा सगळाच कायापालट होणार आणि तो महाबळेश्वर-माथेरानप्रमाणें धनवंतांचें वासंतिक विहारस्थान बनणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

पन्हाळ्याच्या पठाराचे उत्तर-दक्षिण असे दोन भाग करता येतात. दोहोंच्या मध्यें एक निसर्गनिर्मित पन्हळ आहे. या पन्हळीमुळेंच जयराम-

कवीनें याला पर्णालपर्वत असें म्हटलें आहे. पुढें पर्णालचाच अपभ्रंश पन्हाळा झाला. दक्षिण पठारावर जातांना वाटेंत नागझरी लागते. एका बांधीव कुंडांत तिचें पाणी खडकांतून ओघळतें. पन्हाळ्यावरचें हें सर्वोत्कृष्ट पाचक पाणी आहे. नागझरीवर तृषा शमवून थोडी विश्रांति घेतल्यावर प्रवाश्यानें वरची डोंगराच्या अंगांत खोदलेली पराशरगुहा पाहिल्यावांचून परतूं नये. शक्य तर आडवें होऊन गुडघे टेकीत सरपटत आंत जाऊन तिचा अंतही पहावा. पराशरमुनींच्या येथील वास्तव्यामुळेंच करवीरपुराणांत याला पराशरक्षेत्र म्हटलें आहे. हा पराशर व्यास महर्षींचा जनक का दुसरा कोणी तरी त्याच नांवाचा हें कोण सांगणार? प्राचीन काळीं इथें नागांची वस्ती बरीच होती आणि ते माणसास विषबाधा करीत असत. पराशरमुनि इथें आले आणि त्यांनीं या नागास निर्विष करून सोडलें. या पुराणकथेंत एक ऐतिहासिक सत्य रूपांतरित झालें आहे. हे नाग म्हणजे सरपटणारे प्राणी नव्हेत; तर नागपूजक जमातीचे लोक. विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेस हातपाय पसरीत चाललेल्या आर्य लोकांशीं या भागांत यांची गांठ पडली आणि डोंगरदऱ्यांच्या आश्रयानें हे नवीन आलेल्या लोकांवर घाले घालूं लागले. आघात-प्रत्याघात यांतून उभा दावा निर्माण झाला आणि मग पराशरमुनीनें आपल्या तपःप्रभावानें 'नांदा आणि नांदूं द्या' या भूमिकेवर दोघांमध्यें सभेट घडवून आणला. वरील कथेचा असा अर्थ लावणें सहज शक्य आहे.

पन्हाळ्याची तटप्रदक्षिणा करतांना आणि चढ-उतारांचे आरोह-अवरोह घेतांना पाय अगदीं डबघाईला येतात; पण आल्यासारखें सगळें एकदां डोळ्यांखालून घालायचें तर त्यांची दया करून भागत नाहीं. उत्तर भाग पुरा करावा, नागझरीजवळ थोडा विसांवा घ्यावा, तिथें जठराग्नीला थोडीबहुत आहुति द्यावी आणि नंतर दक्षिण भाग पुरा करून मोटारतळावर यावें. तिथें आल्यावर तुम्हांला फार वेळ तिष्ठावें लागणार नाहीं. तासा-अर्ध्या तासांत कोल्हापूरची गाडी निश्चित मिळूं शकेल. अवघ्या पाऊण तासांत तुम्ही कोल्हापूरच्या गंगावेशींत उतरून पुढच्या मार्गाला लागूं शकाल.

---